# सृजन

मे - ऑक्टोबर २०२३






हरित व शाश्वत ऊर्जेकडे



महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## महानिर्मितीच्या भुसावळ प्रकल्प पूर्णत्वासाठी महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांनी भेल कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. नलिन शिंघल यांची भेट घेतली





महानिर्मितीच्या भुसावळ ६६० मेगावॅट संच क्रमांक ६ चे अभियांत्रिकी, खरेदी आणि उभारणीचे काम केंद्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम (BHEL) मेसर्स भेल कंपनी करीत असून या कामांना अधिक जलद गतीने पूर्णत्वाकडे नेण्यासाठी महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांनी दिल्ली येथे भेल कंपनीचे सी.एम.डी. मा. डॉ. नलिन शिंघल यांची भेट घेतली. यावेळी सोबत महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प), मा. श्री. अभय हरणे, म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनीचे निवासी कार्यकारी संचालक श्री. प्रफुल्ल पाठक तसेच भेलचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.

## महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांचे हस्ते जल विद्युत केंद्राच्या तांत्रिक माहिती पुस्तिकेचे उद्घाटन






मुंबई मुख्यालय येथे मासिक आढावा बैठकीचे औचित्य साधून मा.डॉ.पी. अन्बलगन यांचे हस्ते जल विद्युत केंद्रांच्या तांत्रिक माहिती पुस्तिकेचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी सोबत संचालक (वित्त) मा. श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) मा. श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) मा. श्री. अभय हरणे, संचालक (खनिकर्म) मा. डॉ. धनंजय सावळकर, कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था-१) श्री. राजेश पाटील, कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नितीन चांदुरकर तसेच अन्य मुख्य अभियंते, मुख्य व्यवस्थापक आणि वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.

## मुंबई मुख्यालय येथे महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांचे हस्ते अभियंता दिन संपन्न





मुंबई मुख्यालय येथे मा.डॉ.पी. अन्बलगन यांचे हस्ते डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांच्या जयंती दिनानिमित्त अभियंता दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी सोबत संचालक (वित्त) मा. श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) मा. श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) मा. श्री. अभय हरणे, संचालक (खनिकर्म) मा. डॉ. धनंजय सावळकर, कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था-१) श्री. राजेश पाटील, कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नितीन चांदुरकर, कार्यकारी संचालक (पर्यावरण व सुरक्षितता) डॉ. नितीन वाघ तसेच अन्य मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक आणि वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

# मनोगत



विद्युत उत्पादनात निसर्गाच्या ऋतुचक्राचे अनन्यसाधारण महत्व आहे. उन्हाळ्यात कडाक्याच्या गरमीमुळे विजेची मागणी उच्चांकी पातळी गाठते तर पावसाळ्यात वीज संचांच्या देखभाल दुरुस्ती, ओल्या कोळशाची समस्या उद्भवते आणि त्यानंतर ऑक्टोबर हिटमुळे अचानक विजेची मागणी वाढते अशा निसर्गचक्रामुळे दरवर्षी नियमित स्थिती असली तरी मागील काही वर्षांपासून वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरणामुळे मानवीय हस्तक्षेप वाढला आहे आणि त्यामुळे निसर्गचक्र काहीसे बिघडल्याने नैसर्गिक संकटे, अवकाळी पाऊस, वादळवारा, गारपीट, पूर परिस्थिती वेळीअवेळी कधीही पहायला मिळते. एकूणच काय तर, या आव्हानांवर मात करण्यासाठी निसर्गचक्रावर देखील समांतर नजर ठेवून महत्तम वीज उत्पादन घ्यावे लागणार आहे यामध्ये विशेष प्रयत्नांची अधिक गरज आहे.

दैनंदिन वीज उत्पादनासाठी आवश्यक कोळसा आणि वापरापेक्षा जास्त मात्रेत आवक वाढवून भविष्यकाळात गरजेसाठी कोळसा साठा वाढविणे, याकरिता संबंधित अनेक विभागांशी उत्तम समन्वय, पाठपुरावा करणे गरजेचे झाले आहे. विशेष म्हणजे यावर्षी सुमारे ६० हजार दशलक्ष युनिट्स वीजनिर्मितीचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. आगामी काळात सण-उत्सव, नववर्ष आणि येणाऱ्या उन्हाळ्यापर्यंत मागणीनुसार किमान ७,५०० मेगावॅट वीज उत्पादनात सातत्य ठेवणे हे लक्ष्य असले तरी दैनंदिन खर्चात काटकसर, डिसअलाऊन्सचे प्रमाण कमी करणे, आपली कामगिरी अधिकाधिक उंचावण्याचा प्रयत्न करून पर्यावरणपूरक वीजनिर्मितीसाठी निरंतर कटिबद्ध राहावे लागणार आहे. कारण शासकीय कंपनी म्हणून आपल्याकडून अपेक्षा वाढल्या आहेत.

महानिर्मितीचे शक्तीस्थळ जरी औष्णिक विद्युत उत्पादन असले तरी बदलत्या परिस्थितीत नैसर्गिक संसाधनांचा पुरेपूर वापर करण्याच्या दृष्टीने ऊर्जेच्या विविध स्रोतांचा अवलंब करण्याचा निश्चय महानिर्मितीने केला आहे. सन २०३० पर्यंत सुमारे ८ हजार मेगावॅट स्थापित क्षमतेचे नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प आणि एकूण सुमारे २५ गिगावॅटपेक्षा अधिकचे लक्ष्य साध्य करण्याचा संकल्प महानिर्मिती ने केला आहे. विशेष म्हणजे सौर ऊर्जा प्रकल्प, पवन ऊर्जा, ग्रीन हायड्रोजन प्रकल्प, पंप स्टोरेज प्रकल्पासाठी महानिर्मितीने एकूण ५,२२० मेगावॅट क्षमतेचे सामंजस्य करार करून नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात दमदार पाऊल टाकले आहे. सोबतच या वर्षाअखेर भुसावळ ६६० मेगावॅटचा प्रकल्प कार्यान्वित होणार आहे. कोराडी येथे ६६० मेगावॅट क्षमतेच्या दोन बदली संचांस राज्य शासनाने आर्थिक तरतुद करून मान्यता दिली आहे. कमी वेळात मोठे लक्ष्य गाठण्याकरिता खडतर आव्हानाला सामोरे जातांना प्रशिक्षित आणि मल्टी-टास्किंग करणाऱ्या मनुष्यबळाची खरी गरज आहे. त्यासाठी आपल्याला स्वत:मध्ये थोडे बदल करावे लागणार आहेत. ज्यात विद्युत क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान ग्रहण करणे, चौकटीबाहेरचा विचार, नफा-तोट्याचे गणित समजून घेणे, प्रचंड परिश्रमाची तयारी ठेवणे, जिद्दीने कामाला लागणे, बाजाराची वाणिज्यिक स्थिती समजून आपले सूक्ष्म नियोजन करणे, व्यावसायिक पद्धतीने ओनरशिपसह सांघिक कार्यातून यशस्वीरीत्या वाटचाल करीत हे लक्ष्य गाठावे लागणार आहे. विद्युत उत्पादन क्षेत्रात काम करताना आपल्या नजीकचा परिसर स्वच्छ नीटनेटका असावा याकरिता प्रत्येकाने हिरीरीने सहभागी होणे गरजेचे आहे आणि हे सांघिक कार्यातून सहज शक्य आहे.

औष्णिक वीज संचांसाठी पर्यावरणपूरक अशी एफ.जी.डी. प्रणाली, एस.सी.आर. आणि धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी ई.एस.पी. यंत्रणा आधुनिकीकरणाची प्रत्यक्ष कार्यवाही सुरू झाली आहे. तसेच कोळसा खाणीतून थेट कोल पाईप कन्व्हेयर वीजकेंद्रात कोळसा पुरवठा सुरू करून पर्यावरणपूरक कोळसा वाहतूक प्रणाली सुरू झाली आहे. एकूणच सामाजिक जाणिवेच्या भावनेतून स्वच्छ, हरित पर्यावरणपूरक ऊर्जा निर्मितीसाठी आपले अधिकाधिक योगदान अपेक्षित आहे.

धन्यवाद, जय महाराष्ट्र!

**- डॉ. पी. अन्‌बलगन**

## नाशिक प्रशिक्षण केंद्रातर्फे दोन दिवसीय नवीकरणीय ऊर्जेसंबंधी प्रशिक्षणाचे आयोजन





महानिर्मितीने २०३० पर्यंत ८००० मेगावॅट नवीकरणीय ऊर्जेचे लक्ष्य निर्धारित केले असल्याने त्यादृष्टीने वाटचाल करण्याकरिता काही सेवानिवृत्त अभियंत्यांची निवड केली आहे आणि त्यांच्यासाठी दोन दिवसीय नवीकरणीय ऊर्जेसंबंधी प्रशिक्षणाचे आयोजन नाशिक प्रशिक्षण केंद्राने आयोजित केले. नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील तज्ञ, अनुभवी व्यक्तींनी या प्रशिक्षणपर कार्यक्रमात मार्गदर्शन केले. सदर प्रशिक्षाच्या उद्घाटन समारंभप्रसंगी मंचावर महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन, संचालक (प्रकल्प) मा. श्री. अभय हरणे, कार्यकारी संचालक (प्रकल्प) श्री. पंकज नागदेवते, मुख्य अभियंता (प्रशिक्षण) श्री. राजेश मोराळे तसेच मुख्य अभियंता (नवीकरणीय ऊर्जा-प्रकल्प) श्री. संजय कुऱ्हाडे, मुख्य अभियंता (नियामक व वाणिज्य कक्ष) श्री. प्रसन्न कोटेचा, श्री. दिलीप गुट्टे, श्री. हर्षल भास्करे, श्री. सतनाम महाले, श्री. बिरकु सिंह उपस्थित होते, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.











## मानव संसाधन व कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांची सक्षमीकरण परिषद (मल्हार-२०२३) संपन्न





महापारेषणच्या वतीने महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या तिन्ही वीज कंपन्यांतील मानव संसाधन व कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांची दोन दिवसीय सक्षमीकरण परिषद (मल्हार-२०२३) रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, भाईंदर येथे आयोजित करण्यात आली. या परिषदेत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक मा.श्री. विश्वास पाठक यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर महापारेषणचे संचालक (मासं) श्री. सुगत गमरे, महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादीकर, महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (मासं) श्री. धनंजय सावळकर, महापारेषणचे मुख्य व्यवस्थापक (मासं) श्री. सुधीर वानखेडे, महावितरणचे मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. भूषण कुलकर्णी तसेच तिन्ही वीज कंपन्यांतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

वर्ष १८ वे (अंक ७)

मे - ऑक्टोबर २०२३

# Maharashtra State Power Generation Company Limited

## MAY - OCTOBER 2023


### संचालक मंडळ

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक : डॉ. पी. अन्बलगन (भाप्रसे)
संचालक : श्रीमती. आभा शुक्ला (भाप्रसे)
संचालक (वित्त) : श्री. बाळासाहेब थिटे
संचालक (संचलन) : श्री. संजय मारुडकर
संचालक (प्रकल्प) : श्री. अभय हरणे
प्र. संचालक (खनिकर्म) : डॉ. धनंजय सावळकर
संचालक : श्री. विश्वास पाठक
संचालक : श्रीमती. स्वाती व्यवहारे



संपादक : **यशवंत मोहिते**
जनसंपर्क अधिकारी (महानिर्मिती)


## अनुक्रमणिका


| अनुक्रमणिका | लेखक / लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|
| महानिर्मिती - काल, आज आणि उद्या | प्रदिप जांभुळकर | ३ |
| आदर्श दिनचर्या व निरोगी जीवन जगण्याची कला | मुरलीधर गोहणे | १० |
| बाजीगर | संजय कुलकर्णी | १५ |
| Governor Tuning Work at Kanher HPS | Aditi Kharade | २६ |
| ओळख | अंकुश घनवट | ३१ |
| दिवाळी अंक आणि आपण | संतोष केंडे | ३४ |

### काव्यकुंज

पृष्ठ क्र. : १९ ते २३

**सहभाग :** वैशाली भावठाणकर, धर्मेंद्र कन्नाके, राजेश वऱ्हाडे, नितीन सोनवणे, सौ. तेजल पाटील, मधुकर दुफारे, प्रफुल्ल आवारे, आनंद कोंत, डॉ. फैजान खान, गितांजली झिरमुटे, संतोष पुरोहित

**सेवानिवृत्ती / निरोप** १८

### प्रशासकीय वृत्त

पृष्ठ क्र. : ६ ते ९, १२ ते १४, १७, २४ ते २५, २८ ते ३०, ३२ ते ३३, ३४ ते ३६



संपादन सहाय्य : **संतोष पुरोहित**

**मालकी**
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या.
प्रकाशगड, वांद्रे, मुंबई

श्री. यशवंत मोहिते यांनी
कार्यालय - **हेमा आर्टस्**
१२१, सागर, प्रभात इंडस्ट्रीयल इस्टेट,
दहिसर चेकनाक्याजवळ, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे,
दहिसर (पूर्व), मुंबई - ४०००६८ येथे छापून
प्रकाशगड, वांद्रे, मुंबई येथे प्रसिध्द केले.

**(खाजगी वितरणाकरिता)**



**The Company accepts no responsibility for the matter published in the Journal.**



**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
संपादक, सृजन
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,
दुसरा मजला, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : pro@mahagenco.in
संकेतस्थळ : www.mahagenco.in

# संपादकीय....

'सृजन' च्या अंकात आपणां सर्वांचे मन:पूर्वक स्वागत. दि. ६ जून रोजी आपण महानिर्मितीचा १८वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात राज्यभर साजरा केला. "संकर्षण व्हाया स्पृहा", "ऊर्जा शक्ती" हे कार्यक्रम उत्साहवर्धक ठरले. आगामी काळात महानिर्मिती औष्णिक वीज क्षेत्राकडून नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात पाऊल टाकत असल्याने प्रशिक्षित, ऊर्जावान आणि मल्टीटास्कींगसह सज्ज मनुष्यबळ ही काळाची गरज लक्षात घेऊन या अंकात मानव संसाधनविषयक उपक्रमांवर विशेष भर देण्यात आला आहे. आमच्यातील एक ज्येष्ठ भगिनी मुख्य अभियंता पदी विराजमान झाली आहे तर, 'होम मिनिस्टर' या लोकप्रिय मालिकेत महानिर्मिती महिलांचा सहभाग प्रेरणादायी आहे. मुख्य अभियंता भुसावळ यांनी आपल्या वाहन चालकाला स्वत: वाहन चालवून सेवानिवृत्ती निरोप दिला हा भावस्पर्शी प्रसंग या अंकात समाविष्ट केला आहे.

मानव संसाधन विभागातर्फे कोराडी आणि नाशिक प्रशिक्षण केंद्राने मनुष्यबळाला दिलेल्या प्रशिक्षणाचा तपशील देण्यात आला आहे. याचबरोबर प्रेरणादायी सुप्रसिध्द वक्ते श्री. सोनू शर्मा, गुंतवणूक व अर्थ नियोजनसारखे कार्यक्रम निश्चितच मनुष्यबळासाठी दिशादर्शक ठरले आहेत.

महानिर्मितीच्या विविध वीज केंद्रात 'हॅप्पी स्ट्रीट' 'आमचं गाव' हा कार्यक्रम लोकउत्सव ठरत आहे, ही देखील अतिशय आनंदाची बाब आहे.

आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत महानिर्मितीने विविध राज्यस्तरीय तसेच अंतर्गत स्पर्धा घेतल्या होत्या. सदर स्पर्धांचा बक्षिस वितरण समारंभ महानिर्मिती वर्धापन दिनी करण्यात आला. यामधील निबंध स्पर्धेतील तृतीय क्रमांकाचा निबंध या अंकामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. यानंतरच्या अंकात टप्प्याटप्प्याने द्वितीय व प्रथम क्रमांकाचे निबंध घेण्यात येईल. "काव्यकुंज" या सदरामध्ये नवीन कवी-कवयित्री यांच्या कवितांचा समावेश केला आहे. महानिर्मिती परिवारामधील आपणां सर्वांना आवाहन करण्यात येते की, महानिर्मितीच्या वसाहतीत आपले पाल्य लहानाचे मोठे झाले, व्यावसायिक शिक्षण घेऊन देश-विदेशात मोठ्या पदांवर किंवा व्यवसायात यशस्वी झाले "त्यांच्या जडणघडणीत महानिर्मितीचे योगदान" याबाबत आपल्या पाल्यांचे मनोगत लेखी अथवा व्हिडीओ स्वरुपात अवश्य पाठवावे, जेणेकरुन त्यास यथायोग्य प्रसिध्दी देण्यात येईल.

सर्वांनी या अंकाचा अवश्य आस्वाद घ्यावा, तसेच आपल्या प्रतिक्रिया pro@mahagenco.in या ई-मेल वर पाठवाव्यात, ही विनंती.

**- यशवंत मोहिते**

# महानिर्मिती : काल, आज आणि उद्या

– प्रदिप जांभुळकर
कनिष्ठ सुरक्षा अधिकारी (सुरक्षा विभाग),
कोराडी औ.वि. केंद्र

'आजादी का अमृत महोत्सव' निमित्त महानिर्मितीतर्फे राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर निबंध स्पर्धेतील तृतीय क्रमांक (विभागून) प्राप्त महानिर्मिती कर्मचाऱ्याचा निबंध. विजेत्या स्पर्धकांचे निबंध टप्याटप्याने उलट गुणांनुक्रमांनुसार यापुढील सृजन अंकात प्रसिद्ध केले जातील.

**महानिर्मितीचा उदय व विद्युत निर्मिती मध्ये मोलाचे योगदान :-**

मानव झोपेतून जागे होण्यापासून तर झोपेपर्यंत पूर्णपणे विद्युत उर्जेवर अवलंबून आहे. जगात आज विद्युत ऊर्जा जर नसेल तर अंधाधुंदी गोंधळ माजेल, जगात हाहाकार माजेल, जग अंधारात लोटले जाईल. सोप्या भाषेत बोलायचे झाल्यास जग एका जागी थांबून जाईल, ठप्प होईल. विकास होणे तर फार दूरची गोष्ट आहे. मानवी जीवनाचा विद्युत अविभाज्य भाग बनलेला आहे.

जश्या मानवी जीवनाच्या अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा आहेत तशीच विद्युत उर्जा ही देखील मानवाची मुलभूत गरज झालेली आहे. विजेमुळे मानवाचे जीवन अधिक सुखकर झालेले आहे. आज दवाखाने, कारखाने, सर्व प्रकारची वाहतूक व्यवस्था, घरातील व रस्त्यावरील विद्युत व्यवस्था इ. साठी विजेची गरज आहे. विजेशिवाय आपण आपल्या जीवनाची कल्पनाच करू शकत नाही.

भारतीय राज्यघटनेच्या समवर्ती सूचीमध्ये विद्युतचा समावेश करण्यात आलेला आहे. १९६० ते २००५ पर्यंत राज्यातील विजेची निर्मिती, तिचे पारेषण व वितरण करण्याचे काम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) कडे होते. त्यावेळेस विद्युत क्षेत्राचे खासगीकरण न झाल्यामुळे MSEB ची वीज क्षेत्रात एकाधिकारशाही होती त्यामुळे MSEB च्या नफा व तोट्यामध्ये निर्मिती, वितरण, पारेषण यांच्यामध्ये ताळमेळ नव्हता. निर्मितीमध्ये तेव्हा MOD तत्त्व नव्हते व नाही PLF तत्त्वाचे पालन केल्या जात होते. परंतु विद्युत कायदा २००३ नुसार विद्युत क्षेत्राचे खासगीकरण करण्यात आले. विद्युत कायदा २००३ नुसार दि. ६ जून २००५ रोजी महानिर्मिती अस्तित्वात आली. तेव्हा संचाची संख्या कमी, विद्युत निर्मिती कमी होती. नवीन तंत्रज्ञानानुसार संच नव्हते. आज महानिर्मितीने राज्यातील लोकांपर्यंत वीज पोहोचवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून जास्त विद्युत निर्मिती क्षमतेचे नवीन संच निर्माण केलेले आहेत व राज्याची विजेची गरज लक्षात घेता नवीन प्रकल्प उभारण्याचे नियोजित आहे.

**महानिर्मितीचे उद्दिष्टे :-** सामाजिक जबाबदारीने स्पर्धात्मक दराने शाश्वत आधारावर महाराष्ट्रासाठी पुरेशी वीज निर्माण करणे.

महानिर्मितीने दि. ०९ मार्च २०२१ रोजी १०,४४५ मेगावॅट इतकी विक्रमी वीज निर्मिती साध्य करून ६० वर्षातील उच्चांक गाठला. आज महाराष्ट्रात जेवढी वीज निर्माण होते, त्यापैकी मोठा हिस्सा एकट्या महानिर्मितीचा आहे. महानिर्मिती ही देशामध्ये दुसऱ्या क्रमांकाची विद्युत निर्मिती कंपनी आहे. महाराष्ट्र हे वीज निर्मितीत सर्वात आघाडीचे राज्य आहे. महाराष्ट्र राज्याचा लॉकडाऊन पूर्वीचा विचार केला तर दिवसाला सरासरी २२,००० मेगावॅट इतकी विजेची गरज होती. महानिर्मितीची स्थापित क्षमता ही १३,१८६ मेगावॅट इतकी आहे. त्यात औष्णिक विद्युत क्षमता ९,७५० मेगावॅट जल विद्युत क्षमता २,५८० मेगावॅट, वायुविद्युत क्षमता ६७२ मेगावॅट तसेच सौर विद्युत क्षमता १८४ मेगावॅट इतकी आहे. महानिर्मिती व्यतिरिक्त राज्यात इतरही कंपनीद्वारे विद्युत निर्माण केल्या जाते. विद्युत निर्मिती करीत असताना महानिर्मितीस वेगवेगळ्या आव्हानांना / समस्यांना सामोरे जावे लागते, त्या पुढीलप्रमाणे :-

**महानिर्मिती समोरील आव्हाने :-**

**१) व्यावसायिक आव्हान / समस्या पुढीलप्रमाणे :-**

- कोळसा साठा हा मर्यादित आहे. भारतात तो ४० ते ५० वर्ष टिकेल एवढाच आहे, त्यामुळे संचाला विद्युत निर्मिती करण्यास नियमित व चांगल्या दर्जाचा कोळसा पुरवठा होणे हे मोठे आव्हान आहे. बरेच वेळा कोळश्याअभावी संच बंद करावे लागतात.
- महानिर्मितीवर आंतरराष्ट्रीय पातळीवरून वेगवेगळया वित्तीय संस्थेचे कर्ज आहे. कर्जाची परतफेड करणे व पतपुरवठ्याचे योग्य नियोजन हे महानिर्मिती समोर मोठे आव्हान आहे.
- महानिर्मितीने स्वत:साठी खाणी विकत घेतल्या आहेत उदा. गरेपालमा त्या खाणीचे व्यवस्थापन करणे.
- वीज क्षेत्रात स्पर्धा असल्यामुळे विजेची योग्य गुणवत्ता व दर टिकवून ठेवणे हे एक आव्हान.
- वेगवेगळ्या प्रकारे स्थानिक पातळीवर राजकीय हस्तक्षेप होऊन कामास अडथळा होऊन उशीर होणे.
- शासनाच्या धोरणानुसार अतिशय जुन्या झालेल्या संचास जर बंद करावे लागले तर तेथे काम करणारे कामगार हे बेरोजगार होतात. त्यांची बेरोजगारीची समस्या सोडवणे.
- बऱ्याच वेळा दुष्काळामुळे पाण्याची समस्या निर्माण होते. त्यावेळेस संचास लागणारे पाणी शहरास पुरवावे लागते व त्या परिस्थितीत संच बंद करावे लागतात. पाण्याचे योग्य नियोजन करणे.

- MOD तत्त्वात टिकून राहून वीज निर्मिती करणे.
- कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे उपलब्ध असणाऱ्या कर्मचाऱ्यास अतिरिक्त काम करावे लागल्यामुळे त्या कर्मचाऱ्यांच्या शरीरावर व मनावर खूप ताण पडतो. त्यातून कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची व कर्मचारी कमतरतेची समस्या दूर करणे.
- संच परिसरातून निर्माण राखेची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे.
- संच परिसरात स्थानिक पातळीवर असणारे कंत्राटी कामगार त्यांची विविध संघटना, प्रकल्पग्रस्त या सर्वांचे वेळोवेळी होणारे आंदोलने याला प्रशासनाला समोरे जावे लागते.
- महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाकडून प्राप्त होणारे आदेश, सूचना याचे अधिन राहून विद्युत निर्मिती करणे.
- महावितरणाला दिलेली वीज त्या मोबदल्यात मिळणारे पैसे लवकर मिळत नाही. अजूनही हजारो कोटी रूपये महावितरणकडे थकबाकी आहे, तसेच आपलेही बाहेरचे देणे बाकी आहे.
- विद्युत गळती कमी करणे.
- विजेची मागणी कमी जास्त होत असते त्यावेळी तिचे योग्य नियोजन करून वीज पुरवठ्यात संतुलन राखणे.
- जिथे अनावश्यक खर्च होतो त्या गोष्टी शोधून त्यावर योग्य उपाय शोधणे.
- संचासाठी पाण्याचे नियोजन करून त्याचा योग्य वापर करणे.
- तेलाची खपत नियंत्रित ठेवणे.
- कंत्राटदाराचे देयके निर्धारित वेळेवर देणे.
- कोल लिंकेजचे योग्य नियोजन व व्यवस्थापन करणे.
- कर्मचाऱ्याचे निवासी वसाहतीमध्ये गाळ्याची, पाण्याची, रस्त्याची व इतर भरपूर समस्या आहेत.
- महाजेनकोच्या तोट्याचे कारणे शोधून त्यावर उपाययोजना करणे.

इ. व्यावसायिक आव्हाने आहेत.

२) <u>**तांत्रिक आव्हान / समस्या पुढीलप्रमाणे**</u> :-

महानिर्मितीसमोर जे प्रमुख आव्हाने आहेत त्यातील तांत्रिक आव्हाने हे एक आहे. आजच्या स्पर्धेत महानिर्मितीला टिकून राहायचे असेल तर तिला नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा लागणार आहे.

- नवीन तंत्रज्ञानानुसार प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे.
- कमी मनुष्यबळात जास्तीत जास्त विजेचे उत्पादन घेणे.
- बरेचदा कोळसा वाहतुक पुरवठादारास विलंब शुल्क (Demurrage) मोठया प्रमाणात द्यावा लागतो तो कमी करणे.
- आपला आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवून तो प्रत्येकाकरिता आरोग्यमय ठेवणे.
- संचलन व व्यवस्थापन खर्चात कपात करणे.
- वीज पुरवठ्याचा दर्जा चांगला ठेवणे.
- महाजेनकोच्या मालमत्तेची सुरक्षा करणे.
- विदेशातून आयात कोळश्याची किंमत जास्त असल्यामुळे त्याचे योग्य नियोजन करून वापर करणे.
- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (MERC) ठरवून दिलेल्या नियमकांत राहून विद्युत निर्मिती करणे.
- महाराष्ट्रात अपारंपारिक उर्जा स्त्रोतापासून विद्युत निर्मिती करणे ते फार खर्चिक असल्यामुळे त्याचे नियोजन करणे.
- जुन्या झालेल्या संचाची कार्यक्षमता कमी झाल्यामुळे MOD तत्त्वानुसार त्यामधून वीज निर्मिती करणे त्याचे संचलन व देखभालीचा खर्च त्याची कोळश्याची खपत खूप जास्त असते, या बाबीचे नियोजन करून ऊर्जा निर्मिती करणे.
- MERC कडून प्राप्त होणाऱ्या सूचनेनुसार PLF मध्ये सुधारणा करणे.

इ. तांत्रिक आव्हाने आहेत.

३) <u>**सामाजिक आव्हान / समस्या पुढीलप्रमाणे**</u> :-

नवीन प्रकल्प आल्यामुळे स्थानिक लोकांच्या शेतीपूरक जमिनी प्रकल्पात जातात. तेथील जनता विस्थापित होते. त्यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होतो.

- रोजगार मिळवून देणे व नोकरीत सामावून घेणे.
- निवाऱ्याची व्यवस्था, शाळा, दवाखाना इ. मुलभूत व्यवस्था निर्माण करून देणे.
- नवीन प्रकल्पाची कामे सूरू असताना स्थानिक लोकांचा हस्तक्षेप त्याला समोरे जाणे.
- नवीन प्रकल्पाकरिता जागा हस्तांतरण करण्याचे आव्हान.
- आजुबाजूच्या परिसराचा सर्वंकष विकास करणे.

४) <u>**पर्यावरणीय आव्हान / समस्या पुढीलप्रमाणे**</u> :-

आज महानिर्मितीसमोर भरपूर आव्हाने आहेत, त्यातील मुख्य आव्हान म्हणजे पर्यावरणपूरक ऊर्जा निर्मिती करणे. पर्यावरण व विकास हे परस्परपूरक असायला पाहिजे परंतु, **"जिथे विकास तेथे पर्यावरणाचा ऱ्हास"**, अशीच परिस्थिती आज दिसत आहे. औष्णिक विद्युत केंद्रामुळे पुढील पर्यावरणीय समस्या निर्माण होतात. ह्या समस्या दूर करण्याचे आज महानिर्मितीसमोर मोठे आव्हान आहे.

- वायुप्रदूषण : श्वसनाचे विकार.
- जलप्रदूषण : संच परिसरातून निर्माण होणारी राख, ऑईल जर नदी, नाल्यात, तलावात मिसळली तर त्यात असणारे जलचर मरतात, तेथील जैवविविधता नष्ट होण्याची समस्या निर्माण होते ते पाणी पिण्यास योग्य राहत नाही.
- ध्वनी प्रदूषण : कर्ण बधिरता.
- जमीन (माती) प्रदूषण : संच परिसरातील राख आजुबाजूच्या

शेतजमिनीत मिसळल्यास शेतजमीन पिक घेण्यास काही काळ योग्य राहत नाही.

- पृथ्वीच्या तापमानात वाढ होत आहे त्यालाच ग्लोबल वॉर्मिंग असे म्हणतात. संपूर्ण जग आज या समस्येला तोंड देत आहे.
- जागतिक तापमान वाढीसाठी जीवाश्म इंधनाचे ज्वलन आणि अतिवृक्ष तोड या दोन बाबी कारणीभूत आहेत. या तापमान वाढीस हरितगृह वायु उत्सर्जन कारणीभूत आहेत.

| हरितगृह वायु | | तापमान वाढ |
|---|---|---|
| १) कार्बनडाय ऑक्साईड ($CO_2$) | – | ६०% |
| २) मिथेन ($CH_4$) | – | २०% |
| ३) क्लोरोफ्लोरो कार्बन (CFC) | – | १४% |
| ४) नायट्रस ऑक्साईड ($N_2O$) | – | ६% |

**हरित गृह वायुचे अधिक उत्सर्जन करणारे देश :–**

| | | |
|---|---|---|
| १) चीन | – | २८% |
| २) अमेरिका | – | १६% |
| ३) युरोपीय संघ | – | १०% |
| ४) भारत | – | ६.२५% |
| ५) रशिया | – | ४.५% |

आपणांस लक्षात येईल की, तापमानात झालेली वाढ मनुष्यनिर्मित आहे. तापमान वाढ जर अशीच होत राहिली, तर मानवी समाज व निसर्गातील परिसंस्था वेगाने होणाऱ्या हवामान बदलाशी जुळवून घेवू शकणार नाही. आंतरराष्ट्रीय ऊर्जा समितीच्या मते १.३ अब्ज लोकसंख्या असलेल्या भारतात आगामी २० वर्षामध्ये विजेची आवश्यकता इतर सर्व देशांपेक्षा अधिक असेल त्यामुळे भारतातर्फे अधिक हरितगृह वायुचे उत्सर्जन होईल. जगासोबत भारताने सुध्दा या आव्हानास तोंड देण्यासाठी नियोजित व कालबध्द कार्यक्रम आखलेला आहे. तो महानिर्मितीस बंधनकारक असेल.

विद्युत निर्मिती करीत असतांना महानिर्मितीला सामाजिक उत्तरदायित्वापोटी वेगवेगळे समाजोपयोगी कामे करावी लागतात.

**महानिर्मितीच्या सामाजिक उत्तरदायित्वाचे ध्येय पुढीलप्रमाणे :–**

स्थानिक समुदाय तसेच महानिर्मिती कंपनीचे कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांच्याशी निगडित सामाजिक व आर्थिक विकास करण्यासाठी सक्रिय योगदान देणे जेणेकरून, त्यांच्या जीवनाचा दर्जा सुधारणे आणि राज्यातील मानव निर्देशांक उंचावणे. कंपनीच्या विषयाच्या धोरणात शिक्षण, पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा, आरोग्याची निगा, पर्यावरण, सामाजिक सबलीकरण, पायाभूत सोयीचा विकास करणे, खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम या क्षेत्रात लक्ष केंद्रीत केले जाईल. कंपनीच्या प्रकल्पाच्या परिसरातील समुदायाची जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रगती व्हावी तो समृद्ध व्हावा यासाठी सर्वांगीण विकासाचा काम करण्याचा प्रयत्न राहील.

सामाजिक उत्तरदायित्वाचे महानिर्मितीचे उदाहरण घ्यायचे झाल्यास तत्कालिन कोरोना महामारीच्या काळात महानिर्मितीने समाजोपयोगी केलेले कार्य :–

१) कोराडी येथे २० खाटांचे कोविड हॉस्पिटल निर्मिती.
२) 'मिशन ऑक्सिजन' अंतर्गत सरकारी दवाखान्यात ऑक्सिजन प्लांटची उभारणी.
३) रक्तदान शिबिरे घेतली.
४) परप्रांतीय मजुरांना भोजनदान दिले.
५) मुख्यमंत्री सहाय्यता निधीत १.२ कोटी रूपयांची मदत केली.

अशाप्रकारे महानिर्मितीच्या सामाजिक उत्तरदायित्वापोटी केलेल्या कामांची यादी खूप मोठी होऊ शकते. मान्य आहे आज महानिर्मितीसमोर वेगवेगळ्या प्रकारची आव्हाने आहेत. परंतु, महानिर्मिती त्यांना समर्थपणे सामोरे जाऊन आपला विकास करीत आहे.

**महानिर्मितीतर्फे वेगवेगळया उपाययोजना एक नवीन आशावाद :–**

वेगवेगळ्या प्रकारच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी महानिर्मितीतर्फे पुढीलप्रमाणे पावले उचलली जात आहेत :

- पर्यावरण संतुलन राखून शाश्वत विद्युत निर्मितीसाठी महानिर्मितीने 3R (Reduce, Reuse, Recycle) हे तत्त्व अवलंबिले आहे. संचांमधून होणारे प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी महानिर्मिती भविष्यात 'FGD' तंत्रज्ञान संचांमध्ये बसविणार आहे.
- संच परिसरातून निर्माण होणाऱ्या राखेचा वापर व व्यवस्थापन करण्याकरिता महानिर्मितीने कार्यवाही सुरु केली आहे.
- वीज पुरवठ्याची विश्वासार्हता आणि परवडणारी वीज हे दोन मुद्दे निकालात काढण्यासाठी पारंपारिक विजेसोबत अपारंपारिक वीज पुरवठ्यावर भर देण्यात येत आहे.
- विद्युत केंद्राला पर्यावरणपूरक व सुरक्षित कोळसा पुरवठा करण्यासाठी पाईप कन्व्हेयरचा वापर करण्यात येत आहे.
- ERP/SAP प्रणालीचा योग्य वापर करून कंपनीच्या व्यवहारात सुत्रबध्दता आली.
- ई–टेंडरींगमुळे कामात पारदर्शता आली.

व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून महानिर्मितीच्या मालमत्तेमधून आर्थिक मिळकत मिळवण्याचा प्रयत्न केल्यास महानिर्मितीला आर्थिक प्रपंचाकरिता मोठा हातभार लागू शकतो.

- महानिर्मितीचा पर्यावरण संवर्धनाचा ३ बिंदू कार्यक्रम :
  १) शून्य सांडपाणी सोडणे.
  २) MOEF व CC च्या धोरणानुसार विशिष्ट पाणी वापराचे मानदंड साध्य करणे.
  ३) MPCB / MOEF आणि CC नियमानुसार SPM पातळी मर्यादित करण्यासाठी सर्व ESP फिल्टरची उपलब्धता ९५% आणि त्याहून अधिक करणे.

ह्या आहेत महानिर्मितीतर्फे नवीन आशावाद निर्माण करणाऱ्या विविध उपाययोजना.

जागतिक तापमान वाढ कमी करण्याकरिता भारताने पंचामृत योजनेची घोषणा केली ती पुढीलप्रमाणे :-

१) भारत आपल्या गैरजीवाश्म ऊर्जा क्षमतेला २०३० पर्यंत वाढवून ५०० गिगावॅट करणार आहे.

२) भारत २०३० पर्यंत अक्षय उर्जेने आपली ५०% विजेची आवश्यकता पूर्ण करणार आहे.

३) भारत २०३० पर्यंत कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करेल.

४) भारत २०३० पर्यंत कार्बन तीव्रता ४५% कमी करेल.

५) भारत २०७० पर्यंत कार्बनचे शून्य उत्सर्जन करणार.

भारताने सन २०२२ च्या अर्थसंकल्पात सौर ऊर्जा निर्मितीसाठी १९,५०० कोटी रूपयांची भरीव तरतूद केली आहे. पर्यावरण मंत्रालयासाठी ५.६% नी अर्थसंकल्पीय तरतूद वाढवलेली आहे. जागतिक तापमान वाढ १.५ अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवण्यासाठी जगाने कर्बवायुचे प्रमाण ४५% कमी करून तापमान वाढ २०३० पर्यंत पूर्ण नियंत्रित करण्याचे ठरविले आहे. कोळसा आधारित सर्व वीज प्रकल्प २०५० पर्यंत पूर्ण बंद करून कर्बवायु उत्सर्जन पूर्ण कमी करण्याचा निर्णय जगाने घेतला आहे.

पर्यावरणपूरक आदेश/सूचना ह्या महानिर्मितीकरिता बंधनकारक असतात व त्यानुसारच महानिर्मितीला वर्तमानात व भविष्यात ऊर्जा निर्मितीचे कार्य पार पाडावे लागते. सर्व प्रकारच्या समस्या सोडविण्याचा महानिर्मिती जाणीवपूर्वक प्रयत्न करत असून त्यामध्ये महानिर्मितीने बऱ्याच अंशी यश मिळविले आहे. विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यासाठी महानिर्मिती नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांना परवडेल अशी पर्यावरणपूरक वीजनिर्मिती करण्यास कटिबध्द आहे.

देशात कोळसा व नैसर्गिक वायु वापरून वीज निर्मिती केली जाते. दोन्ही संसाधने मर्यादित आहेत. ती भविष्यात संपणारी आहेत. त्यामुळे आपण विजेचे जतन केले पाहिजे. आज वीज बचत करणे मोठे आव्हान बनत चालले आहे. विजेशिवाय मानव जीवनाची कल्पना करणे अशक्य आहे. वीज मानवजातीची मोठ्या प्रमाणात सेवा करते, तिचा संतुलित वापर करणे गरजेचे आहे. अनावश्यक विजेचा वापर टाळला पाहिजे. सौर ऊर्जेचा वापर केला पाहिजे आजची वीज बचत भविष्यात कामी पडू शकते.

आज आपला देश 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' साजरा करीत आहे. देशाला विकास साधायचा असेल तर विद्युत ऊर्जेशिवाय पर्याय नाही. विद्युत निर्मिती करून महानिर्मितीचा राष्ट्र निर्मितीमध्ये सिंहाचा वाटा असणार आहे. आपण भारताचे सूज्ञ नागरिक म्हणून जाणीवपूर्वक कृती केली पाहिजे.

चला, तर मग आपण सर्व भारताचे नागरिक स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पर्यावरणपूरक कृती करून विजेचा वापर जाणीवपूर्वक करून राष्ट्रनिर्मितीसाठी हातभार लावू या.

जय हिंद ! जय भारत ! जय महानिर्मिती !

******

## प्रकाशगड मुख्यालयात महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे हस्ते महाराष्ट्र दिन साजरा

महानिर्मिती व महावितरण या कंपन्यांचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगड येथे महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी महानिर्मितीचे संचालक (संचलन) श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) श्री. अभय हरणे, मुख्य अभियंता श्री. राकेश जनबंधू, मुख्य औद्योगिक संबध अधिकारी श्री. संजय ढोके यांच्यासह महानिर्मिती व महावितरण या कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## महानिर्मिती च्या प्रथम महिला मुख्य अभियंता म्हणून श्रीमती. विजया रवींद्र बोरकर

विदर्भातील यवतमाळ जिल्ह्याच्या रहिवाशी असलेल्या श्रीमती. विजया रवींद्र बोरकर यांची महानिर्मितीच्या मुख्य अभियंता पदी निवड झाली असून महानिर्मितीमध्ये मुख्य अभियंता पदी महिला विराजमान होण्याची ही प्रथमच वेळ आहे. यापूर्वी उप मुख्य अभियंता या पदापर्यंत महिला अधिकाऱ्यांनी काम केले आहे, मात्र आता हा बहुमान प्रथमच श्रीमती. विजया रवींद्र बोरकर यांनी पटकावला आहे. मुख्यालय मुंबई येथे मुख्य अभियंता (प्रकल्प व्यवस्थापन गट) येथे त्यांची पदस्थापना झाली आहे. त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

श्रीमती. विजया बोरकर यांनी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथून बी.ई. (इलेक्ट्रिकल्स) परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर नागपूर विद्यापीठातून ऊर्जा व्यवस्थापन प्रणालीत एम.टेक. परीक्षेत गुणवत्ता यादीत द्वितीय क्रमांक पटकावला.

तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात सन १९९३ मध्ये कनिष्ठ अभियंता या पदी रुजू झाल्यानंतर कधी थेट भरतीद्वारे तर कधी पदोन्नतीवर महानिर्मिती कंपनीत विविध पदे भूषवित कोराडी आणि चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात त्यांनी विद्युत परिरक्षण, चाचणी, उपकरण व नियंत्रण विभागात विशेषत: वसाहत, २१० मेगावॅट, ५०० मेगावॅट येथे काम केले. वीज उत्पादन क्षेत्रातील संचलन व सुव्यवस्था विषयक तांत्रिक कामांचा प्रदीर्घ अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. मागील सुमारे दोन वर्षांपासून चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात उप मुख्य अभियंता २१० मेगावॅट या पदाची धुरा त्यांनी यशस्वी सांभाळली आहे.

वीज क्षेत्रातील अग्रगण्य अशा महानिर्मिती कंपनीमध्ये काम करीत असल्याचा त्यांना सार्थ अभिमान असून दररोज नवनवीन गोष्टी शिकायला मिळत असल्याने महानिर्मिती हे ज्ञानाचे विद्यापीठ असल्याचे श्रीमती. विजया बोरकर यांनी सांगितले. त्यांना गायनाची आणि वाचनाची विलक्षण आवड आहे.

"महिलांमध्ये काम करण्याची प्रचंड क्षमता आहे. सातत्य कधीही सोडू नका, कम्फर्ट झोनमधून बाहेर पडा, सहकारी पुरुष कर्मचाऱ्यांपासून स्वत:ला वेगळे समजण्याची गरज नाही. जर तुम्ही कष्टाळू असाल, स्वप्रेरित असाल तर यश तुमचेच आहे", असा व्यक्तिगत संदेश त्यांनी महानिर्मितीमध्ये कार्यरत समस्त महिला भगिनींना या निमित्ताने दिला आहे.

## महानिर्मिती कंपनीच्या १८व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून "संकर्षण व्हाया स्पृहा" या दिलखुलास मनोरंजनपर कार्यक्रमाची प्रस्तुती

वीज उत्पादनाच्या प्रक्रियेत अविरत परिश्रम करणाऱ्या मनुष्यबळाच्या मनोरंजनासाठी नुकतेच मुख्यालयात "संकर्षण व्हाया स्पृहा" या कविता, किस्से आणि आठवणींवर आधारित कार्यक्रम प्रामुख्याने गतिमान प्रशासन मानव संसाधन या संकल्पनेनुसार महानिर्मिती वर्धापन दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कार्यकारी संचालक (मासं) डॉ. धनंजय सावळकर यांनी भूषविले. डॉ. सावळकर म्हणाले की, "धकाधकीच्या जीवनात हल्ली मनमोकळेपणाने हसायला, व्यक्त होण्याकरिता वेळ कमी पडतोय. अशा वातावरणातून बाहेर पडायचे झाल्यास निखळ मनोरंजन देणारी कलाकृती गरजेची वाटते. तणाव हलका करणारी ही मेजवानी", असल्याचे त्यांनी सांगितले.

शालेय जीवनापासून प्रत्येकाचा कवितेशी संबंध येतो, पण तेव्हा या कविता फक्त मराठी भाषा आणि अभ्यासापुरत्याच मर्यादित राहतात. बालकवी, कुसुमाग्रज, ग. दि. माडगूळकर, बहिणाबाई चौधरी, शांता शेळके सारख्या अनेक दिग्गज कवींच्या ठराविक कविताच आपल्याला माहीत आहेत. परंतु, आपल्या वयाच्या प्रत्येक टप्प्याशी निगडित अतिशय समर्पक कविता-किस्से आणि गोष्टी एकत्रित करून त्यात मनोरंजनाची जोड देऊन नव्या फॉर्मेमध्ये गुंफण्याचा अभिनव प्रयत्न संकर्षण कऱ्हाडे आणि स्पृहा जोशी यांनी "संकर्षण व्हाया स्पृहा" या कार्यक्रमातून केला आहे.

दर्जेदार कविता, प्रभावी सादरीकरण, आणि आठवणींच्या जोरावर संकर्षण कऱ्हाडे आणि अभिनेत्री स्पृहा जोशी यांनी ही मैफल गाजवली. यामध्ये दिग्गज कवींच्या काही अपरिचित सुंदर कविता रसिक प्रेक्षकांना ऐकायला मिळाल्या, कधी सादरीकरणाच्या माध्यमातून तर कधी छानशा गाण्यातून. अलगद सादर होणारी एखादी कविता डोळ्यांच्या कडा कधी ओल्या करते समजतच नाही. संकर्षण आणि स्पृहा यांचेकडे अतिशय तरलपणे कविता सादर करण्याची हातोटी असून सलग अडीच तास रसिक प्रेक्षकांना भरभरून आनंद देणारा हा कार्यक्रम आहे.

शब्द आणि भाव यांचा योग्य मेळ कवितेत असतो. त्यांच्या स्वरचित कविताही आशयपूर्ण आहेत. काही कविता त्यांनी लहानपणी, कॉलेज जीवनात लिहिलेल्या आहेतए पण आजही ऐकताना त्या कालसुसंगत वाटतात. कार्यक्रमात कोणताही बडेजाव नाही. भव्य सेट्स नाहीत की साथीला फार वाद्य, प्रकाशयोजना नाही. फक्त दोन वादक साथीदार घेऊन स्पृहा, संकर्षण अडीच – तीन तास प्रेक्षकांना खिळवून ठेवतात. 'साधं ते पौष्टिक' आणि चवदार ही युक्ती या कार्यक्रमाच्या बाबतीत तंतोतंत लागू पडते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक म्हणून मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. आनंद कोंत यांनी जबाबदारी सांभाळली तर सूत्रसंचलन सौ. सोनाली चुंगडे यांनी केले.

## "गुंतवणुकीद्वारे अर्थनियोजन" लोकसत्ता आणि महानिर्मितीचा संयुक्त अभिनव उपक्रम

गुंतवणूकदार जागरूकता आणि शिक्षणासाठी 'लोकसत्ता' द्वारे सुरू असलेल्या मालिकेतील हे विशेष सत्र 'महानिर्मिती'च्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आले. आय.सी.आय.सी.आय. प्रुडेन्शियल म्युच्युअल फंड प्रायोजित 'लोकसत्ता-अर्थसल्ला' उपक्रम दि. ३१ ऑगस्ट २०२३ रोजी प्रेक्षागृह, प्रकाशगड, सांघिक कार्यालय, मुंबई येथे संपन्न झाला. या निमित्ताने 'महानिर्मिती' च्या कर्मचाऱ्यांना अर्थतज्ज्ञांशी संवाद साधण्याची आणि मनांतील प्रश्न विचारण्याची संधी उपलब्ध झाली हे विशेष. महानिर्मिती मानव संसाधन विभागाच्या पुढाकाराने गतिमान प्रशासन-मानव संसाधन या संकल्पनेवर आधारित हा लोकशिक्षणपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

आव्हानात्मक बाह्य स्थितीतही जागतिक पातळीवरील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताचे वेगळेपण उठून दिसणारे आहे. या परिणामी मागील काळात 'सेन्सेक्स'ची भुरळ घालणारी उच्चांकी घोडदौड आपण अनुभवली. अभूतपूर्व उंची गाठलेल्या या बाजारात सध्या तेजी-मंदीचा लपंडाव सुरू असून, उत्साह आणि भीती यात हेलकावे घेणाऱ्या गुंतवणूकदारांच्या मनातील संभ्रमाचे निवारण 'लोकसत्ता अर्थसल्ला' उपक्रमाद्वारे तज्ज्ञ सल्लागारांकडून करण्यात आला.

या कार्यक्रमाला महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अन्बलगन, संचालक (वित्त) श्री. बाळासाहेब थिटे यांनी यथोचित मार्गदर्शन केले.

वाढती महागाई, वाढलेले कर्जाचे व्याजदर असे सर्वसामान्यांपुढे दुहेरी संकट उभे ठाकले आहे. अशा स्थितीत पैशाने पैसा वाढवायचा तर गुंतवणूक करावीच लागेल. तथापि, गुंतवणूक म्हणजे जोखीम घेणे आले. मात्र बाजार अस्थिरता आणि जोखमीला मात देणाऱ्या गुंतवणुकीच्या वेगवेगळ्या पर्यायांसह समग्र आर्थिक नियोजनावर अर्थ-अभ्यासक व वित्तीय नियोजनकार श्री.कौस्तुभ जोशी यांचे मार्गदर्शन सर्वांसाठी उपयुक्त ठरले. महिन्याकाठी खर्च वजा जाता गाठीशी राहणाऱ्या पैशाच्या संवर्धनाच्या अर्थात गुंतवणुकीची आनंददायी अनुभूतीची उदाहरणेही त्यांनी मांडली.

सेवनिवृत्तीनंतरचे जीवन आणि वाढता खर्च, आर्थिक गरजा आणि असमाधानाचे चक्र, गुंतवणूकीत सातत्य, दूरदृष्टी, गुंतवणुकीची अचूक वेळ, कशात किती आणि कधी गुंतवायचे त्याचे वयोमानपरत्वे सूत्र, संपत्तीची पुनर्रचना यावर त्यांनी तपशीलवार माहिती दिली. सोबतच दागिने, डिजिटल गोल्ड, विमा, विम्याचे विविध प्रकार, एकाधिकारशाही, निवड आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन अतिशय महत्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तर श्री. तांबे यांनी म्युच्युअल फंड संदर्भात उपयुक्त माहिती दिली. अभिनव अशा या कार्यक्रमास भरगच्च उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्य महाव्यवस्थापक (मासं) यांनी समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळली.

## INHOUSE REFRESHER TRAININGS COMPLETED IN NASHIK TRAINING CENTRE FROM APRIL 2023 TO NOVEMBER 2023

| Sr. No. | Training Name / Course Title | For Whom | Total Participants |
|---|---|---|---|
| | **April 2023** | | |
| 1 | Induction Level Training NT-80 | Technicians | 27 |
| 2 | Training workshop on "HRSP Upgradation & Testing of RTR Module" (Need Based) | HR Staff | 14 |
| 3 | Induction Level Training NT-81 | Technicians | 28 |
| | **May 2023** | | |
| 4 | Induction Level Training NT-81 | Technicians | 28 |
| | **June 2023** | | |
| 5 | Induction Level Training NT-81 | Technicians | 28 |
| 6 | Induction Level Training NT-82 | Technicians | 18 |
| 7 | SAP-SRM-PTP Module (Hybride Mode) | All Staff | 32 |
| 8 | Processing of New Rail-Sea-Rail (RSR) mode in SAP-FMP Module (Need Based) | Engineers, Chemist & Accounts | 15 |
| 9 | Safety Hazards & Fire Fighting (SAFE) (online) | All Staff | 34 |
| 10 | Retirement Planning | All Staff | 20 |
| | **July 2023** | | |
| 11 | Induction Level Training NT-82 | Technicians | 18 |
| 12 | Deviation Settlement Mechanism | Engineers | 72 |
| 13 | SAP-EDM -PTS | Engineers & Chemist | 25 |
| 14 | Solar Orientation Program | Solar and MERL Staff | 72 |
| | **August 2023** | | |
| 15 | Induction Level Training NT-82 | Technicians | 18 |
| 16 | Induction Level Training NT-83 | Technicians | 23 |
| 17 | Management Development Programme | Middle Management of all cadres | 15 |
| 18 | SAP-EAM | All Staff | 11 |
| 19 | ISO 9001:2015 Awareness* | All Staff | 16 |
| 20 | DPR Preparation | Engineers, Chemist, Civil, Accounts | 24 |
| | **September 2023** | | |
| 21 | Induction Level Training Batch for LDC (HR) | LDC HR | 21 |
| 22 | Financial, Commercial & Regulatory Matters | Engineers, Chemist & Accounts | 32 |
| 23 | Plant Maintenance & Operation of 500 MW (Online) for Technicians | Technicians | 20 |
| 24 | SAP FICO Module | All Staff | 19 |
| | **October 2023** | | |
| 25 | Induction Level Training NT-79 (Final Assessment) | Technicians | 24 |
| 26 | SAP – RTR Module | Accounts Staff | 17 |
| 27 | MSPGCL Service Regulation | All Staff | 22 |
| 28 | HR & Account Matters for Middle Management | All Staff | 20 |
| | **November 2023** | | |
| 29 | Induction Level Training NT-80 (Final Assessment) | Technicians | 27 |
| 30 | Right To Information Act (RTI) | All Staff | 22 |
| 31 | POSH Act 2013 (Prevention of Sexual Harassment at Workplace) | POSH Committee Members | 33 |
| 32 | Accounting Policies, Direct & Indirect Taxation and Costing | Accounts Staff | 21 |

## INHOUSE REFRESHER TRAININGS COMPLETED IN KORADI TRAINING CENTRE FROM APRIL 2023 TO NOVEMBER 2023

| Sr. No. | Training Name / Course Title | For Whom | Total Participants |
|---|---|---|---|
| | **April 2023** | | |
| 1 | Induction Level Technician Batch KT-80 | Technicians | 30 |
| 2 | GeM | All Cadres | 29 |
| 3 | Supercrtitical Technology for Engineers | Engineers | 10 |
| | **May 2023** | | |
| 4 | Induction Level Technician Batch KT-80 | Technicians | 30 |
| 5 | Induction Level Technician Batch KT-79 | Technicians | 31 |
| 6 | Induction Level Engineer Batch K-94 | Engineers | 11 |
| 7 | Orientation Training of Chemist | Chemist | 14 |
| | **June 2023** | | |
| 8 | Induction Level Engineer Batch K-94 | Engineers | 11 |
| 9 | Orientation Training of Chemist | Chemist | 14 |
| 10 | Induction Level Technician Batch KT-81 | Technicians | 27 |
| 11 | Vacation Training for Engineering Student Batch VT -109 | Engineers | 92 |
| | **July 2023** | | |
| 12 | Induction Level for Engineer Batch K-93 | Technicians | 17 |
| 13 | Induction Level for Engineer Batch K-94 | Technicians | 11 |
| 14 | Induction Level Technician Batch KT-81 | Technicians | 27 |
| 15 | First Aid | All Cadres | 32 |
| 16 | Non-Destructive Testing | Engineers | 13 |
| 17 | 5S Six Sigma | All Cadres | 20 |
| | **August 2023** | | |
| 18 | Induction Level for Engineer Batch K-94 | Engineers | 11 |
| 19 | Induction Level Technician Batch KT-81 | Technicians | 27 |
| 20 | Induction Level Technician Batch KT-82 | Technicians | 22 |
| 21 | Induction Level Batch for LDC (HR) | LDC (HR) | 20 |
| 22 | Stress Management | All Cadres | 14 |
| 23 | Deviation Settlement Mechanisms | Engineers | 22 |
| 24 | Simulator Training 660 MW | Engineers | 9 |
| 25 | BBD 4772 Coal Mill Operation & Maintenance | Engineers | 14 |
| | **September 2023** | | |
| 26 | Induction Level Engineer Batch K-94 | Engineers | 11 |
| 27 | Induction Level Technician Batch KT-82 | Technicians | 22 |
| 28 | Quality Assurance & Control Module | Engineers | 18 |
| | **October 2023** | | |
| 29 | Induction Level Technician Batch KT-79 | Technicians | 21 |
| 30 | Induction Level Technician Batch KT-82 | Technicians | 22 |
| 31 | SAP- SRM E-Tendering | Engineers | 40 |
| 32 | Right to Information Act | All Cadres | 18 |
| 33 | 500 MW Flexible Simulator Training - I | Engineers | 14 |
| 34 | Factory Act / Safety for Women | Women Employees | 41 |
| 35 | SAP- Recruitment to Retirement | Power Users | 17 |
| 36 | Solar Power Generation | Engineers | 16 |
| | **November 2023** | | |
| 37 | Health Management | All Cadres | 19 |
| 38 | SAP-PTP | Engineers | 48 |
| 39 | 500 MW Flexible Simulator Training - II | Engineers | 10 |
| 40 | Condition Monitoring of Equipment | Engineers & Chemist | 20 |
| 41 | Induction Level Technician Batch KT-83 | Technicians | 30 |

# आदर्श दिनचर्या व निरोगी जीवन जगण्याची कला

संकलन : मुरलीधर वामन गोहणे,
कनिष्ठ अभियंता, संच क्र ७.
चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र, ऊर्जानगर



तुकडोजी महाराजांनी जगाच्या कल्याणासाठी ग्रामगीतेतील तत्वज्ञाच्या माध्यमातून सामुदायिक ध्यान, सामुदायिक प्रार्थना व रामधून मिरवणूक हे तीन उपक्रम श्री गुरुदेव सेवा मंडळास दिलेले आहेत. वंदनीय महाराजांनी व पूज्य तुकारामदादांनी गावागावात जाऊन सेवा मंडळ स्थापना केलेली आहेत. सेवा मंडळाच्या माध्यमातून सदर उपक्रमाचे आपल्या दैनंदिन जीवनात आचरण करावे म्हणजे आपला सर्वांगीण विकास होऊन जीवन समृद्ध बनेल. आपल्या जीवनात स्वावलंबन स्वयंशासन व स्वयंपूर्णत: या गुणांची वाढ होऊन आपल्या शरीर मन बुद्धीचा विकास होईल.

### आदर्श जीवन जगण्याच्या कलेचा विसर

मानव आधुनिक जगतात उपलब्ध असलेल्या सुखसाधनांचा वापर करायला लागल्यापासून पूर्वीच्या काळी असलेल्या आदर्श जीवन शैलीचा आजच्या आधुनिक माणसाला विसर पडत चालला आहे. त्यामुळे मानव विविध व्यसनाच्या आहारी जात आहे. सदर व्यसनाधिनतेचे व्यसनी व्यक्तीवर त्याच्या कुटूंबावर समाजावर विपरीत परिणाम दिसून येत आहेत. कुटुंब व्यवस्था बिघडत चालली आहे. माणूस व्यसनाधीनतेकडे वाटचाल करीत आहे. समय काळानुसार समाज सुधारकांनी यासाठी आटोकाट प्रयत्न केलेले आहेत.

### व्यसनमुक्त जीवन

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वैराग्यमूर्ती गाडगेबाबा आणि वंदनीय तुकारामदादा गीताचार्य यांनी व्यसनमुक्तीसाठी अहोरात्र कार्य केले.

मनुष्य व्यसनमुक्त असल्याशिवाय मानसिक, शारीरिक, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रगती करू शकत नाही, हे या राष्ट्रपुरुषांनी आणि राष्ट्रसंतानी ओळखले होते. दारू-गांजा, अफू, भांग जुगार व वेश्या व्यवसाय यांचे नावच आपल्या गावात येऊ देऊ नये.

ते म्हणतात, "दारू गांजा, भांग, अफीम, जुगार, वेश्या इत्यादी वाईट कर्म, यांचे" उरो न द्यावे नाम आपुल्या गावी..."

गावातील सत्प्रवृत्त लोकांनी गांवातून व्यसनांच्या निर्मूलनासाठी गांवातील लोकाची संघटना तयार करून चांगले गुण वाढीस लागतील अशा योजना कराव्या. मादक द्रव्याचे वारंवार सेवन करण्याची सवय लागणे म्हणजे व्यसन होय, मादक पदार्थाचे सेवन वारंवार केल्याने व्यसन लागते. मादक पदार्थातील घटक द्रव्ये शरीरात मिसळतात. त्या पदार्थाच्या संवेदना शरीरात पसरतात. नशा उतरल्यावर मग पुन्हा त्या पदार्थाच्या सेवनाची इच्छा होते. या प्रकाराची वारंवारता म्हणजे व्यसन जडणे होय. मादक पदार्थाच्या सेवनाने गुंगी व निद्रा येणे, शरीराचे अवयव शिथिल पडणे, ग्लानी येणे, विचारशक्तीचा ऱ्हास इत्यादी प्रकार घडतात. वाईट शक्ती त्या मनुष्याला विविध प्रकारचे त्रास देतात आणि माणूस व्यसनाधीन होतो.

व्यसनी व्यक्तीच्या जीवनावर मानसिक, शारीरिक व आर्थिक परिणाम होतात, सतत चिडचिड होणे. आपल्यावर अन्याय होतो आहे असे वाटणे, दैनंदिन व्यवहारात नकारात्मकता, आपण अपयशी असल्याची भावना निर्माण होणे, काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर ह्या विकारांचे प्रमाण वाढणे.

शारीरिक सर्व इंद्रियांची क्षमता कमी होणे, रक्तवाहिन्या कमकुवत होणे, स्नायु-सांध्यांची कार्यक्षमता कमी होत जाणे, मज्जासंस्थेशी संबंधित कार्यात बिघाड, पचनशक्ती क्षीण होणे, यकृत आणि किडनी खराब होणे, मधुमेह, रक्तदाब आदी विकार होणे इत्यादी.

आर्थिक व्यसनावर जास्तीत जास्त पैसे उडवणे, नोकरी / व्यवसायाकडे दुर्लक्ष, कार्यक्षमता कमी झाल्याने आळशीपणा वाढणे, घरातील आर्थिक गरजांकडे दुर्लक्ष, उधाऱ्या करणे किंवा कर्जे काढणे नोकरी/व्यवसाय बंद पडणे, वगैरे... तुकडोजी महाराज ग्रामगीतेत म्हणतात,

ग्रामसुधारणेचा मुलमंत्र सज्जनांनी व्हावे एका संघटना
हेचि शक्तीचे सुत्र, ग्रामराज्य निर्माण करी ।।

नकारात्मकता कमी करून सकारात्मक दृष्टिकोन वाढवणे, सामुहिक कार्यात मन वळवणे इत्यादी कार्य गावातील संघटनाच्या माध्यमातून केले तर गावात ग्रामराज्य निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही, म्हणूनच आपल्या गावात श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून दररोज सामुदायिक ध्यान, सामुदायिक प्रार्थना व रामधून मिरवणूक हे उपक्रम राबविल्यास गांव आदर्श बनण्यासाठी वेळ लागणार नाही यासाठी गरज आहे ती गावासाठी कार्य करण्याची.

### सामुदायिक ध्यानपाठ व जीवन

सामुदायिक ध्यानाचे महत्व असे आहे की, ध्यान केल्याने आपणांस स्थिरत्व प्राप्त होऊन आपणांस आत्मचिंतन करण्याची सवय लागते. आपली आत्मशक्ती वाढविण्यासाठी व परमेश्वराप्रती आपले मन एकाग्र करण्यासाठी वैयक्तिक व सामुदायिक ध्यानाची पद्धत वंदनीय महाराजांनी सांगितली आहे. सामुदायिक प्रार्थनेने संघटन शक्ती वाढवून गावाचा विकास साधता येतो. सर्व धर्माचा समन्वय साधून शिस्त, शांती व गांभीर्य या कलागुणांची आपल्यात वाढ करण्यासाठी व गावात किंवा वॉर्डात काय कमी आहे, कोणती साधने उपलब्ध

केल्याने गावाचे कल्याण होईल हे लक्ष्य गाठण्यासाठी सामुदायिक प्रार्थना नियमित करणे गरजेचे आहे. यामधून मिरवणुकीच्या माध्यमातून गावाचे निरीक्षण करून गावाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी रामधुन मिरवणूक हे उपक्रम सांगितले आहेत.

### दृढ संस्कार

मानवाचा सर्वांगीण विकास व्हावा, पर्यायाने आपल्या शरीर–मन–बुद्धीचा विकास व्हावा, जीवन जगता जगता आपल्याला सुसंस्काराची सवय लागावी. आपले जीवन सुंदर बनावे, आपल्यात स्वावलंबन, स्वयंशासन व स्वयंपूर्णता गुणाची वाढ व्हावी याकरिता आपल्याला आपल्या दररोजच्या उठण्या–बसण्याच्या, बाहेर फिरायला जाण्याच्या सवयीला नियंत्रित करायला शिकावे लागेल. आपल्या मनात विचार येतो, ते विचार प्रबळ झाल्यावर त्याचे कृतीत रूपांतर होते आणि शरीर ती कृती घडवून आणते, मग घडणारी कृती आपल्याला संस्कार देणारी असो वा वाममार्गाला लावणारी असो, आपण मुलावर सुसंस्कारित करताना किंवा अभ्यास करवून घेताना तो सकाळी किंवा सायंकाळी घेतो, कारण त्यावेळेस वातावरण अभ्यासास पूरक असते म्हणून वंदनीय महाराजांनी संस्कार करण्याच्या पाच योग्य वेळा ग्रामगीतेत सांगितल्या आहेत. त्या सदर ओवीतुन सांगितल्या आहेत. त्या अशा

**निद्रेचिया आधी अंती दिवस रात्रीच्या संधीप्रती ।**
**आणि भोजनसमयी जे संकल्प होती ते बनती दृढ संस्कार ।।**

आपण रात्री झोपी जातो त्या आधी सकाळी झोपून उठतो. त्यानंतर सकाळी सूर्योदयापूर्वी व सूर्यास्तानंतर आणि भोजनाच्या वेळी जे आपल्या मनात विचार येतात ते मग सकारात्मक असो की नकारात्मक विचार असो, ते विचार मनात रुजले की, त्याचे संस्कारात परावर्तित होतात. यासाठी तुकडोजींनी पहाटेचे प्राप्तस्मरण व ध्यान, सायंकाळची प्रार्थना, भोजन समयी म्हणावयाचे श्लोक आणि निद्रापूर्व प्रार्थना आपल्या दिनचर्येचा भाग करा, असे सांगितले आहे.

**गाव व्हावया निरोगी, सुंदर, सुधारावे लागेल एकेक घर**
**आणि त्याहूनही घरात राहणारा करावा लागेल आदर्श ।।**

आपले गाव निरोगी राहण्यासाठी, आपल्याला गावातील प्रत्येक घरातील व्यक्तीचे आरोग्य सुधारावे लागेल. निरोगी व सुंदर गाव होण्यासाठी गावातील एक एक घर प्रथम सुधारावे लागेल, त्यातही अगोदर घरात राहणारा प्रत्येक व्यक्ती आदर्श करावा लागेल.

**व्यक्ती व्हाया आदर्श, संपर्क पाहिजे दिनचर्याचं**
**सात्विक सारे जीवन निरोगी सुरेख तरीच होईल गावाचे।।**

व्यक्ती आदर्श होण्याकरिता त्याची दिनचर्या सात्विक असावी लागेल, तरच आपले जीवन निरोगी व सुंदर होईल. एकेक दिवस नियमाने वागला तर त्याचे संपूर्ण जीवन सुधारून जाईल. पण याकरिता आपल्याला आदर्श दिनचर्येची सवय लावणे गरजेचे आहे, असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज 'ग्राम आरोग्य' या अध्यायाद्वारे मत व्यक्त करतात. महाराज म्हणतात,

**नियमी वाचला एकेक दिन, त्यानेच सुधरे जीवन संपूर्ण**
**गावही होय आरोग्य संपन्न, सारे प्रसन्न देवी देव ।।**

### आदर्श दिनचर्येची सवय लावा

आदर्श दिनचर्येची म्हणजे आपला दिवस सुर्योदयापूर्वी पहाटेला सुरू करणे. प्रात:विधी आटपून वैयक्तिक व सामुदायिक ध्यानधारणा करणे. योगा व प्राणायाम करणे, योग्य व संतुलित आहार घेणे, दैनंदिन शारीरिक व बौद्धिक कार्य करणे, रात्रीचे भोजन लवकर करून, निद्रापूर्व प्रार्थना करून, लवकर झोपणे यासाठी वेळापत्रक दिले आहे.

**सकाळी ५.३० वा सामुदायिक ध्यानपाठ**
**सकाळी ६.३० ते ७:३० वा योगासन व प्राणायाम**
**सकाळी ८:३० ते ९:३० वा नास्ता करणे,**
**सकाळी ९:३० ते १२.०० वा दैनंदिन कार्य करणे**
**दुपारी १२:०० ते १:३० वा भोजन व विश्रांती करणे**
**दुपारी ०१.३० ते ५.३० वा. दैनंदिन कार्य करणे**
**सायं ५.३० ते ६:०० अल्पोपहार किंवा गुळाचा काढा**
**सायं ६:०० ते ७.३० सामुदायिक प्रार्थना व चर्चासत्र**
**रात्री ८.०० ते ९:३० रात्रीचे मर्यादित भोजन**
**रात्री १०.०० से ११.०० निद्रापूर्व प्रार्थना करून झोपणे**

### आत्मचिंतन

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सामुदायिक ध्यानाचे महत्व सांगताना आत्मचिंतनात म्हटले आहे.

**अपने आत्मनके चिंतन में, हरदम जागृत रहना है,**
**ओहम सोहम स्वाससे, अपने अंतरदृष्टी निरखना है**

आपण घेत असलेल्या व सोडत असलेल्या प्रत्येक श्वासाबरोबर त्या निर्गुण निराकार आत्म्याचे चिंतन करत करत सतत आपण जागृत अवस्था प्राप्त केली पाहिजे. ही जागृत अवस्था प्राप्त करण्यासाठी आपल्यात असलेले पदरी आपल्याला हळूहळू नाहिसे करता आले पाहिजे.

काम, क्रोध, लोभ, मोह, मत्सर आणि मद या विकारापासून आपण हळूहळू अभ्यास करत करत अलिप्त होण्याचा प्रयत्न करुया. हे साध्य करण्यासाठी आपण ब्रम्हमुहुर्तावर म्हणजे सुर्योदयाचे तीन तास आधी उठून प्रात:विधी स्नानादि दैनंदिन कर्म आटपून सामुदायिक ध्यानास बसावे. काही वेळा सामुदायिक ध्यानास बसणे जमत नसेल तर वैयक्तिक ध्यानास बसावे.

ध्यान केल्याने शारीरिक आजार नाहीसे होतात, स्मरणशक्ती वाढते, वाईट सवयी नष्ट होतात, मन आनंदी होते, कार्यक्षमता वाढते, झोपेचे तास कमी होतात. अर्ध्या तासाचे सखोल ध्यान हे सहा तासांच्या झोपेबरोबरचे असते, दर्जेदार नातेसंबंध, परस्पर नातेसंबंध अतिशय दर्जेदार व पूर्ण समाधानकारक होतात, विचारशक्ती वाढते व जीवनाचा उद्देश साध्य होतो.

शारीरिक आजार नाहीसे करण्यासाठी ध्यान करणे योग्य आहे कारण ध्यानधारणेने शरीराचा आणि मनाचा संबंध प्रस्थापित होतो. ध्यान साध्य झाल्यास मनाचे शरीरावर नियंत्रण राहते. ध्यान करून आपल्याला भरपूर आध्यात्मिक ऊर्जा व आध्यात्मिक विवेकज्ञान मिळते, तेव्हा बुद्धिमत्ता पूर्ण विकसित होते. लवकरच सर्व मानसिक चिंता संपतात. परिणामस्वरूप सर्व शारीरिक आजार नाहीसे होतात. सर्व आजार बरे करण्याचा ध्यान हाच एक मार्ग आहे सतत ध्यानाचा सराव केल्यास स्मरणशक्तीत वाढ होते.

ध्यानातून मिळविलेल्या भरपूर आध्यात्मिक ऊर्जेमुळे स्मरणशक्ती जबरदस्त वाढते म्हणून विद्यार्थ्यांनी केलेला अभ्यास लक्षात ठेवण्यासाठी नियमित ध्यान करण्याची नितांत आवश्यक आहे. ध्यानातून मिळविलेली भरपूर आध्यात्मिक ऊर्जा मेंदूला जास्तीत जास्त क्षमतेने कार्य करण्यास मदत करते म्हणून सर्व विद्यार्थ्यांसाठी ध्यान करणे नितांत आवश्यक आहे. शाळा

आणि विद्यापीठ या दोन्ही पातळ्यांवर विद्यार्जन करणाऱ्या मुलामुलींना ध्यान करण्यास सांगावे.

खूप खाणे, जास्त झोपणे, खूप बोलणे, अति विचार करणे, अति मद्यपान करणे, तंबाखू खाणे, इ. अनेक वाईट सवयी असतात. ध्यान करून मिळविलेले भरपूर विवेकज्ञान आणि आध्यात्मिक ऊर्जा यामुळे सर्व वाईट सवयी आपोआप सुटतात, जीवनात ध्यानाचा मार्ग अवलंबला तर जीवन जगताना येणारे सुख आणि दु:ख दोन्ही समान वाटतात. कोणत्याही व्यक्तीसाठी आयुष्य हे पराभव अपमान आणि वेदना यांनी पूर्ण भरलेले असते. तथापि, आध्यात्मिक ज्ञान आणि आध्यात्मिक ऊर्जा प्राप्त केलेल्या व्यक्तीचे जीवन सर्व पराभव अपमान आणि वेदना असूनही नेहमी शांत व आनंदी असते.

ध्यानातून मिळालेल्या मनाच्या स्थिरत्व प्राप्तीमुळे सर्व कामे मग ती शारीरिक असोत वा मानसिक, अधिक कार्यक्षमतेने केली जातात. थोड्या वेळात जास्त कामे पूर्ण होतात. किमान साधने वापरून कौतुकास्पद कामे केली जातात.

**विश्व शांती योग सामुदायिक प्रार्थना**

तुकडोजी महाराज ग्रामगीतेतून सामुदायिक प्रार्थना विशद करताना म्हणतात,

**शिस्त शांती गांभिर्यादी गुण उठण्या-बसण्याचे ज्ञान,**
**लाभे मानव्याचे शिक्षण प्रार्थनेमाजी**
**समुदाय प्रार्थनेची किती गोड ही प्रणाली**
**लाभो जनास सकळा, किती गोड ही प्रणाली**
**सामुदायिक प्रार्थनेची उपासनाच**
**सर्वांची आत्मिक उन्नती घडवून आणिल**
**सर्वधर्माचा समन्वय विश्व शांतीचा उपाय**
**लोक सुधारणेचे विद्यालय, सामुदायिक प्रार्थना**

आपले स्वत:चे, कुटुंबाचे, समाजाचे, गावाचे व देशाची प्रगती साधायची असेल तर आपल्याला सामुदायिक प्रार्थना नित्यनेमाने करावी लागेल.

तुकडोजीबाबा म्हणतात, आपल्याला जर गावाचे कल्याण व्हावे, असे वाटत असेल तर आपण सामुदायिक प्रार्थना हे साधन सोडू नये.

सामुदायिक प्रार्थना हे गावस्तरावर लोकसंघटन निर्माण करून देशाचा मुख्य घटक गाव त्यास सुदृढ सक्षम बनविण्यासाठी एक फार मोठे साधन आहे. वेळ काळ परिस्थितीप्रमाणे साधुसंत समाजासाठी उपक्रम राबवित असतात.

ज्याप्रकारे आपण आपल्या वैयक्तिक घरी कुटुंबातील सर्व सदस्य दिवसभर विभिन्न कामे करून रात्री सर्व एकत्र येतो.

दुसऱ्या दिवशीच्या कामांवर चर्चा करतो, बऱ्या-वाईटाची चर्चा करून त्याचा निर्णय घेतो आणि शांत होऊन झोपतो त्याचप्रमाणे गाव हे आपले सामुदायिक कुटुंब आहे.

सामुदायिक प्रार्थनेचे मूळ महत्त्व असे की, सर्वांनी प्रार्थना झाल्यावर आपल्या गावात, समाजात काय उणीव आहे. त्याला अधिक चांगले सुदृढ आणि सुंदर कसे बनविता येईल, यावर सामुदायिक विचार व्हावा आणि त्यासाठी सर्वांनी मिळून काम करावे. गावात कोणती गोष्ट वाईट आहे, तिला कसे बाहेर काढता येईल आणि गावात कोणती चांगल्या गोष्टीची कमी आहे तिला कसे आणता येईल या सर्व गोष्टीवर चर्चा होऊन सर्वानुमते निर्णय घेण्यास लाभप्रद होईल.

सामुदायिक प्रार्थना केल्याने काय होते? सामुदायिक प्रार्थना करणारा मनुष्य जात, धर्म, पंथ, पक्ष विरहित असा गावाचा सेवक बनेल, जो गावाला सेवा पुरवेल समोर चालून, तर मग 'समुदायाचे करणे काम हेचि प्रार्थना असे महान', अशी त्याची अवस्था होऊन जाईल. गरीबांची तुटलेली झोपडी बांधणे, गरजूंना मदत करणे, आग लागली तर पाणी घेऊन धावणे, जेथे जेथे कोठे आवश्यकता किंवा कमतरता आहे तेथे सेवा देणे म्हणजेच त्याची प्रार्थना होऊन जाईल. चालता-फिरता, बोलता-चालता तो सतत समूहाच्या कल्याणाचे चिरंतन आणि कार्य करील तेव्हा त्याचे जीवनच पूर्ण प्रार्थनामय होऊन जाईल. या माध्यमातून अनेक विकारांना नष्ट करून, समाजाची सेवा करीत तो त्या संताच्या अमरपदापर्यंत पोहोचेल आणि त्याचीच सुरूवातीची पायरी म्हणजे आपली ही सामुदायिक प्रार्थना होय.

सामुदायिक प्रार्थनेचा परिणाम इतका व्यापक, गंभीर आणि उत्कृष्ट होतो की, लोकांना सामाजिक शांती कशी असते याचे ज्ञान होऊ लागते. चार लोकांत बसताना व उपासना करताना किती गंभीरतेची नि शिस्तीची आवश्यकता आहे याचा सक्रिय पाठ मिळतो आणि जीवनाच्या विकासाच्या दृष्टीने प्रत्येक मनुष्याचा प्रार्थनेचा काय संबंध आहे, हे अनुभवास येते. सामुदायिक वृत्ती, शिस्त, परस्पर प्रेम, शांतता, एकांतता, उत्साह आणि ज्ञानविकास या दृष्टीने सामुदायिक प्रार्थना हे सक्रिय शिक्षणाचे केंद्र म्हणणे अधिक समर्पक होईल!

सर्वांनी या प्रार्थनेची विशालता व महात्म्य समजून घ्यावे आणि आपला तसेच समाजाचाही उद्धार करण्याचा यथाशक्ती प्रयत्न करावा, अशी गुरुदेवाला प्रार्थना करतो आणि सामुदायिक प्रार्थनेवरील माझ्या लांबलेल्या शब्दाला विराम देतो.

******

प्रशासकीय वृत्त

## महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांची उरण वायू विद्युत केंद्राला भेट

महानिर्मितीमध्ये रुजू झाल्यानंतर प्रथमच मा.डॉ.पी. अन्बलगन यांनी उरण वायू विद्युत केंद्राला भेट दिली. त्यांनी वायु विद्युत केंद्राच्या बॉयलर, गॅस टर्बाईन व इतर संयंत्रांची पाहणी करून वीजनिर्मितीचा व बंद असलेले संच त्वरित चालू करणेबाबत आढावा घेतला. नवीन वायु विद्युत प्रकल्पाच्या जागेची तसेच वसाहतीची पाहणी करून उपलब्ध जागेचा योग्य तो वापर करणेसाठी तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

वायु विद्युत केंद्राला वायू पुरवठा करणाऱ्या गेल इंडिया लिमिटेड कंपनीच्या प्रतिनिधींशी अखंड आणि योग्य किंमतीत वायु पुरवठा करण्यासाठी सविस्तर चर्चा केली. तसेच वीज केंद्रातील अधिकाऱ्यांची बैठक घेऊन किफायतशीर दरात वीज उत्पादन करण्याबाबत मार्गदर्शन केले.

याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) श्री. अभय हरणे, मुख्य अभियंता (सांघिक नियोजन व सुसंवाद) श्री. संजय कुऱ्हाडे प्रामुख्याने उपस्थित होते. मान्यवरांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी वायू विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता श्री. सुनील इंगळे, अधीक्षक अभियंते श्री. सुनील वाघ व श्री. मुनेश्वर तसेच विविध विभागाचे कार्यकारी अभियंते आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत महानिर्मितीचे ७.५६ मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

रात्री सिंचन करताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते त्यामुळे शेतीसाठी दिवसा भरवशाचा वीज पुरवठा व्हावा यासाठी राज्य शासनाने जून २०१७ मध्ये महत्वाकांक्षी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' सुरु केली. त्यात ७.५६ मेगावॅटचे दोन सौर ऊर्जा प्रकल्प दि. ५ मे २०२३ रोजी कार्यान्वित करण्यात महानिर्मितीला यश आले आहे.

**नागेवाडी स्थापित क्षमता ४.२ मेगावॅट :** नागेवाडी तालुका तासगांव जिल्हा सांगली या सौर प्रकल्पामुळे नजीकच्या चार गावांना नागेवाडी, अंजनी, वडगांव आणि लोकरेवाडी या गावातील सुमारे १२०० ते १३०० वीजग्राहकांना लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्प महावितरणच्या ३३/११ के.व्ही. अंजनी नागेवाडी उपकेंद्राला जोडण्यात आला आहे. सुमारे १० हेक्टर शासकीय पडीक जमिनीवर हा प्रकल्प उभारण्यात आला असून, प्रकल्प उभारणीचा खर्च १५ कोटी आहे. महानिर्मिती, मेसर्स ई.ई.एस.एल. (विकासक), मेसर्स टाटा (सब व्हेंडर) आहेत.

**वालेखिंडी स्थापित क्षमता ३.३६ मेगावॅट :-** वालेखिंडी तालुका जत जिल्हा सांगली या सौर प्रकल्पामुळे नजीकच्या चार गावांना वालेखिंडी, बेवनूर, सिंदेवाडी आणि नवलेवाडी या गावांतील सुमारे एक हजार कृषी वीजग्राहकांना लाभ मिळणार आहे. सुमारे ८ हेक्टर शासकीय पडीक जमिनीवर हा प्रकल्प उभारण्यात आला असून, प्रकल्प उभारणीचा खर्च १२ कोटी आहे. महानिर्मिती, मेसर्स ई.ई.एस.एल. (विकासक), मेसर्स टाटा (सब व्हेंडर) आहेत. नजीकच्या महावितरणच्या ३३/११ के.व्ही. वालेखिंडी उपकेंद्राला सदर प्रकल्प जोडण्यात आला आहे.

या दोन सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे स्थानिक पातळीवर प्रत्येकी १० ते १५ व्यक्तींना रोजगार उपलब्ध झाला आहे. सौर ऊर्जेद्वारे मिळणारी वीज सुमारे रु. ३.३० प्रती युनिट दराने मिळणार असून महावितरण समवेत वीज खरेदी करार करण्यात आला आहे.

आजघडीला महानिर्मितीच्या एकूण ३६७.४२ मेगावॅट स्थापित क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पातून वीज उत्पादन होत आहे.

मा. उप मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांचे निर्देशानुसार तसेच महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. पी. अन्बलगन यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच १०० मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी विकासकाला इरादा पत्र देण्यात आले आहे. तसेच आर्थिक वर्ष २०२३-२०२४ करिता सुमारे १ हजार मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पांचे लक्ष्य निश्चित करण्यात आले असून संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे आणि संपूर्ण सौर प्रकल्प चमू यासाठी परिश्रम घेत आहेत.

## पारस वीज केंद्राचा ६२ वा वर्धापन दिन विविध उपक्रमांसह संपन्न

"पारस वीज केंद्र हे भौगोलिकदृष्ट्या आणि नफा-तोट्याच्या दृष्टिकोनातून महानिर्मितीसाठी अत्यंत महत्वाचे विद्युत केंद्र आहे. वीज उत्पादन विषयक वेगवेगळ्या तांत्रिक निकषात पारस वीज केंद्राची कार्यक्षमता नेहमीच चांगली राहिली आहे. त्यामुळे पारस वसाहतीत वास्तव्याला असणाऱ्या कुटुंबियांसाठी रस्ते, प्रकाशव्यवस्था, सांस्कृतिक सभागृह, क्रीडांगण इत्यादी सारख्या सोयी सुविधा लवकरात लवकर दिल्यास महानिर्मितीचे अधिकारी-कर्मचारी प्राधान्यक्रमाने पारस येथे बदलीची मागणी करतील" अशी सुविधा निर्माण करण्याचे निर्देश कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था-२) श्री. पंकज सपाटे यांनी दिले. ते ६२ व्या वर्धापन दिनाच्या समारोपीय कार्यक्रमात खुले रंगमंच येथे बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पारस वीज केंद्राचे मुख्य अभियंता श्री. शरद भगत यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था-२) श्री. पंकज सपाटे होते. विशेष अतिथी म्हणून मुख्य अभियंता (भुसावळ प्रकल्प) श्री. विवेक रोकडे, मुख्य अग्निशमन अधिकारी तथा अग्निशमन सल्लागार श्री. शशिकांत पापडे, उप मुख्य अभियंता श्री. राजेश चव्हाण, जनसंपर्क अधिकारी श्री. यशवंत मोहिते, वर्धापन दिन समिती सचिव श्री. सतिश ठाकरे प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.

प्रारंभी भूपेश नेतनराव यांनी महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. पी. अन्बलगन, संचालक (संचलन) श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) श्री. अभय हरणे, संचालक (खनिकर्म) डॉ. धनंजय सावळकर यांच्या शुभेच्छा संदेशांचे वाचन केले. वर्धापन दिनानिमित्त ६७ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली हे विशेष.

श्री. विवेक रोकडे म्हणाले की, "पारसचे मुख्य अभियंता श्री. शरद भगत यांची धडाडीची कार्यशैली असल्याने वसाहतीचा कायापालट लवकरच होईल", असा मला विश्वास आहे. श्री. शशिकांत पापडे म्हणाले की, "पारस वीज केंद्राची कामगिरी नेहमीच चांगली राहिली आहे. हीच परंपरा पुढेही कायम राहिली पाहिजे" तर श्री. यशवंत मोहिते म्हणाले की, "वर्धापन दिनानामित्त अधिकारी-कर्मचारी आणि कुटुंबियांच्या सुप्तगुणांना वाव मिळतो, बक्षिसे/पारितोषिकातून नवी ऊर्जा मिळते, त्यामुळे वर्धापन दिन खऱ्या अर्थाने लोकउत्सव ठरतो". श्री. शरद भगत म्हणाले की, "मुख्यालयाच्या दृष्टीने पारस वीज केंद्र हे महत्वाचे वीज केंद्र असल्याने अपेक्षा वाढणे स्वाभाविक आहे आणि त्या अपेक्षा पूर्ण करण्याकरिता आपण कसोशीने प्रयत्न करण्याचा या निमित्ताने संकल्प करावा", असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रीती कोल्हे, जयश्री कोहळे यांनी तर श्री. रवी भगत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

वर्धापन दिनानिमित्त विविध क्रीडा स्पर्धांमध्ये बॅडमिंटन, टेबल टेनिस, ब्रिज, बुद्धिबळ, कॅरम, क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी, रांगोळी, चित्रकला, हाऊस कीपिंग स्पर्धा, सुदृढ बालक स्पर्धा, नृत्य स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, गीत गायन स्पर्धा, आनंद मेळावा, हौजी, रस्सीखेच, मॅरेथॉन, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर घेण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. तसेच हिंदी-मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रमात अद्वैत ऑर्केस्ट्राच्या कलावंतांनी सादर केला ज्यामध्ये महानिर्मिती अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपल्या गायन कौशल्याचा परिचय करून देत उपस्थित रसिक प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

याप्रसंगी अधीक्षक अभियंते सर्वश्री. धनंजय पंधाडे, संजय कांबळे, भूपेश नेतनराव, राजेश गट्टूवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. टाले, कल्याण अधिकारी प्रीती रामटेके तसेच पारस वीज केंद्राचे सर्व विभाग प्रमुख अधिकारी-कर्मचारी-तंत्रज्ञ-कंत्राटी कामगार, कुटुंबीय, संघटना प्रतिनिधी उपस्थित होते, तर वर्धापन दिन यशस्वीतेसाठी आयोजन समितीचे सर्व पदाधिकारी-सदस्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# महानिर्मिती कंपनीचा १८वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

सन २०३० पर्यंतची विजेची मागणी लक्षात घेता, नैसर्गिक संसाधनांचा वापर करीत पर्यावरणपूरक वीज उत्पादनावर अधिक भर देत महानिर्मितीने २५ गिगावॅटचे लक्ष्य निर्धारित केले आहे. सध्या औष्णिक स्थापित क्षमतेत देशात राज्य शासनकृत पहिल्या क्रमांकाची कंपनी असली तरीही येत्या काही वर्षात ती अपारंपरिक ऊर्जा निर्मितीसाठी ओळखली जाणार असल्याचे प्रतिपादन महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. पी. अन्बलगन यांनी केले. ते महानिर्मितीच्या १८ व्या वर्धापन दिनानिमित्त रंगशारदा सभागृहात आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. पी. अन्बलगन यांनी भूषविले तर मंचावर मराविमं सुत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक मा.श्री. विश्वास पाठक, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे, संचालक (खनिकर्म) मा.श्री. राजेश पाटील, कार्यकारी संचालक (संवसु–२) मा.श्री. पंकज सपाटे, कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान) मा.श्री. नितीन चांदूरकर, कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन व संवाद, प्रकल्प) मा.श्री. पंकज नागदेवते, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) मा.डॉ. धनंजय सावळकर प्रामुख्याने उपस्थित होते.

महानिर्मितीला मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, मिशन–२०२५, उदंचन जल विद्युत प्रकल्प, इतर अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पाद्वारे क्षमता वाढ करतांना अत्यंत अभ्यासपूर्ण, नियोजनबद्ध आणि गतिमानतेने निर्धारित लक्ष्य गाठावे लागणार आहे. त्यायोगे, प्रत्येकाचे योगदान अपेक्षित असल्याचे डॉ.पी. अन्बलगन यांनी सांगितले.

म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक मा.श्री. विश्वास पाठक म्हणाले की, "राज्याच्या विकासासाठी विजेची गरज लागणारच आहे त्यामुळे काळाची पावले ओळखून जो पुढे जातो, तोच प्रगती करतो आणि महानिर्मितीने वेळीच पाऊले उचलली आहेत". महानिर्मितीचे पी.पी.पी. तत्वावर प्रकल्प उभारणीचे नियोजन निश्चितच कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. महानिर्मितीचे संच एम.ओ.डी. मध्ये खाजगी वीज उत्पादकांशी स्पर्धा करतात हे विशेष करून नमूद केले.

संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर म्हणाले की, "मागील चुकांमधून शिकत भविष्यासाठी मजबूत पाया निर्माण करावा लागेल". त्यांनी तांत्रिक बाबींवर तपशीलवार विवेचन केले. संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे यांनी सांगितले की, "महानिर्मिती नफ्यात कशी राहील याचा ध्यास प्रत्येकाने घेतला तर स्पर्धेच्या युगात आपली कंपनी राज्याच्या विकासाला मोठा हातभार लावू शकेल".

प्रारंभी प्रास्ताविकातून संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे यांनी सांगितले की, "वर्धापन दिनाचा मुख्य उद्देश वर्षभराच्या कामगिरीचे सिंहावलोकन करत मनुष्यबळाला कौतुकाची थाप देणे, आगामी संकल्प आणि सुसंवाद प्रस्थापित करून समाधानाचा, आनंदाचा स्तर वाढवणे हा आहे". जनसंपर्क विभागाच्या समन्वयातून महानिर्मितीच्या सर्वंकष कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या चित्रफितीने वातावरण ऊर्जामय झाले.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित राज्यस्तरीय स्पर्धांचा तसेच महानिर्मितीतर्फे उत्कृष्ट कामगिरीबद्दल वर्ष २०२१–२०२२ च्या विशेष पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सदर समारंभाप्रसंगी राज्याच्या कानाकोपऱ्यातून विजयी स्पर्धक व्यक्तिश: उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रियंका बुरुड यांनी तर उपस्थितांचे आभार तत्कालीन संचालक (खनिकर्म) मा.श्री. राजेश पाटील यांनी मानले. पारितोषिक वितरण समारंभाचे सूत्रसंचलन मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. पुरुषोत्तम वारजूरकर आणि सहाय्यक जनसंपर्क अधिकारी श्री. संतोष पुरोहित यांनी केले. 'ऊर्जा शक्ती नाईट' या हिंदी–मराठी गितांच्या दर्जेदार सांगीतिक कार्यक्रमाने वर्धापन दिन सोहळ्याची सांगता झाली.

याप्रसंगी मुंबई मुख्यालयातील मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक, समकक्ष अधिकारी, विभाग प्रमुख, अधिकारी–अभियंते–कर्मचारी आणि कुटुंबीय तसेच कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित राज्यस्तरीय स्पर्धांचा निकाल :-**

**राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धा, शालेय गट (माध्यमिक) :-**

**प्रथम क्रमांक (विभागून)** - कु. शर्वरी संदीप हिवरखेडकर आणि कु. पलक सचिन सोनसकर.

**द्वितीय क्रमांक (विभागून)** - कु.अर्जुन राहुल अग्रवाल आणि कु. उन्नती नितीन पाटील

**तृतीय क्रमांक (विभागून)** - कु. रिया संजय भगत आणि कु. निरंजन प्रशांत परदेशी.

**राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धा, खुला गट :-**

**द्वितीय क्रमांक (विभागून)** - स्नेहल खरोटे आणि अभिजीत श्रीकांत कुलकर्णी.

**तृतीय क्रमांक (विभागून)** - नीरज मोहन सबनीस आणि किरण मेकाले.

**महानिर्मिती कर्मचारी यांचेसाठी निबंध स्पर्धा :-**

**प्रथम क्रमांक (विभागून)** - मधुकर श्रावण दुफारे आणि शोभा सुब्रमण्यम.

**द्वितीय क्रमांक (विभागून)** - प्रियंका काटकर आणि रविंद्र भिकाजी कुशारे.

**तृतीय क्रमांक (विभागून)**- पराग दिनकर झाडे आणि प्रदिप मनोहर जांभूळकर.

**राज्यस्तरीय खुली लघुपट / दर्जेदार मोबाईल क्लिप निर्मिती स्पर्धा :-**

**द्वितीय क्रमांक** - सुनीता हंडोरे-पाटील

**तृतीय क्रमांक (विभागून)** - बाबासो भीमराव देसाई आणि सीमा खंडाळे

# बाजीगर

- संजय कुलकर्णी
**कार्यकारी अभियंता (मध्यवर्ती खरेदी विभाग)**
**सांघिक कार्यालय, मुंबई.**



मागील काही वर्षांपासून मुंबईतला डिसेंबर बराचसा आल्हाददायक झाला आहे, डिसेंबरमधील गुलाबी थंडी मुंबईकरांना आता चांगलीच परिचित झाली आहे. अशाच डिसेंबर मधील सकाळी मी माझ्या कुर्ला (प) येथील निवासस्थानातून ऑफिससाठी निघालो होतो. कधी बेस्टने, कधी लोकलने वळसा घालून वडाळा रोड मार्गे तर कधी दुचाकीने कार्यालय गाठणे हा सध्याचा परिपाठ आहे. मार्ग अनेक लक्ष एक ... "प्रकाशगड".

कार्यालयात जाताना आणि परत घरी येताना सभोवताली दिसणाऱ्या अनेक व्यक्तीरेखा टिपणे हा माझा आवडता छंद आणि विरंगुळा सुद्धा. मुख्य कार्यालयातील व्यस्त वेळापत्रकातून काही तणावमुक्त क्षण आणि रंजक अनुभव ह्या व्यक्तीरेखा मला देतात. तुम्हीही प्रयत्न करा कधी, तुम्हालाही भेटतील काही माहीमचे चाचू आणि व्यवस्थापनातील डोंबारी सुद्धा.

साधारणत: डिसेंबर महिना म्हणजे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्राच्या परीक्षा असतात तर १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी प्रॅक्टिकलच्या परीक्षा, जर्नलचे सबमिशन इत्यादी. अभियांत्रिकी असो वा विज्ञान शाखा, कला असो वा वाणिज्य किंवा इतरही अन्य शाखांच्या प्रथम सत्राच्या परीक्षा या कालावधीत सुरु झालेल्या असतात आणि फुल टू अभ्यासाचा माहोल.

अशाच एका डिसेंबरमधील रम्य सकाळी कुर्ला स्थानकावरून लोकलने कार्यालयात जाण्यास निघालो. शेअर रिक्षाने कुर्ला स्थानकाकडे जाताना त्या रिक्षात दोन महाविद्यालयीन विद्यार्थी भेटले. अभियांत्रिकीचे विद्यार्थी असावे बहुतेक. कुर्ला स्थानकाला जाणाऱ्या या १० ते १५ मिनिटांच्या प्रवासात सुद्धा ही मंडळी कोऱ्या करकरीत पुस्तकात डोकी घालून अभ्यासात मग्न होती. पुस्तकं फार फार तर ८०-१०० पानांचे असावे. आमच्या काळी अशा पुस्तकांना टेक्स्ट बुक म्हणत आणि प्रसिद्ध लेखकांच्या संदर्भ ग्रंथातून नक्कल केलेले काही पॅराग्राफ असलेल्या पुस्तकात छापलेले असत. आजच्या भाषेत कॉपी पेस्ट. ही टेक्स्ट बुक्स वर्षभर विषयांची ओळख सुद्धा नसलेल्या महाभागांसाठी संजीवनीचे काम करत. या कॉपी पेस्ट बुकमधून आयत्या वेळी अभ्यास करून ही मंडळी डायरेक्ट slog over मध्ये खेळायला आलेल्या हार्दिक पंड्या किंवा अक्षर पटेल सारखी आडवी तिडवी उत्तर ठोकून सहज अर्धशतकी मार्कांची खेळी करून जात आणि आम्ही मात्र राहुल द्रविडसारखे क्लासिक शॉट मारून पूर्ण इनिंग खेळूनही पाऊण शतकी खेळी सुद्धा उभारत नसू.

असेच दोन बाजीगर आज मला भेटले आणि परीक्षेच्या काळात तुम्हाला गल्लीबोळात असे बाजीगर आढळतील. हो... हारी हुई बाजी जिंकणारे सिकंदरच हे.

यांच्याकडे हरण्यासारखे काहीही नसते, कारण वर्षभर अभ्यास करून यांनी वेळ वाया घालवलेला नसतो. मात्र आमच्यासारखे शेवटपर्यंत नेट प्रॅक्टिस करूनही, ओपनिंगला येऊन टुकूटुकू खेळून शेवटी एखाद्या आऊट स्विंगचा किंवा बाउन्सरचा बळी ठरतो.

रिक्षा, लोकल, बस, बस स्टॉप, लोकल स्टेशन इतकेच काय दुचाकीवर मागे बसून परीक्षेला जाताना सुद्धा ही मंडळी अभ्यास सोडत नाही.

ही सिकंदर मंडळी वर्षभर तुम्हाला समाज कार्यात व्यस्त दिसतील, कॉलेजमध्ये कधीमधी हजेरी लावून शेवटच्या बाकावर झोप काढून जाणे हा यांचा आवडता छंद आणि यांचे fan followers इतके की अगदी स्वत:ची हजेरी धोक्यात घालून यांची प्रॉक्सी मारून हजेरी लावतील. अशी मंडळी तुम्हालाही महाविद्यालयीन जीवनात भेटले असतीलच. नसतील आठवत तर परीक्षेच्या काळात बाहेर या आणि शोधण्याचा प्रयत्न करा, तुमच्या काळातील या जांबाज मंडळींना.

एप्रिल-मे किंवा नोव्हेंबर-डिसेंबर हा यांचा कोषातून बाहेर येण्याचा काळ असतो, या कालावधीत यांना ओळखण्याची सोपी खूण म्हणजे ही मंडळी लोकल स्टेशन, बस स्टॉप, दुचाकीवर डबल सीट मागे बसून पुस्तकांत डोकं खुपसून बसलेले दिसतील. कधी कधी चक्क रस्त्याने चालताना सुद्धा यांचे वाचन सुरु असते आणि अशा वेळेस याना हात धरून रस्ता क्रॉस करून पुण्य कमवण्याचा विचार सुद्धा आपल्या मनात डोकावतो.

माझी या जमातीशी ओळख झाली, ती पुण्यात पॉलिटेक्निकला शिकताना. सेमिस्टर पॅटर्न नसल्याने पॉलिटेक्निकचे विद्यार्थी तसेही बिनधास्त असत. कधीमधी कॉलेजला उगवणे, सगळ्यांचा कॉमन ऑफ घेण्याचा मूड असला की अचानकपणे प्रकट होऊन सरांना लेक्चर घ्यायला प्रवृत्त करणे, प्रॅक्टिकलला उगाचच जोक्स वगैरे मारून पोरींना व मॅडमला इंप्रेस करून ओळख करून घेणे, हॉस्टेलला नेहमी दोन-दोन चार-चार रात्री गायब राहणे

व कधीतरी पहाटे धूमकेतूप्रमाणे उगवणे, सुट्यांच्या काळात सगळे घरी गेलेले असताना भुतासारखे एकटे हॉस्टेलला राहणे व वॉचमनशी विशेष सलगी असणे ही या मंडळींची प्राथमिक लक्षणं असतात. कालांतराने जेष्ठ व अनुभवी विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनात ही मंडळी विशेष प्रगती करतात.

वैयक्तिक जीवनात ही मंडळी अत्यंत सोशल असतात. डब्बेवाले, मेस तसेच कॅन्टीनचे मॅनेजर, सायकल स्टॅन्डवरील कर्मचारी तसेच लॅबमधील टेक्निकल असिस्टंट या वर्गात ही मंडळी खूपच लोकप्रिय असते. कोणाला पैशाची अडचण असो, कोणी आजारी असो, एखाद्या रुग्णाला रक्ताची गरज असो किंवा गावाकडून आलेल्या मित्राची शहरात राहण्याची सोय नसो, या सर्वांना ही मंडळी मदतीचा हात देण्यासाठी सदैव पुढे असते. स्वत:ची अनेक दु:ख पचवून थंडीच्या दिवसात हॉस्टेलमधील कॉमन बाथरूममध्ये आंघोळ करताना जोरजोरात गाणी म्हणणे हा यांचा आवडता छंद. आधीच सोशल असल्याने व 'हे विश्वची माझे घर' या संकल्पनेवर दृढ विश्वास असल्याने यांच्याकडे आंघोळीसाठी कधीच बादली व कपड्याचा साबण वगैरे नसतो. केस धुण्यासाठी ही मंडळी कधीच शाम्पू वगैरे वापरत नाही तर आंघोळीच्या साबणानेच केस धुवून आपले काले, घने व मुलायम बाल उडवत आमच्यासारख्या केसांची पतझड असलेल्यांच्या जखमेवर मीठ चोळत. सेमिस्टर पॅटर्न नसल्याने पॉलिटेक्निकला ह्या मंडळींना विषयांची नावे, रेफरन्स बुक्स इ. चा गंधही नसतो.

जानेवारी महिन्यात संक्रांतीनंतर ऋतू पालटतो त्याप्रमाणेच पॉलिटेक्निकला व तसेच इंजिनीरिंगलाही सबमिशनचा हंगाम सुरु होतो. वर्कशॉप मध्ये विद्यार्थ्यांची लगबग सुरु होते, प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांची अवस्था तर अतिशय दयनीय असते. फिटिंगचा पहिला जॉब "फायलिंग अँड चिझलिंग". यात घासून घासून व बोथट चिझलने ठोक-पीठ करून पोरी अर्धमेल्या झालेल्या असतात. तोंडात पानाचा तोबरा भरून इकडे तिकडे फिरत व तोंडातील लाळ सांभाळत वर्कशॉप मधील कर्मचारी उगाचच शायनिंग मारत असतात. मध्येच एखाद्या दमलेल्या कमनशिबी लेकराला जॉब रिपीट देऊनही मंडळी वातावरण आणखीनच भयाण बनवतात आणि या तणावग्रस्त वातावरणात एन्ट्री होते ती बाजीगरची. नेहमी आठ-आठ दिवस अंघोळ न करणारा बाजीगर आज मात्र एकदम फ्रेश असतो. घने, काले, मुलायम बाल एकदम झोकात उडवत, राऊडी स्टाईल आगमन, शर्टचे वरचे बटन उघडे. बघतो तर काय नेहमी कर्दनकाळ भासणारा वर्कशॉपचा कर्मचारीही हात वर करून हसत हसत बाजीगरला अभिवादन करतो.

बाजीगर भाऊ स्टाईल मध्ये लॉकर उघडतो, एप्रन घालतो, वर्कशॉप बुकमध्ये ड्रॉईंग बनवतो आणि सुरु करतो दे धडाका जॉब. व्हॉइसमध्ये जॉब पकडून आधुनिक क्रिकेट मधील स्काय उर्फ सूर्यासारखा ३६० अंशात टूल्स चालवून फक्त अर्ध्या तासात पहिला जॉब बनवतो आणि चक्क excellent चा रिमार्क घेऊन दुसरा जॉब सुरु. आम्ही मात्र पहिल्या जॉबलाच डीआरएस घेऊनही रिपीट करतो. कळत नकळत आमची क्लास क्वीन आणि बाजीगर भाऊची नजरानजर होते. ओळखही नसलेल्या बाजीगर भाऊचे ३६०वर्क पाहून अशी ही ती इंप्रेस झालेली असते. बाजीगर भाऊ हलकेच एक स्माईल फेकतो आणि ती चक्क हात हलवून हाय करते. हे सगळे पाहत असताना आम्ही हाय खाऊन जॉब ऐवजी व्हाईसवर हातोडा मारतो आणि वर्कशॉपचा कर्दनकाळ आम्हाला इज्जत काढत पहिल्याच जॉबला दुसऱ्यांदा रिपीट मारतो.

इकडे बाजीगर भाऊ हलकेच 'ती' च्या दिशेने जात काही तर हसरा चेहरा करून बोलत 'ती' चा जॉब घेतो व बोलता बोलता पूर्ण करतो. वर्कशॉपचा कर्दनकाळही सोयीस्करपणे दुर्लक्ष करतो आणि 'ती' चा जॉब सबमिट होतो आणि 'ती' बाजीगरला चेकमेट. बाजीगर भाऊ अंगावर उडालेले लोखंडी चिप्स झटकतो आणि दोघंही हसत हसत एकत्र वर्कशॉपचे काम पूर्ण करून सोबतच बाहेर निघतात. नेहमी माझ्या नोट्स वापरून अभ्यास करणारी व कठीण टॉपिक्स माझ्याकडून समजावून घेणारी ती आज मात्र माझ्याकडे ढुंकूनही न पाहता बाजीगर भाऊ सोबत रवाना होते.

'ती' ची अन् माझी दिल, दोस्ती, दुनियादारी जाते खड्ड्यात.

सबमिशन फुल स्विंगमध्ये असते आणि अचानक या बाजीगर मंडळींना मागील वर्षाची जुनी जर्नल्स प्राप्त होतात. सोशल कॉन्टॅक्ट हो, लॅब असिस्टंट मंडळीशी आणखी काय आणि वर्षभर सिन्सियर व हुशारीचा टेम्भा मिरवणारे आम्ही सुद्धा बाजीगर मंडळीकडे जर्नल्स मिळवण्यासाठी नंबर लावतो. काय करणार कलीयुग आहे, असं म्हणत खोटं समाधानही करून घेतो.

बाजीगर मंडळी वर्कशॉप, इंजिनीरिंग ड्रॉईंग इ. सारख्या विषयात जात्याच निष्णात असतात आणि या विषयांचे सर्व प्रथम सबमिशन पूर्ण करून "यहाँ के हम सिकंदर, चाहें तो रख ले सबको अपनी जेब के अन्दर", अश्या अविर्भावात फिरत असतात. जर्नल्स व त्यामधील ड्रॉइंग्स सुद्धा यांची अप्रतिम असतात. आठ-आठ दिवस आंघोळ न करणारी व पूर्ण सेमिस्टर भर बेडशीट न बदलणारी, कधीमधी दाढी करणारी ही मंडळी, मात्र यांची जर्नल्स एकदम टापटीप. एका झटक्यात फुल्ल इंटर्नल मार्क्स घेणारी आणि आम्ही वर्षभर घासून रन आऊटच्या भितीने सिंगल्सही न घेणारी व वर्षाअखेर सिंगलच राहणारी.

सबमिशननंतर ही मंडळी अभ्यासाचा थेट टॉप गियर टाकायची आणि बघता बघता अध्यापकांशी अभ्यासातील कठीण टॉपिक्सवर सखोल चर्चा करू लागायची. आमच्यासारख्या डिफेन्सिव्ह खेळणाऱ्याला टिपिकल प्रश्न विचारून भंडावून सोडायची आणि खूप चेंडू वाया घालवूनही शून्यावर आऊट होणाऱ्या चेतेश्वर पुजारासारखी किंवा पुढच्या सामन्यात चांगले खेळू असे ठरवून परत परत फ्लॉप होणाऱ्या के.एल. राहुलसारखी आमची अवस्था व्हायची. अध्यापकही रोहित शर्मासारखे वैतागून जायचे आणि यांचा डायलॉग असायचा "खाली घिस के फायदा नाही यार, इंजिनियर का कन्सेप्ट क्लीयर होना चाहिये". आमच्या कॉन्फिडन्सची पार वाट लागायची ना राव. तेव्हा ही मंडळी आम्हाला "जो जिता वही सिकंदर" पिक्चर मधील अमीर खानसारखी वाटायची.

वर्गातल्या पोरी सुद्धा वर्षभर आमच्या नोट्स वापरून, आमच्याकडून डिफिकल्टीज सोडवून घेऊन आम्हाला हाक मारताना ये जोशी, ये कुलकर्णी,

ये पाटील याच्या पलीकडे गेल्या नाहीत आणि या बाजीगरला पहिल्याच भेटीतच चक्क "हाय कुलस, हाय पॅट, हाय सँडी" म्हणू लागायच्या.

संदीपचा सँडी, दिपकचा डिप्पू, अजयचा अज्जू तर समीरचा सॅम करून चक्क कॅन्टीनमध्ये चहा आणि क्रीम रोल हाणत या पोरी तासन्तास पडीक राहत.

आठ-आठ दिवस अंघोळ न करणारी, पार्टनरचा उसनवारी वर घेतलेला मळका शर्ट घालून फिरणारी व कधीतरी दाढी करणारी ही बाजीगर मंडळी अनिल कपूर, विनोद खन्ना, फिरोज खान सारखी भाव खाऊन जायची आणि आम्ही मात्र रोज अंघोळ करून, दाढी करून, केसाला तेल लावून चापून भांग पाडूनही राहुल रॉय, कुमार गौरव, गुलशन कुमारचा भाऊ किशन कुमार यांच्या सारखेच राहिलो.

आणि खरंच, ही बाजीगर मंडळी बाजीगरच ठरली. आम्ही सेफ गेम खेळत बापाच्या वशिल्याने सरकारी नोकरी करून व अरेंज मॅरेज करून सुखी संसाराला लागलो आणि ह्या मंडळीनी मात्र सरकारी नोकरीची कास न धरता खाजगी क्षेत्रात नोकरी पत्करून संघर्ष पूर्ण जीवन सुरु केले.

बरीच वर्ष लोटली आता, कॉलेजचे मित्र-मैत्रिणी दुरावल्या मधल्या काळात . पण सोशल मीडियाच्या क्रांतीने पुन्हा बिछडे यार भेटू लागले आणि सुरु झाले री-युनिअन ग्रुप्स, माजी विद्यार्थ्यांचे मेळावे इ.

असाच एके संध्याकाळी माझ्या चौकोनी परिवारासोबत फिनिक्स मॉलच्या बाहेर घरी जाण्यासाठी टॅक्सीची वाट पाहत होतो आणि इतक्यात एक लांबलचक कार येऊन उभी राहिली. ड्रायव्हरने कार थोडी बाजूला घेतली आणि मालक गाडीतून उतरला. मी आपल्या टिपिकलपणे त्याच्याकडे दुर्लक्ष केले, पण इतक्यात कानावर परिचित स्वर उमटले, "ये हाय कुलस, तू तो च ना... आपला घासू यार" मी पटकन वळलो पाहतो तर काय चक्क बाजीगर पॅडी.. म्हणजे पटवर्धन... पोरींचा पँट्स समोर उभा. वही अदा, वही काले, घने और मुलायम बाल, एकदम फिट है बॉस आजही. मी चटकन पोट आत घेत, डोक्यावर उरलेले केस सावरत त्याला भेटलो. तो बाजीगर आज एका बहुराष्ट्रीय कंपनीचा भारतातील प्रमुख आहे. कंपनीचा भारत देशातील पूर्ण कारभार सांभाळतो आहे. एक मोठा माणूस झाला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख असलेला... शोभतो तो, खरा बाजीगर...

कॉलेज लाईफमध्ये त्याला न समजू शकलेलो मी आजच्या भेटीत एका मिनिटांत समजलो , तो जणू म्हणत होता,

"यहाँ के हम सिकंदर,  
चाहें तो रख ले सबको  
अपनी जेब के अन्दर,  
अरे हमसे बचके रहना मेरे यार...  
नहीं समझे है वो हमें, तो क्या जाता है,  
हारी बाजी को जीतना हमें आता है..."

******

## मानव संसाधन व कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांची सक्षमीकरण परिषद (मल्हार-२०२३) संपन्न

"ज्याप्रमाणे अन्न, वस्त्र व निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. त्याप्रमाणे वीज ही अत्यावश्यक व मूलभूत गरज बनली आहे. या महत्त्वाच्या क्षेत्रात काम करताना मानव संसाधन व कामगार विभागाने सातत्याने कर्मचारी व कामगार संघटना यांच्यात सुसंवाद वाढविला पाहिजे", असे मत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक यांनी व्यक्त केले.

महापारेषणच्या वतीने महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या तिन्ही वीज कंपन्यांतील मानव संसाधन व कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांची दोन दिवसीय सक्षमीकरण परिषद (मल्हार-२०२३) रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, भाईंदर येथे आयोजित केली आहे. त्या परिषदेत श्री. पाठक बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादीकर, महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. धनंजय सावळकर, महापारेषणचे मुख्य व्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, महावितरणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. भूषण कुलकर्णी उपस्थित होते.

परिषदेच्या सुरूवातीला महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी प्रास्ताविकातून परिषदेमागची भूमिका विषद केली. तिन्ही कंपन्यांमध्ये मानव संसाधन व कामगार अधिकाऱ्यांशी समन्वय रहावा, यासाठी ही परिषद आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. पाठक पुढे म्हणाले, "पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदींजीच्या नेतृत्वात जी-२० परिषद दिल्लीत सुरू आहे. त्यामुळे विविध देशांतील प्रतिनिधी भारतासोबत विविध करार करीत आहेत. भारताचा वेगाने विकास होत आहे. 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना खऱ्या अर्थाने रूजत आहे. त्यामुळे भारत देश बदलतोय. वीज क्षेत्रातही आमुलाग्र बदल होत आहेत. महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या तिन्हीही कंपन्या महत्त्वाच्या आहेत. यामध्ये मानव संसाधन विभागाची भूमिका खूप मोठी व व्यापक आहे. त्यासाठी त्यांनी वेगळा विचार (आऊट ऑफ बॉक्स) केला पाहिजे. खासगी वीज कंपन्यांशी स्पर्धा करताना आपण अधिकारी, कर्मचारी व कामगार संघटनेमध्ये सुसंवाद ठेऊन पारदर्शी कारभार ठेवला पाहिजे".

यावेळी श्री. विश्वास पाठक यांचा सत्कार श्री. सुगत गमरे यांनी केला. श्री. सुगत गमरे यांचा सत्कार श्री. सुधीर वानखेडे यांनी केला. डॉ. धनंजय सावळकर यांचा सत्कार श्री. आनंद कोंत यांनी केला. श्री. सुधीर वानखेडे यांचा सत्कार श्री. राजू गायकवाड यांनी केला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (मा.सं. आस्थापना) श्री. नितीन कांबळे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार व्यवस्थापक (मा.सं.) श्री. महेश आंबेकर यांनी मानले.

## आम्ही आपले आभारी आहोत

**कोयना जल विद्युत केंद्र संकुल येथून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**
**मे २०२३ :** श्री. निवास कृष्णाजी जगताप – उप कार्यकारी अभियंता, श्री. साहेबराव बापूराव शिर्के – उप वरिष्ठ व्यवस्थापक, श्री. पोपट जिजाबा भापकर – उप कार्यकारी अभियंता, श्री. राजू बाबुराव देशीकर – प्रभारक श्रेणी-२.
**जून २०२३ :** श्री. आनंदराव गणपतराव पाटील – उप कार्यकारी अभियंता, श्री. सुहास सखाराम नांदस्कर – तंत्रज्ञ-१.
**जुलै २०२३ :** श्री. मधुकर बालाजी बागदुरे – उप कार्यकारी अभियंता.
**ऑगस्ट २०२३ :** श्री. शंकर देवजी चाळके – दप्तरी.
**ऑक्टोबर २०२३ :** श्री. अशोक सखाराम शंकपाळ – सहाय्यक अभियंता.

**येलदरी जल विद्युत केंद्रातून महिन्यात सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी:-**
**मे २०२३ :** श्री. बद्रुद्दिन बशीरोद्दिन सातभाई – सहाय्यक अभियंता.
**जून २०२३ :** श्री. प्रदीप प्रभाकरराव वाकोडकर – तंत्रज्ञ-१.
**ऑगस्ट २०२३ :** श्री. फिरोज अब्दुल अजीज शेख – उप कार्यकारी अभियंता.

**वैतरणा जल विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी:-**
**मे २०२३:** श्री. बाजीराव नारायण सगभोर-तंत्रज्ञ-१, श्री. वालू सावलीराम गांगोडे-प्रभारक श्रेणी-२.
**ऑगस्ट २०२३ :** श्री. गणपत कृष्णा रोंगटे – अपर विभागीय लिपीक (वित्त व लेखा).

**पानशेत जल विद्युत केंद्रातून मे २०२३ मध्ये सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी:-**
श्री. विश्वास हिराजी गायकवाड – तंत्रज्ञ-१, श्री. केशव राजाराम साबळे – प्रभारक श्रेणी-१, श्री. शंकर सखाराम जाधव – मदतनीस.

**पुणे नवीकरणीय ऊर्जा केंद्रातून मे २०२३ मध्ये सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी:-**
श्री. रंगनाथ शंकरराव भोंडवे – कार्यकारी अभियंता (स्थापत्य).

**कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी:-**
**मे २०२३ :** श्री. श्रीकांत विष्णु नाफडे – कार्यकारी अभियंता, श्री. सुधीर सुभाष पंजाबी – कार्यकारी अभियंता, श्रीमती. सुनिता अविनाश दातेराव – सहाय्यक अभियंता, श्री. राजेश सत्यपाल दिवरे – तंत्रज्ञ-१, श्री. प्रकाश गणपतराव अकोटकर – तंत्रज्ञ-१.
**जून २०२३ :** श्री. दिपक नामदेवराव आगमे – तंत्रज्ञ-१, श्री. सुरेश गणपत चौधरी – तंत्रज्ञ-१, श्री. विजय भाऊराव कामडी – तंत्रज्ञ-१, श्री. रामभाऊ उपासराव फंदी – तंत्रज्ञ-२, श्री. दिलीप रामभाऊ वाघ – वाहन चालक.
**जुलै २०२३ :** श्री. राकेश मोहनसिंह ताराचंद – कार्यकारी अभियंता, श्री. अनिरुध्द कृष्णाजी घिर्णीकर – कार्यकारी अभियंता, श्री. गोपाळ नारायण निपाणे – सहाय्यक अभियंता, श्री. शुध्दोधन राजाराम मेश्राम – अन्य कर्मचारी-४.
**ऑगस्ट २०२३ :** श्री. नरेंद्र गोविंदराव निमजे – सहाय्यक अभियंता, श्री. अनंतप्रभु रामभाऊ राखुंडे – तंत्रज्ञ-१, श्री. मनोहर श्रीराम महादुले – तंत्रज्ञ-१, श्री. नासीर मुस्तफा शाह – प्रभारक श्रेणी-१, श्री. प्रकाश गोविंदराव भिमगडे – चालक.
**सप्टेंबर २०२३ :** श्री. समीर मदन जोशी – कार्यकारी अभियंता (निर्मिती बांधकाम), श्रीमती. कुमुदिनी संजय टेकाडे – मुख्य लिपीक.
**ऑक्टोबर २०२३ :** श्री. पिराजी गिरमाजी रेवतकर – तंत्रज्ञ-१.

**सांघिक कार्यालय, मुंबई येथून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी:-**
**मे २०२३ :** श्री. निनाद दत्तात्रय कुलकर्णी – कार्यकारी अभियंता.
**सप्टेंबर २०२३ :** श्री. आनंद नामदेवराव गजभे – उप मुख्य अभियंता.
**ऑक्टोबर २०२३ :** श्री. विजय सिताराम चितलांगे – मुख्य महाव्यवस्थापक (लेखा), श्री. किशोर बाळकृष्ण बाविस्कर – उप कार्यकारी अभियंता, श्रीमती. स्नेहा राजु साठे – वरिष्ठ व्यवस्थापक (मासं).

**नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी - कर्मचारी :-**
**मे २०२३ :** श्री. बाबासाहेब आनंदराव पाटील – उप मुख्य अभियंता, श्री. महेशकुमार दत्तात्रय भोपे – कार्यकारी अभियंता, श्री. सुनिल वेदू रनाळकर – उप कार्यकारी अभियंता, श्रीमती. रागिणी अजय कुलकर्णी – अतिरिक्त कार्यकारी अभियंता, नंदू मुरलीधर वाघ – अतिरिक्त कार्यकारी अभियंता, श्री. अमृत दला देवरे – तंत्रज्ञ-१.
**जून २०२३ :** श्री. सुनिल यशवंत चौधरी – कार्यकारी अभियंता, श्री. संजय यशवंतराव पाटील – प्रयोगशाळा रसायनशास्त्रज्ञ.
**जुलै २०२३ :** श्री. श्रीनिवास रेणुकादासराव देशमुख – कार्यकारी अभियंता, श्री. प्रभाकर भागवत निर्मल – उप कार्यकारी अभियंता, श्री. मुश्ताक अहमद शेख – तंत्रज्ञ-१, श्री. बाबासाहेब नारायण गुलदगड – अग्निक, श्री. देवेंद्र वसंत सोनार – चालक.
**ऑगस्ट २०२३ :** श्री. नितीन गजाननराव पुणेकर – मुख्य अभियंता, श्री. शिवाजी विठ्ठलराव सहाणे – रसायनशास्त्रज्ञ, श्री. राजेंद्र बाबुराव मुरकुटे – चालक.
**सप्टेंबर २०२३ :** श्री. प्रकाश अंबादास थोरात – तंत्रज्ञ-१.
**ऑक्टोबर २०२३ :** श्री. विजय जयचंद्र संतोषे – तंत्रज्ञ-१

**परळी औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी:-**
**मे २०२३ :** श्री. भागवत लक्ष्मण डोंगरे – प्रभारक श्रेणी-२, श्री. राजेंद्र बाबुराव पवार – वरिष्ठ व्यवस्थापक, श्री. किशन संभाजी शिंदे – अतिरिक्त कार्यकारी अभियंता.
**जून २०२३ :** श्रीमती. विश्रांती संभाजी वातोडे – मुख्य लिपीक (स्थापत्य), श्री. अनिल विश्वनाथराव सुत्रावे – व्यवस्थापक (मासं), श्री. देविदास नरसिंहराव देवकाते – तंत्रज्ञ-१, श्री. नारायण पांडुरंग जाधव – प्रभारक श्रेणी-२, श्रीमती. इंदुमती पांडुरंग चव्हाण – अन्य कर्मचारी-४.
**ऑगस्ट २०२३ :** श्री. शाहीर विठ्ठलराव मलमे – तंत्रज्ञ-२.
**सप्टेंबर २०२३ :** श्री. अरविंद वसंत येले – कार्यकारी अभियंता.
**ऑक्टोबर २०२३ :** श्री. महेंद्र श्रीपतराव शिंदे – लघु टंकलेखक.

**खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**
**मे २०२३ :** श्री. ज्ञानेश्वर केशवराव आंभोरे – सहाय्यक अभियंता, श्री. राहुल लक्ष्मण सोरडे – शिपाई.
**जून २०२३ :** श्रीमती. आशा दिपक समुद्रवार – कनिष्ठ विभागीय लिपीक, श्री. हेमराज किसन नागरे – तंत्रज्ञ-१, श्री. राजन मंगरुजी येरमे – टंकलेखक.
**जुलै २०२३ :** श्री. उमेद कालिदास शामकुवर – अधीक्षक अभियंता, श्री. रमेश सुखराम कार्लेकर – वाहन चालक, श्री. अरुण विठोबा पोगडे – चालक.
**ऑगस्ट २०२३ :** श्री. ईश्वर नामदेव बांबळ – प्रभारक श्रेणी-१.
**सप्टेंबर २०२३ :** श्री. अरुण शामराव पारधी – कनिष्ठ अभियंता, श्री. पुरुषोत्तम भाऊराव घोडे – तंत्रज्ञ-१.
**ऑक्टोबर २०२३ :** श्री. विजय गणराज अढाऊ – कार्यकारी अभियंता.

**चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**
**मे २०२३ :** श्री. शंकर पुंजाजी रिठे – वरिष्ठ व्यवस्थापक (मासं), श्री. ज्ञानेश्वर विष्णु भोयर – कनिष्ठ अभियंता, श्री. राजेंद्र रघुनाथ झोपे – प्रयोगशाळा रसायनशास्त्रज्ञ, श्री. वासुदेव लक्ष्मण कुरेकर – मुख्य लिपीक, श्री. पुरुषोत्तम आनंदराव पुनसे – तंत्रज्ञ-१, श्री. राजेंद्र भास्कर अंबोडकर – तंत्रज्ञ-१, श्री. नागो महादेव चौखे – तंत्रज्ञ-१, श्री. प्रकाश नाथासा परभणकर – तंत्रज्ञ-१, श्री. महेंद्र पांडुरंग जारी – तंत्रज्ञ-२, श्रीमती. रेखा रमेश धोत्रे – शिपाई.
**जून २०२३ :** श्री. सुहास मधुकर जाधव – अधीक्षक अभियंता, श्री. अजय नानाजी पुप्पलवार – कार्यकारी अभियंता, श्री. चंद्रकांत श्रीधर भांडक्कर – उप कार्यकारी अभियंता, श्री. सुर्यभान महादेव गजभे – कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ, श्री. महेंद्र प्रल्हाद जुनघरे – रसायनशास्त्रज्ञ, श्री. पांडुरंग रामचंद्र निमसडे – तंत्रज्ञ-१, श्री. राजा शंकरराव वेमुला – तंत्रज्ञ-१, श्री. संजय मनोहर जुमडे – तंत्रज्ञ-१, श्री. देविदास शामराव देवगडे – तंत्रज्ञ-१, श्री. शशिकांत पांडुरंग कडू – तंत्रज्ञ-१, श्री. अनिल रामभाऊ वालबिंदे – तंत्रज्ञ-१, श्री. महादेव गोपीनाथ उरकुंडे – तंत्रज्ञ-१, श्री. राजु महादेवराव रावले – तंत्रज्ञ-१, श्री. गजानन नामदेवराव बोले – तंत्रज्ञ-२, श्री. विजय घनश्याम गावंडे – तंत्रज्ञ-२, श्री. वासुदेव गोमा कावले – तंत्रज्ञ-२, श्री. राजेंद्र महादेवराव लांडे – तंत्रज्ञ-२, श्री. रमेश हिरामण मगरे – तंत्रज्ञ-२, श्री. गोपाळ चिरकुटा लांडगे – तंत्रज्ञ-२, श्री. मनोहर रामभाऊ घोडखंडे – प्रभारक श्रेणी-२, श्री. चंद्रकांत महादेवराव लाड – प्रभारक श्रेणी-२, श्री. महाविजय दिगंबर काटकर – एस.एस. आर्टिसन.
**जुलै २०२३ :** श्री. गजानन बाबुराव निमकर – सहाय्यक अभियंता, श्री. शंकर शामराव कुहीकर – कनिष्ठ अभियंता, श्री. रमेश शंकरराव सोनोने – तंत्रज्ञ-१, श्री. वामन रघुनाथ वंधारे – तंत्रज्ञ-१, श्री. तफझ्झुल अहमद शेख आलम – तंत्रज्ञ-१, श्री. पुंडलिक सदाशिव राजनहिरे – तंत्रज्ञ-१, श्री. गुणवंतराव बाबुराव जाधव – तंत्रज्ञ-१, श्री. अख्तर खान शमशेर खान खान – तंत्रज्ञ-१, श्री. तुळशीराम शंकर चिमुरकर – तंत्रज्ञ-२, श्री. नागो उधव थेरे – शिपाई.
**ऑगस्ट २०२३ :** श्री. सिध्दार्थ भगवान चिमुरकर – उप कार्यकारी अभियंता, श्री. मनोजकुमार गोवर्धन भगत – रसायनशास्त्रज्ञ, श्री. नाथु बापुराव थेरे – तंत्रज्ञ-१, श्री. संजय गोविंदराव गोटमारे – तंत्रज्ञ-१, श्री. देवराव राघो बागलावे – तंत्रज्ञ-१, श्री. ओंकार उध्दव गेडाम – तंत्रज्ञ-२, श्री. भास्कर नरहर हांडे – तंत्रज्ञ-२, श्रीमती. निर्मला मारोती पवनकुमार – अन्य कर्मचारी-४.
**सप्टेंबर २०२३ :** श्री. यशवंत विश्वंभरराव कुलकर्णी – कार्यकारी अभियंता, श्री. अनिल रघुनाथ तरे – उप कार्यकारी अभियंता, श्री. गजानन तुळशीराम नागपुरे – सहाय्यक अभियंता, श्री. विलास शंकरराव ठाकरे – तंत्रज्ञ-१.
**ऑक्टोबर २०२३ :** श्री. अनिल शामरावजी शिनकर – तंत्रज्ञ-१, श्री. रामदास दिगंबर बोबाडे – तंत्रज्ञ-१, श्री. अरविंद तात्याजी अत्राम – तंत्रज्ञ-१, श्री. राजीराम मोतीराम भाजनकर – तंत्रज्ञ-१, श्री. विजय संभाशिव अल्लदवार – तंत्रज्ञ-१, श्री. प्रकाश दौलत उके – तंत्रज्ञ-१.

**भिरा अवघड जल विद्युत केंद्रातून मे २०२३ मध्ये सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी:-**
श्री. दत्तात्रय रामकृष्ण टोनपे – उप कार्यकारी अभियंता

**भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**
**मे २०२३ :** श्री. पुंडलिक गंगाधर पाटील – प्रयोगशाळा रसायनशास्त्रज्ञ, श्री. राजेंद्र बाबुराव बोरसे – प्रयोगशाळा रसायनशास्त्रज्ञ, श्री. दिनकर रघुनाथ बारहाते – प्रयोगशाळा रसायनशास्त्रज्ञ, श्री. विलास बालिश जितीथोर – प्रभारक श्रेणी-२, श्री. काळुराम उखडू कोकणी – प्रभारक श्रेणी-२, श्री. लिलाधर नारायण झोपे – चालक, श्रीमती. मंगला भागवत पाटील – संदेशवाहक.
**जून २०२३ :** श्री. राजेश मोतीराम दुथाडे – अधीक्षक अभियंता.
**ऑक्टोबर २०२३ :** श्री. सुभाष किसन भांगले – कार्यकारी अभियंता, श्री. वासुदेव खेमचंद सरोदे – सहाय्यक अभियंता, श्री. सुरेश नारायण वारके – प्रभारक श्रेणी-२, श्री. शरद दिगंबर बारहाते – वाहन चालक.

**पारस औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**
**जून २०२३ :** श्री. गजानन हरीभाऊ धरमाले – तंत्रज्ञ-१.
**जुलै २०२३ :** श्री. चंद्रकांत दल्लूभाई पटेल – प्रथमोपचार सेवक.
**ऑगस्ट २०२३:** श्री. प्रमोद प्रभाकर अग्निहोत्री-मुख्य लिपीक, श्री. श्रावण पंढरी मास्कर-तंत्रज्ञ-१.

**उरण वायु विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**
**जून २०२३ :** श्रीमती. कुंदा श्रावण धोत्रे – टंकलेखक.
**जुलै २०२३ :** श्री. सोमनाथ दत्तात्रय धोरे – अग्निक.

**वीर भाटघर जल विद्युत केंद्रातून ऑक्टोबर २०२३ मध्ये सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-** श्री. श्रीपतराव जयवंत घाटगे – सहाय्यक अभियंता.

# गौरव - अभिनंदन



सांघिक कार्यालय, मुंबई येथे स्थापत्य–३ या विभागात वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) या पदावर कार्यरत असलेले श्री. राधेश्याम उइके यांचा पाल्य कु. श्रेयश उइके, ह्याने कविवर्य सुरेश भट सभागृह, नागपूर येथे स्टार क्लासिक इंडियातर्फे आयोजित शरीरसौष्ठव स्पर्धेत ज्युनिअर मेन्स फिजिक गटात प्रथम स्थान तसेच फिटनेस मॉडेल गटात द्वितीय स्थान पटकाविले.



कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथील जल प्रक्रिया विभाग येथे तंत्रज्ञ–१ कार्यरत श्री. दिपक ना. अगमे यांचा पाल्य कु. चंद्रकांत दिपक अगमे यांनी मे २०१९ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, रामगळ येथून B-Tech केले त्यांनंतर IIM बौध्दगया येथुन MBA केले व आता सध्या MS करिता ॲरीझोना युनिव्हर्सिटी, अमेरिका येथे शिक्षण सुरु आहे.



चंद्रपूर महाऔष्णिक वीज निर्मिती केंद्र येथील ओ.डी.पी–२ विभागात तंत्रज्ञ–२ या पदावर कार्यरत असलेले श्री. सतिश पुंडलिक पाटील यांचा पाल्य कु. स्मित ह्याने हैद्राबाद येथे नुकत्याच झालेल्या अलमा ॲबॅकसच्या १८व्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील घेण्यात आलेल्या स्पर्धेत सिनिअर गटातून प्रथम क्रमांक पटकावलेला आहे. स्मित हा सेंट मेरी हायस्कूल, दुर्गापूर जि. चंद्रपूर या शाळेचा विद्यार्थी असून तो ईयत्ता ५व्या वर्गात शिक्षण घेत आहे. या स्पर्धेत भारत आणि भारताबाहेरील अन्य देशांच्या हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. हा पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम हैदराबाद येथे आयोजित करण्यात आला.





कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे पहारेकरी या पदावर कार्यरत असलेले श्री. आर.बी. वरठे यांच्या पाल्या कु. श्रुती रमेश वरठे ही वर्ष २०२२ मध्ये झालेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण शालांत परीक्षा (इयत्ता १२वी) मध्ये ७५.८०% गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे. तसेच कु. साक्षी रमेश वरठे ही वर्ष २०२१ मध्ये संपन्न झालेल्या बॅचलर ऑफ बिझनेस एडमिनिस्ट्रेशन या पदवीधर परिक्षेमध्ये ८१.००% गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे.



सांघिक कार्यालय, मुंबई येथे उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी या पदावर कार्यरत असलेले श्री. विलास रघुनाथ हिरे यांची पाल्या कु. सिध्दी विलास हिरे ही राजीव गांधी शासकीय महाविद्यालय, मुंबई येथून वर्ष २०२२ मध्ये MBBS ची पदवी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाली.




Niranjan Pardeshi, Std. IX and his Team from Sacred Heart Convent High School got First Prize in State Level Science Exhibition (Total Project Participants 170) held at KK Wagh Engineering College. Niranjan is the son of Mr. Prashant Pardeshi, who is working as Executive Engineer under Corporate Planning & Communications at H.O., Mumbai.




चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रात विद्युत चाचणी – २ येथे तंत्रज्ञ–२ पदावर कार्यरत कर्मचारी तथा सामाजिक कार्यकर्ता व गुणवंत कामगार श्री. देवराव कोंडेकर यांचा पाल्य कु. ऋग्वेद ह्याने जागतिक स्तरावरील अलमा ॲबॅकसच्या १८व्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेतील गणितीय उदाहरणाच्या (Mental Arithmatic) सोप्या पद्धतीने उत्तरे काढण्याच्या या अभिनव स्पर्धेत स्पर्धकांना अवघ्या सात मिनिटात एकशे वीस प्रश्न सोडविण्याच्या स्पर्धेत ज्युनिअर गटातून यांनी जगातून दुसरा क्रमांक पटकाविता तसेच अलमा ॲबॅकस परीक्षेची ग्रँड मास्टर ही पदवी सुद्धा मिळवली आहे.



परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे तंत्रज्ञ–३ या पदावर कार्यरत असलेल्या श्रीमती. स्वाती संतोष चाटे यांची पाल्या कु. श्रावणी संतोष चाटे हिने इयत्ता ७वी CBSE ला गुरु ॲबॅकस इंटरनॅशनल लेव्हल स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

# गौरव - अभिनंदन




"36th National Convention on Quality Concepts" औरंगाबाद शहर येथे आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत पारस औष्णिक विद्युत केंद्राच्या वतीने नियंत्रण व उपकरणे विभागाच्या Precision Kaizen Team चमूने सहभाग नोंदवला. Precision Kaizen Team ने "Coal Mill Classifier Outlet Temperature Alarm" या विषयावर Case Study प्रस्तुत करण्यात आली. सदर Case Study प्रस्तुतीकरणासाठी – "Precision Kaizen Team" ला स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरीसाठी Excellent या वर्गवारीतील क्रमांकाने गौरविण्यात आले.

या चमूमध्ये श्री. सुनय खडसे (सहाय्यक अभियंता), श्री. वैभव हिंगणे (कनिष्ठ अभियंता) व श्री. नामदेव ताठे (तंत्रज्ञ–३) यांनी यशस्वीरित्या जबाबदारी पार पाडली व सदर क्वॉलिटी स्पर्धेकरिता लागणारे प्रशिक्षण श्री. आशिष पहुरकर (अतिरिक्त कार्यकारी अभियंता) यांनी दिले. या संपूर्ण स्पर्धेकरिता पारस औष्णिक विद्युत केंद्रांचे मुख्य अभियंता यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.



पारस औष्णिक विद्युत केंद्रात उप–कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री. विकास बबनराव फुलाने यांची कन्या कु. स्पृहा विकास फुलाने हिने स्कूल ऑफ स्कॉलर्स येथे शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये दुसऱ्या वर्गात शिकत असून इंटरनॅशनल ऑलिम्पियाड स्पर्धेत इंटरनॅशनल टॉपर असून तिला खालीलप्रमाणे पदक, ट्रॉफी, बॅच आणि प्रमाणपत्र प्राप्त झाले.

१) हिंदी या विषयामध्ये आंतरराष्ट्रीय टॉपर, सुवर्ण पदक, ट्रॉफी व बॅच.
२) स्पेल टॅलेंट, सामान्य ज्ञान व चालू घडामोडी या विषयामध्ये सुवर्ण पदक व बॅच.
३) इंग्लिश आणि विज्ञान विषयामध्ये रौप्य पदक व बॅच.
४) बुद्धिमत्ता व अंकगणित चाचणीमध्ये कांस्य पदक व बॅच प्राप्त केले आहे.

सदर स्पर्धा इंटरनॅशनल ऑलिम्पियाड फाऊंडेशन, नवी दिल्ली द्वारे संपूर्ण भारतात शिकत असलेल्या विविध विषयामध्ये पारंगत असलेल्या मुलांची स्पर्धा राबविली जाते. याप्रसंगी पारस औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता व अधिकारी/कर्मचारीवृंदांनी कु. स्पृहा हिचे अभिनंदन व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या.

## राज्य–राष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत महानिर्मितीच्या श्री. दिलीप वंजारी यांची नेत्रदीपक कामगिरी




परळी औष्णिक विद्युत केंद्रात कल्याण अधिकारी या पदावर कार्यरत असलेले श्री. दिलीप वंजारी यांनी भारतातील ४ थ्या क्रमांकाची अतिशय कठीण समजल्या जाणाऱ्या सातारा हिल हाफ मॅरेथॉन (२१.१ किमी) स्पर्धा १८ सप्टेंबर २०२२ रोजी २ तासाच्या आत पूर्ण केली. तसेच ८ जानेवारी २०२३ रोजी नागपुर मॅरेथॉन स्पर्धेत ४२.२१ कि.मी. हे अंतर केवळ ४ तास ४ मिनिटांत पूर्ण करून ३५ ते ४५ वयोगटात प्रथम क्रमांक पटकावला.

त्याचबरोबर ज्या शहराला थांबणे माहीत नाही. जगातील धावपटूंचे आकर्षण असलेल्या मुंबई येथे टाटा मुंबई मॅरेथॉन स्पर्धेत १५ जानेवारी २०२३ रोजी श्री. दिलीप वंजारी यांनी ४२.२१ कि.मी. हे अंतर केवळ ४ तास ७ मिनिटे आणि २६ सेकंदात पूर्ण केले.

तसेच नागपूर शहरातील लोकमत महामॅरेथॉन मध्ये ५ फेब्रुवारी २०२३ रोजी २१.१ कि.मी. हाफ मॅरेथॉन स्पर्धा १ तास ४३ मिनिटांमध्ये पूर्ण केली.

ह्या मॅरेथॉन स्पर्धेत आंतरराष्ट्रीय स्तरावरील बहुतांश धावपटू सहभागी झाले होते. सदर मॅरेथॉन स्पर्धेत भाग घेऊन श्री. दिलीप वंजारी यांनी महानिर्मितीचा आणि परळी औष्णिक विद्युत केंद्राचे नावलौकिक वाढविलेला आहे, त्यामुळे त्यांचे परळी औष्णिक विद्युत केंद्र आणि संपूर्ण महानिर्मितीतील अधिकारी, कर्मचारी यांनी कौतुक करून अभिनंदन केले आहे. श्री. दिलीप वंजारी यांच्या या यशस्वी घोडदौडीचा महानिर्मिती परिवाराला सार्थ अभिमान आहे.



# गौरव - अभिनंदन




दि सी.एस.आर. जर्नल पुरस्कृत "एक्सेलन्स ॲवार्ड २०२२" हा पुरस्कार महानिर्मितीला प्राप्त झाला. सदर पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री मा.ना.श्री. एकनाथ शिंदे यांचे हस्ते स्वीकारताना महानिर्मितीचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. पुरुषोत्तम वारजुरकर.



महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. पी. अन्बलगन यांना पशुवैद्यक दिन - २०२३ निमित्त भारतीय प्रशासनिक सेवेत उल्लेखनीय कार्याबद्दल तसेच उत्कृष्ट पशुवैद्यक म्हणून राष्ट्रीय स्तरावर सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी मा. श्री. परशोत्तम रुपाला, केंद्रीय मंत्री (मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय) यांचे हस्ते सन्मान स्वीकारताना.

## TWO AWARDS IN THE FEATHER OF MAHAGENCO



Fly Ash Utilization Conference Expo Awards 2023 were organized by Mission Energy Foundation at Golden Tulip resort Goa. MAHAGENCO has got two awards in Fly Ash Utilization.

Award won by Maharashtra State Power Generation Co. Ltd. under the category "Excellence in Policy Initiative (State Sector)" and another Award won by Maharashtra State Power Generation Co. Ltd. Bhusawal TPS under the category "Efficient Management of Fly Ash 500 MW (State Sector) Western Region".

The awards were given at the hands of Mr. Ashwinkumar Khatri, Director General of Mission Energy Foundation, Mumbai. On behalf of MAHAGENCO, Dr. Nitin Wagh - Executive Director (Environment & Safety) has received both awards. Mr. Shailesh Padol - COO, Mr. Pankaj Sharma- Chief General Manager (Finance), Mr. Nandal- Executive Engineer (Environment & Safety), Mr. Sandip Kinake - Executive Engineer (Environment & Safety) were present on this occasion.




चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र येथे कार्यरत सहाय्यक अभियंता श्री. संभाजी बडगुजर यांनी जागतिक हृदय दिनी सायकलिंग तसेच रनिंग दोन्ही मिळून २१ हजार किलोमीटरचा टप्पा यशस्वीरित्या पूर्ण केला. यामध्ये २ द्विशतकांच्या BRM स्पर्धा, १० शतकं व ११० पेक्षा अधिक अर्धशतकांचे सायकलिंग राइड समाविष्ट आहेत. त्यांनी चंद्रपूर ते नागपूर, नागपूर ते मध्य प्रदेशातील पिपलपाणी तसेच धुळे ते नाशिक यासोबतच विविध शहरात सायकलिंग करीत जनजागृती केली आहे.

सायकलिंग सोबतच रनिंगमध्ये हाफ मॅरेथॉन २१ किलोमीटर, १० किलोमीटर, ५ किलोमीटर अंतराच्या विविध स्पर्धेत त्यांनी यशस्वी सहभाग घेतला आहे.

सायकलिंग हा सर्वोत्तम व्यायाम प्रकार असून सायकल चालवण्याचे शरीरासाठी अनेक फायदे आहेत. नियमितपणे सायकलीच्या व्यायामामुळे हृदय, फुफ्फुस, स्नायू, हाडे आणि सांध्यांचे आरोग्य चांगले राहते. रक्ताभिसरण म्हणजे शरीरातील रक्त संचालन व्यवस्थित होते. शरीराचं वजन आटोक्यात राहण्यास मदत होते तसेच ताणतणाव देखील कमी करण्यास मदत होतो. यासाठी नेहमी सायकल चालवावी, यासाठी ते निरंतर इतरांना प्रवृत्त करीत असतात.

सायकलसाठी इंधन लागत नसल्याने वातावरणात प्रदूषण तसेच ध्वनी प्रदूषण देखील होत नाही. अशाप्रकारे सर्व वयोगटातील लोकांसाठी, मुलांसाठी, महिलांसाठी, खेळाडूंसाठी सायकल चालवणे हा पर्यावरणपूरक असा एक उत्तम व्यायाम प्रकार आणि वाहतुकीचेही एक साधन आहे. 'सायकल चालवा–निरोगी रहा' तसेच 'सायकल चालवा, पर्यावरण वाचवा' हा मौल्यवान संदेश त्यांनी जागतिक हृदय दिनानिमित्त दिला आहे.

# "गुंतवणुकीद्वारे अर्थनियोजन" लोकसत्ता आणि महानिर्मितीचा संयुक्त अभिनव उपक्रम संपन्न






गुंतवणूकदार जागरूकता आणि शिक्षणासाठी 'लोकसत्ता' द्वारे सुरू असलेल्या मालिकेतील व आय.सी.आय.सी.आय. प्रुडेन्शियल म्युच्युअल फंड प्रायोजित 'लोकसत्ता-अर्थसल्ला' उपक्रम 'महानिर्मिती'च्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आला. महानिर्मितीच्या मानव संसाधन विभागाच्या पुढाकाराने गतिमान प्रशासन-मानव संसाधन या संकल्पनेवर आधारित हा लोकशिक्षणपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमात अर्थ-अभ्यासक व वित्तीय नियोजनकार श्री.कौस्तुभ जोशी यांचे मार्गदर्शन तर श्री. तांबे यांनी म्युच्युअल फंड संदर्भात उपयुक्त माहिती दिली. या कार्यक्रमाला महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. पी. अन्बलगन, संचालक (वित्त) मा. श्री. बाळासाहेब थिटे यांनी यथोचित मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास अधिकारी-कर्मचाऱ्यांची भरगच्च उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्य महाव्यवस्थापक (मासं) यांनी समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळली, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.








## महानिर्मितीच्या धारावी कार्यालय येथे अभियंता दिन संपन्न



धारावी कार्यालय येथे मुख्य अभियंता (स्थापत्य-१) श्री. दत्तात्रय साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली अभियंता दिन संपन्न झाला. यावेळी श्री. शेरविल, श्री. रडे, श्री. प्रशांत कुलकर्णी, श्री. राठोड यांनी महानिर्मिती धारावी कार्यालय येथे उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

## 'होम मिनिस्टर' मालिकेत महानिर्मिती महिला भगिनी



झी मराठीवर 'होम मिनिस्टर' या लोकप्रिय मालिकेत महानिर्मितीच्या महिला प्रतिनिधी सहभागी झाल्या होत्या. यामध्ये गीतांजली झिरमुटे, पियुषा तांबेकर, रुपाली उफाडे, दिपाली पाटील, दिपीका मुंदडा, स्वाती कैतके यांचा प्रामुख्याने सहभाग होता.

## महानिर्मितीच्या मानव संसाधन विभागाच्या पुढाकाराने गतिमान प्रशासन–मानव संसाधन या संकल्पनेवर आधारित "कंपनीचे यश आणि व्यक्तिमत्व विकास" या विषयावर प्रख्यात वक्ते सोनू शर्मा यांच्या कार्यशाळेचे आयोजन









कार्यशाळेला मंचावर आंतरराष्ट्रीय ख्यातीचे प्रेरणादायी वक्ते सोनू शर्मा, महानिर्मितीचे संचालक (वित्त) मा. श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (प्रकल्प) मा. श्री. अभय हरणे तर अध्यक्षस्थान संचालक (खनिकर्म) मा. डॉ. धनंजय सावळकर यांनी भूषविले. या कार्यशाळेला महानिर्मितीचे कार्यकारी संचालक श्री. राजेश पाटील, श्री. नितीन चांदूरकर, डॉ. नितीन वाघ, श्री. पंकज नागदेवते; मुख्य अभियंते श्री. शशांक चव्हाण, श्रीमती. विजया बोरकर, श्री. राहुल नाळे, श्री. राजीव मालेवार, श्री. भूषण कुळकर्णी प्रामुख्याने उपस्थित होते तसेच महानिर्मितीच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांची सुध्दा लक्षणीय उपस्थिती होती. कार्यक्रम आयोजन समन्वयकाची भूमिका मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. आनंद कोंत यांनी सांभाळली. सदर कार्यशाळेचे सूत्रसंचलन सौ. सोनाली चुंगडे यांनी तर आभार प्रदर्शन स्वप्निता राठोड यांनी केले, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.








क्षणचित्रे

महानिर्मितीच्या १८व्या वर्धापन दिनानिमित्त मानव संसाधन विभागातर्फे प्रकाशगड सभागृह येथे महानिर्मितीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी 'संकर्षण व्हाया स्पृहा' या मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.












महानिर्मितीचा १८वा वर्धापन दिन मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे हस्ते केक कापून साजरा करण्यात आला, त्यावेळी उपस्थित सर्व संचालक, कार्यकारी संचालक, मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक आणि अन्य वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी वर्ग.





महानिर्मितीच्या १८ व्या वर्धापन दिनानिमित्त रंगशारदा सभागृह येथे महानिर्मितीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी सांगीतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.






















## महानिर्मितीच्या १८व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय स्पर्धा पुरस्कार व विशेष पुरस्कारांचे वितरण








## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित राज्यस्तरीय स्पर्धांचा तसेच उत्कृष्ट कामगिरीबद्दल वर्ष २०२१-२०२२ च्या विशेष पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.



























## 'ऊर्जा शक्ती नाईट' या हिंदी-मराठी गितांच्या दर्जेदार सांगीतिक कार्यक्रमाने वर्धापन दिन सोहळ्याची सांगता झाली.







## कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या ४९ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून अधिकारी–कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी “हॅप्पी स्ट्रीट” “आमचं गाव” पारंपारिक सोहळ्याचे यशस्वी आयोजन






कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या ४९ व्या वर्धापन दिनानिमित्ताने कोराडी विद्युत विहार वसाहतीतील मुख्य रस्त्यावर “हॅप्पी स्ट्रीट” “आमचं गाव” साकारण्यात आले. महानिर्मितीच्या राज्यभरातील अधिकारी–कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला, त्याप्रसंगीची ही उत्साहवर्धक क्षणचित्रे.




















## महानिर्मितीतर्फे वीज क्षेत्रातील संघटनांसाठी "महानिर्मिती लक्ष्य-२०३० चा ध्यास, संघटना सहभागातून विकास" कार्यशाळेचे यशस्वी आयोजन












महानिर्मितीतर्फे नाशिक येथे वीज क्षेत्रातील संघटनांसाठी "महानिर्मिती लक्ष्य-२०३० चा ध्यास, संघटना सहभागातून विकास" कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी वीज क्षेत्रातील मान्यवर संघटनेचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. सदर कार्यशाळेत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ.पी अन्बलगन तसेच संचालक (वित्त) मा. श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) मा. श्री. संजय मारूडकर, संचालक (प्रकल्प) मा. श्री. अभय हरणे, संचालक (खनिकर्म) मा. डॉ. धनंजय सावळकर, कार्यकारी संचालक (सं. व सु.- १) श्री. राजेश पाटील, कार्यकारी संचालक (पर्यावरण व सुरक्षितता) डॉ. नितीन वाघ, कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नितीन चांदुरकर आणि अन्य वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.














## कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या उप प्रशिक्षण केंद्रातर्फे 'सुपर क्रिटिकल बॉयलर लाईटअप ॲक्टिव्हिटीज' विषयावर प्रशिक्षण संपन्न



वीज उत्पादनाच्या या महत्वपूर्ण विषयावर संचलन व सुव्यवस्था या दोन्ही विभागात कार्यरत अभियंत्यांसाठी हे प्रशिक्षण कोराडी औ.वि. केंद्राच्या नियंत्रण कक्षात आयोजित करण्यात आले. सहाय्यक अभियंता (संच क्र. ८, बॉयलर डेस्क इंजिनियर) कुमारी रितू विश्वकर्मा यांनी या विषयावर अभ्यासपूर्ण अशी माहिती उपस्थित अभियंत्यांना दिली. प्रश्नोत्तर सत्राद्वारे पूर्ण झालेल्या ह्या प्रशिक्षणाचा सुमारे ४० अभियंत्यांनी लाभ घेतला. यावेळी प्रभारी मुख्य अभियंता श्री. राहुल सोहनी उपस्थित होते. प्रशिक्षण केंद्राचे कार्यकारी अभियंता श्री. पद्माकर कामतकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता सौ. विद्या बाकडे व सहाय्यक अभियंता सौ. रेवती बडगे यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले.



# महानिर्मिती मानव संसाधन विभागाच्या पुढाकाराने वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी “क्षमता विकास प्रशिक्षण” कार्यशाळेचे यशस्वी आयोजन






दिनांक ६ ते ७ जुलै २०२३ दरम्यान लोणावळा येथे महानिर्मितीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी दोन दिवसीय निवासी प्रशिक्षणपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. एकूण ३० प्रशिक्षणार्थी यामध्ये सहभागी झाले होते. याप्रसंगी संचालक (वित्त) मा. श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) मा. श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) मा. श्री. अभय हरणे, संचालक (खनिकर्म) श्री. राजेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. सदर प्रशिक्षणात प्रामुख्याने डॉ. स्मिता दाभोळकर, श्री. समीर सुर्वे, श्री आर.के.चोप्रा, श्री. श्रीकांत लोणीकर, कर्नल बापट यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले. कार्यकारी संचालक (मासं) डॉ. धनंजय सावळकर यांनी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजनामागची भूमिका आणि अपेक्षा व्यक्त केली. सूत्रसंचलन सौ. सोनाली चुंगडे यांनी तर आभार प्रदर्शन मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. आनंद कोंत यांनी मानले.








मुंबई मुख्यालय येथे मुख्य अभियंता (लेखा) श्री. विजय चितलांगे आणि नियामक व वाणिज्य कक्षात उप कार्यकारी अभियंता श्री. किशोर बाविस्कर यांचा सेवानिवृत्त समारंभ संपन्न झाला. यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अनबलगन, संचालक (वित्त) मा. श्री. बाळासाहेब थिटे, कार्यकारी संचालक (सं. व सु.- १) श्री. राजेश पाटील, कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नितीन चांदुरकर, कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन व सुसंवाद) श्री. पंकज नागदेवते, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. आनंद कोंत, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त) श्री. पंकज शर्मा, मुख्य अभियंता (सौर) श्री. राजेशकुमार ओसवाल तसेच अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.




## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत महानिर्मितीचा २ मेगावॅट क्षमतेचा "बोर्गी" सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित





राज्य शासनाच्या "मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना" अंतर्गत २ मेगावॅटचा "बोर्गी", तालुका जत, जिल्हा सांगली येथील सौर ऊर्जा प्रकल्प महानिर्मितीने दि. २ सप्टेंबर २०२३ रोजी कार्यान्वित केला. सदर प्रकल्प उभारणीसाठी विशेष सहकार्य करणारे महानिर्मितीचे अधिकारी-कर्मचारीवृंद.

## 500 MW Flexible Simulator Training held at Koradi Training Centre, Koradi







5 Day's 500 MW Flexible Simulator Training was conducted at Koradi Training Centre for MAHAGENCO Engineers especially for Operation Wing. Executive Director (O&M-II) Shri. Pankaj Sapate, Chief Engineer (Koradi Training Centre) Shri. Rajesh Morale, Chief Engineer (Koradi TPS) Shri. Vijay Rathod, Chief Engineer (Works) Shri. Sunil Sonpethkar were present at Koradi Traning Centre for inaugural program. Training was conducted by Indo German Energy forum in coordination with STEAG India.



महानिर्मिती व महावितरण या कंपन्यांचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगड येथे महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी महानिर्मितीचे संचालक (संचलन) मा. श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) मा. श्री. अभय हरणे, मुख्य अभियंता श्री. राकेश जनबंधू, मुख्य औद्योगिक संबध अधिकारी श्री. संजय ढोके यांच्यासह महानिर्मिती व महावितरण या कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

श्रीमती. विजया रवींद्र बोरकर यांची महानिर्मितीच्या मुख्य अभियंता पदी निवड झाली असून महानिर्मितीमध्ये मुख्य अभियंता पदी महिला विराजमान होण्याची ही प्रथमच वेळ आहे. यापूर्वी उप मुख्य अभियंता या पदापर्यंत महिला अधिकाऱ्यांनी काम केले आहे, मात्र आता हा बहुमान प्रथमच श्रीमती. विजया रवींद्र बोरकर यांनी पटकावला आहे. मुख्यालय मुंबई येथे मुख्य अभियंता (प्रकल्प व्यवस्थापन गट) येथे त्यांची पदस्थापना झाली आहे.



## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत महानिर्मितीचा ४.४ मेगावॅट "कुंभोज" सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित





राज्य शासनाच्या "मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना" अंतर्गत ४.४ मेगावॅटचा "कुंभोज", तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील सौर ऊर्जा प्रकल्प महानिर्मितीने दि. ५ ऑगस्ट २०२३ रोजी कार्यान्वित केला. सदर प्रकल्प उभारणीसाठी विशेष सहकार्य करणारे महानिर्मितीचे अधिकारी-कर्मचारीवृंद.

# पारस औष्णिक विद्युत केंद्राचा ६२ वा वर्धापन दिन विविध उपक्रमांसह उत्साहात संपन्न







पारस औष्णिक विद्युत केंद्राचा ६२वा वर्धापन दिन मुख्य अभियंता श्री. शरद भगत यांच्या अध्यक्षतेखाली विविध शैक्षणिक, सामाजिक आणि क्रीडा स्पर्धा यांसारखे उपक्रम तसेच हिंदी-मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम राबवून मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यात्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था-२) श्री. पंकज सपाटे होते. विशेष अतिथी म्हणून मुख्य अभियंता (भुसावळ प्रकल्प) श्री. विवेक रोकडे, मुख्य अग्निशमन अधिकारी तथा अग्निशमन सल्लागार श्री. शशिकांत पापडे, उप मुख्य अभियंता श्री. राजेश चव्हाण, जनसंपर्क अधिकारी श्री. यशवंत मोहिते, वर्धापन दिन समिती सचिव श्री. सतिश ठाकरे प्रामुख्याने उपस्थित होते. सदर वर्धापन दिनाच्या कार्यक्रमासाठी पारस वीज केंद्राचे सर्व विभाग प्रमुख, अधिकारी-कर्मचारी-तंत्रज्ञ-कंत्राटी कामगार, कुटुंबीय, संघटना प्रतिनिधी उपस्थित होते, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.











## मुंबईची लोकल

मुंबईची लोकल धावते भारी,
लोकांची लागते कामावर हजेरी ।

पनवेल ते सीएसटी, सीएसटी ते बोरिवली,
कोणी जाते वांद्रे तर कोणी जाते अंधेरी ।

निराळी लोक निराळी राहणी,
कोणी जीन्स तर कोणी साडी।

कोणी आहे उदास तर कोणी आहे खुश,
कोणी खाते भेळ तर कोणी पिते ज्युस ।

फेरी वाला आला की, मन होते आनंदी,
लेक म्हणाली होती, आणशील बांगडी।

भाजी वाली आली की, वाटते निवांत,
घरी जाऊनी आता करते, भाजी छान।

स्मार्ट मोबाईलने लोकांना केले व्यस्त,
प्रत्येकजण आपल्या मोबाईलमधे मस्त,
कोणी खेळते गेम तर कोणी पाहते रेसिपी
कोणी लावते हेडफोन तर कोणी काढते सेल्फी।

नव्हता मोबाईल, तेव्हा जमायचा कट्टा,
आणि रंगायचा गप्पा,
सुख-दुख विसरुनी, सारे करायचे मज्जा।
अशी आपली लोकल करते सर्वांच्या सोयी
जी धावते अपार सकाळ ते संध्याकाळ ।

मुंबईची लोकल, मुंबईची जान।
मुंबईची लोकल, मुंबईची शान !

- वैशाली भावठाणकर,
**माहिती तंत्रज्ञान विभाग,**
**सांघिक कार्यालय, मुंबई.**





## कोणासमोर रडावं

नाही कापुस पिकला
नाही जवारी निघाली
बळीच्या गालावर
कशी येईन गा लाली

त्याच्या कापसाले लाल्या
त्याच्या तुरीवर लाली
सोयाबीनची दईना
जिव होई वरखाली

त्याचा खरा दिसे खाली
त्याची रिकामी शिबली
नाही कणसं भरली
नाही भरली डिबली

तुरी गेल्या ऊभावन
आशा गेली गा सरुन
ऊस जागिच सडला
डोरे आले गा भरून

नाही कापसाले भाव
नाही तुरीले चढाव
पोराईच्या पोटासाठी
कोणा समोर रडावं......

- धर्मेंद्र कन्नाके
**प्रभारक श्रेणी-१**
**चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र.**

## संघर्ष

संघर्ष गाथा मानवाची
कशी सांगावी शब्दांत
कुठे आपली माणसं
चांगली करणारी कुठेच भेटतात

उनंदुनं, वाईट करणारी
हल्ली माणसं सापडतात
कुणाचं चांगलं होत असता
पोटं फारच बिघडतात

स्वत:ला मात्र चंदनासारखी
निर्मळ समजतात
पण वागताना दुर्मिळ
कुणाच्या प्रगतीवर जळतात

पदोपदी संकटं फार
अतोनात बिमाऱ्या आहेत
संघर्ष सर्वच बाबतीत
प्रारब्धाशी लढतात

भारतीय खेकडा पॉलिसी
आहे समाजा-समाजात
नाही बघवत कुणाचे
पाय एकमेकांचे ओढतात

- राजेश लक्ष्मण वऱ्हाडे
**पारस औ.वि. केंद्र**





# कर्तव्य आणि भावना

कर्तव्य आणि भावना
यांना प्राधान्य देण्यात गफलत झाली
कर्तव्यामधली त्यागाची भावना
नकळतपणे बाजुला राहिली
कर्तव्य जाणत होते
भावना अविचार करतेय
पण कर्तव्यच ते
भावनेसाठी सारं सहन करतंय
शेवटी भावनेलाही कळलं
आपली वाट चुकली होती
पण करते काय बिचारी
कर्तव्याला कायमची मुकली होती.

-नितीन देवराम सोनवणे
तंत्रज्ञ २,
भुसावळ औ.वि. केंद्र

# स्त्री शक्ती

स्त्री शक्ती आजची
शब्दात कशी सांगावी
आपापले नेतृत्व
कार्यरचना पहावी

शिकून सवरून ज्यात
त्यात प्रगती केली
चूल आणि मूल सांभाळत
कधी मागे न पडली

पुरुषांच्या खांद्याला खांदा
एकविसावं शतक गाठलं
काय डॉक्टर वैमानिक
अंतराळही सांभाळलं

तिच्या कर्तुत्वाला
लाख मुजरा करा
अनंत मनाची माता
दिला सर्वांना सहारा

सावित्रीबाईंनी शाळा
काढून दिला अधिकार
पुरेपूर वापर त्याचा
हा प्रत्यक्षात त्याचाच प्रकार

- राजेश लक्ष्मण वऱ्हाडे
पारस औ.वि. केंद्र





# नटखट नजर तिची

नजर फितूर की हृदय, माझे मलाच उमगत नाही
प्रेम ओठांपाशीच अडते, उरी धडधड थांबत नाही

पापण्याही विनवून थकती, नको एकटक पाहू गं
पापण्यांच्या कोमल कडा तुटुनी, अश्रूचे मोती सांडले गं

डोळे मिटुनी घेतले जरी, मनात असतो विचार तुझा
बंद करुनी घेतली कवाडे, तरी सर्वत्र कसा भास तुझा

तू शांत स्थितप्रज्ञ अभ्र जणू, की तू कृष्ण प्रसन्न सावळा
निळ्या राजकुमारा तुला, बघण्याचा लागे नाद खुळा

पाहताच त्याला अचानक, नजरानजर दोघांची झाली
चुकला ठोका काळजाचा, तो हसता कळी माझी खुलली

मित्रही माझे देती मला, आव्हान कडू कॉफीपानाचे
गोडव्याचे अमृत पिणारीला, भय दाखवू कडव्या जहराचे

काय माहिती त्या खुळ्यांना, युक्ती माझ्या उत्कट प्रेमाची
कडव्या घोटासवे चोरून, त्याच्या रूपाचा गोडवा चाखण्याची

आज माझे मलाच उमगले, नजरच माझी फितूर झाली
हृदयी बसवले कधी त्याला, अन् त्याचीच मी कधी झाली ?

- सौ. तेजल मयूर पाटील
(अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
यांचे कार्यालय)

## सुरक्षितता गीत

सुरक्षितता पाळा, (दादा) सुरक्षितता पाळा
आनंदाने जगण्यासाठी, अपघाताला टाळा ।।धृ।।

लाजू नका लाजू नका, समजून घ्या नियम
कुटुंबाचे स्मरण करा, नाही सुटणार संयम
फाजिल आत्मविश्वासाने, नाही बसणार आळा
सुरक्षितता पाळा, अपघाताला टाळा ।। १ ।।

हेल्मेट गॉगल हातमोजे, कवच कुंडले
इअर प्लग बूट मास्क अंगरक्षक झाले
हेल्परपासून साहेबापर्यंत, पडू देऊ नका खाळा
सुरक्षितता पाळा, अपघाताला टाळा ।। २ ।।

नशा पाणी बरी नाही, करीत असते धिंगाणा
अनुभवाला लात मारते, म्हणते माझेच ऐकाना
व्यसनाची होळी करून, गावाबाहेर जाळा
सुरक्षितता पाळा, अपघाताला टाळा ।। ३ ।।

नाद लागला मोबाईलचा, कानही बंद झाले
इकडून तिकडून हॉर्न वाजला, ऐकायला नाही आले
गुंता झाला निर्णयाचा, कसा मुकला जीवाला
सुरक्षितता पाळा, अपघाताला टाळा ।। ४ ।।

बक्कळ पैसा खर्चून दादा, जीवन मिळत नाही
सुरक्षितता वापरल्याने, घरदार सर्व काही
दवाखान्यात भर्ती होऊन, भरू नका भाळा
सुरक्षितता पाळा, अपघाताला टाळा ।। ५ ।।

**- मधुकर श्रावण दुफारे**
**पारस औष्णिक विद्युत केंद्र**





## प्रगती मानवाची, ऱ्हास पर्यावरणाचा...

कथा सांगतो निती-गतीची, माझ्या मातीची,
पर्यावरणाच्या ऱ्हासाची, पर्यावरणाच्या ऱ्हासाची...

अरे मानवा, तूच केली कत्तल वृक्षाची, जंगले झाली बोडखी...
फरफट झाली पशुपक्ष्याची, फरफट झाली पशुपक्ष्याची...
कथा सांगतो नीती-गतीची माझ्या मातीची, पर्यावरणाच्या ऱ्हासाची...

अरे मानवा, तूच खेळला पशुपक्ष्यांच्या जीवांशी, पशुपक्ष्यांच्या जीवांशी...
शोध लाविले अनेक, जंगले उभारली सिमेंटची, जंगले उभारली सिमेंटची...

अरे मानवा, वृक्ष झाले कमी, जास्त झाल्या गाड्या,
धुरांच्या रेषेत माती झाली शुद्ध हवेची, माती झाली शुद्ध हवेची...
कथा सांगतो नीती-गतीची, माझ्या मातीची, पर्यावरणाच्या ऱ्हासाची.

अरे मानवा, लोभीपणामुळे फळभाज्यांना देतोस सुई...
म्हणून तुला लागण झाली कॅन्सर आणि शुगरची... कॅन्सर आणि शुगरची...
निर्माण केली उंच उंच टॉवर सेट अन् नेटची... सेट अन् नेटची...
कारण बनली चिमणी कावळ्याच्या मरणांची, चिमणी कावळ्याच्या मरणांची...
कथा सांगतो, नव्हे व्यथा सांगतो निती-गतीची... माझ्या मातीची, पर्यावरणाच्या ऱ्हासाची...

अरे मानवा, आता तरी जागा हो, आता तरी जागा हो...
थांबव अधोगती स्वत:ची अन् थांबव अधोगती स्वत:ची...
कास धर पर्यावरणाची, कास धर वृक्ष लागवडीची...
ऱ्हास थांबव पर्यावरणाची, कास धर वृक्ष लागवडीची...
ऱ्हास थांबव पर्यावरणाची, कास धर पर्यावरणाची.

**- प्रफुल्ल (तन्मय) एस. आवारे**
**तंत्रज्ञ-३, डी.ई.ई./ आय.टी.आय.**
**भुसावळ औ. वि. केंद्र.**

## जय बाबासाहब !!!

जब समाज में थे अंधेरे....
और बुराईयां थीं सबको घेरे...
एक शख्स ने किये ऐसे काम...
कि बना लिया
सबके दिलों में अपना मकाम

उन्होंने समाज में बहुत बदलाव लाया था...
और सभी बिछड़ों में आत्मविश्वास जगाया था...
उनकी कोशिशों से रखी गई
एक ऐसी समाज की नींव ...
जिसमें कीमती लगे सबको हर एक जीव ।

उनकी सोच से ही तो उबरा
पिछड़ों का समाज..
और सिर उठा के जीते हैं हर कोई आज....
उन्होंने ही दिया आज़ाद भारत को संविधान...
जिससे मिले हैं हक़्क़ सबको एक समान ।

बाबासाहब का संघर्ष था अद्भुत और उच्च....
उनकी लिखी किताबों में काम की बातें हैं
बहुत कुछ उनकी सोच थी नयी,
उन्होंने लिए थे अनूठे कदम..
भारत की प्रगति के बारे में ही सोचते थे वो हरदम ।

उनकी जिंदगी पर हमें बहुत गर्व है..
और जिनकी जयंती एक बड़ा पर्व है...
डॉ अंबेडकर ने दिखाई थी
इंसानियत को नई दिशा...
बाबासाहब रहेंगे जिंदा हमारे दिलों में हमेशा ।

- डॉ. फैजान आर. खान (एम.बी.बी.एस.)
पारस औ.वि. केंद्र, अकोला.





## मैत्री

शब्दाचा - नि:शब्द झाला
मैत्रीचे असे बंध जुळले
ओंठातूनही शब्द न बोलता
ह्रदयाला ही स्पर्श जाहला
जाणीव त्याची शब्दापलीकड़े
मैत्री आपली नि:शब्द झाली.
नि:शब्द तू नि:शब्द मी नि:शब्द सारे आभाळ
तू आणि मी अजूनही थांबला तिथे काळ
शब्दातून वाहे शब्दांचाच झरा
तुझ्या माझ्या साथीचा अर्थ खरा
मैत्री पलीकडले पण नात्याच्या अलीकडले
मैत्र तुझे नि माझे
डोळ्यातूनही समजे अर्थ सारे
तुझ्या अबोल शब्दांचे
नि:शब्द मैत्र अबोल झाले...
स्पर्शातूनही बोलते झाले...

- आनंद आबाराव कोंत
मुख्य महाव्यवस्थापक (मासं),
सांघिक कार्यालय, मुंबई.



## नारी

प्रेमळ तिची अदाच
रंग तिचा न्याराच,
वेगवेगळ्या तिच्या छटा
नोकरी असो वा असो गृहिणी
उमटवत असते सर्व कामात तिचा ठसा,
बालपणीची निरागस अल्लड ती.
संस्काराची शिदोरी घेवून,
मनाच्या हिंदोळ्यावर झुलते...
कधी असते नाजूक
कधी सुंदर निरागस असते नारी
कधी कठोर, कधी खंबीर,
आली वेळ तर एकटीच पडते सर्वांवर भारी.
नावे, रूपे तिची अनेक,
गावे असतात अनेक.
सुखाचे मोती वेचून
गुंफते फुलांच्या माळा,
कधी घाबरते, अडखळते
लढते, सावरते, तर कधी बावरते
कधी भांडते, तर कधी रुसते
असतो तरीही ह्रदयात
तिच्या मायेचा झरा..
स्वप्नांच्या मागे धावते,
धावता धावता पडते,
नव्या उमेदीने उठते
आणि जोमाने पुन्हा लढते
प्रयत्ने करता करता
थकत नाही स्वारी,
स्वकर्तृत्वाने घेत जाते
उंचच उंच भरारी
ती म्हणजे प्रत्येक क्षणाची साथ,
प्रत्येक अडचणींवर करते मात...
तूच घरची लक्ष्मी, तूच मांगल्याचे सार,
अन्नपूर्णा ही तूच,तूच विश्वाचा आधार,
तूच उद्याची आशा,
कर्तृत्वाचा तेजाने उजळू देत तुझ्या दाही दिशा..
महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

- गितांजली झिरमुटे
सहाय्यक अभियंता (वाणिज्य व नियामक)
सांघिक कार्यालय, मुंबई.

## तुला पाहिले मी...

तू नसतेस समीप जेव्हा
सारखा मी तुलाच शोधतो
कसले हे वेड लावलेस तू
की मी माझाच नसतो

तू का आली नाहीस म्हणून
खिन्न होऊन घेतो उसासा
दिवस पूर्ण तुझ्यात गुंततो
पण तुझ्या आठवणीने मोहरतो

आठवतो तो पहिला दिवस
तुला पाहताच स्तब्ध झालो
तू जणू वाळवंटातला शुभ्र झरा
कि मृगजळ हेच विसरलो

तू झऱ्यासारखी अवखळ
बोलकी हसरी खळखळणारी
मला शांत खडकाला
हळूच गुदगुल्या करणारी

कोण ही कुठून आली
म्हणालो हिला दूरच ठेवू
भलते शब्द वापरू नका
म्हणणारीला खूप सारं चिडवू

कधी खूप रुसायची कधी
झऱ्याचा गोडवा पेरायची
तिची लाजवाब तऱ्हा तिला
दुरूनही निकट आणायची

एक कटाक्ष मी हळूच
तिच्यावर नकळत टाकतो
किती बजावले डोळ्यांना पण
मी माझ्याच मनाशी हरतो

आठवताना हे दुसऱ्या पहाटे
दरवाज्यातच तू उभी असते
नयनीची खुशी लपवताना का
नजर झुकण्याची धडपड करते...

- सौ. तेजल मयूर पाटील
(अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
यांचे कार्यालय)



## ती...

ती राबते अहोरात्र,
तो उठायच्या आत
तिने गोठ्यात फावड ओढलेल असतं,
त्याच हाताने ती मारते थाप
गोठ्यातील म्हैशीच्या, बैलाच्या पाठीवर,
मग ती ओढते राखेखालील निखारे
आणि पेटवते चूल,
उकळणारा चहा बशीत ओतत
ती ओढते गोधडी झोपलेल्या लेकरांची,
त्यांच्या आंघोळीचे पाणी तापत असताना
तिचे हात थापत असतात भाकऱ्या
मोकळ्या टोपलीत ठेवण्यासाठी,
मागेपुढे करणाऱ्या मांजरीला
तीच पाजते दूध नुकतेच धार काढलेले,
आता सगळे तयार झाल्यावर
ती काहीतरी टाकते तोंडात आणि
निघते खुरपे घेत शेताकडे,
शेजारच्या रानातील ती
हिला बघून हसते कारण
तिला शिकवलंय लहानपणापासून,
पोरीच्या जातीने हसत राहायचं असते
नाहीतर लक्ष्मी रुसते,
आता तिला वेध लागतात
लेकरांना खाऊ घालायचे ,
भांडी धुतल्यावर जेमतेम पदर पुसते
तोवर म्हातारी सासू बाजल्यावरून ओरडते
जरा पाय चेप गो,
थोड्या वेळाने तो डुलकी काढून उठतो
तोवर ती चहा टाकून पुन्हा निघते गोठ्याकडे,
संध्याकाळी पाखरांचा किलबिलाट
अंगणात खेळत असतो तेव्हा
ती पुन्हा हसते आपल्याशीच,
रात्री सारे झोपत असताना
ती सारवत असते चूल कारण उष्टी चूल ठेवू नये,
पुन्हा बाजल्यावर पाय चेपतांना
शेजारणीचा आवाज येतो म्हातारीला ,
तुझी सून लक्ष्मी आहे हो,
ती फक्त झोपलेली सासू बघते
आणि राखेखाली निखारे सरकवत मनात म्हणते ,
देव्हाऱ्यातून बाहेर काढा आणि फक्त माणूस म्हणा...
तेव्हड्यात एक उंदीर डबा ढकलतो,
तो तिलाच परत ठेवायचा असतो फळीवर ,
ती तितकीच जुनी असते
जितकी चुलीने काळवंडलेली फळी...

- संतोष पुरोहित
सहाय्यक जनसंपर्क अधिकारी,
सांघिक कार्यालय, मुंबई.

## महानिर्मिती व्यक्ती विशेष - श्री.लक्ष्मीकांत नेवे पक्षांच्या विश्वात रमणारा महानिर्मितीचा अभियंता
## भुसावळ विद्युत केंद्र परिसरात २४३ पेक्षा जास्त पक्षी प्रजातींसह समृद्ध जैवविविधता

निसर्गाने कायम मानवाला नि:स्वार्थपणे भरभरून दिले आहे. आपणही निसर्गाचे देणं लागतो ही भावनाच मुळी अत्यंत सकारात्मक आणि महत्वाची ठरते. औद्योगिकीकरण, जागतिकीकरण आणि शहरीकरणाने नैसर्गिक संपदेचा ऱ्हास होत असून वातावरण बदल, अवेळी पाऊस, नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागतोय, हे अलीकडच्या काळात आपण अनुभवतो आहोत. त्यामुळे आपल्या आवडीनुसार प्रत्येकाने नैसर्गिक संवर्धनासाठी जाणीवपूर्वक शक्य तेवढे योगदान देणे काळाची गरज बनली आहे. आज अनेक संस्था, व्यक्ती निसर्ग संवर्धनासाठी आपला खारीचा वाटा देत आहेत मात्र ही संख्या फारच कमी आहे. भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रात सहाय्यक अभियंता पदावर कार्यरत श्री. लक्ष्मीकांत नेवे यांनी वीज उत्पादनाचे कार्य चोख बजावत पक्षी निरीक्षणाचा विलक्षण छंद जोपासला आहे. त्यांचे निसर्ग संवर्धन, पक्षी निरीक्षण आणि पक्षी अभ्यासकाच्या माध्यमातून असलेले योगदान निश्चितच प्रेरणादायी आहे.

पक्षी निरीक्षणासाठी प्रामुख्याने आवड असायला हवी म्हणजे निसर्गाचा आनंद उपभोगता येतो. श्री. लक्ष्मीकांत नेवे यांनी भूसावळ औष्णिक विद्युत केंद्र परिसराची पक्षी निरीक्षणासाठी निवड करून मागील सात-आठ वर्षांच्या नोंदी केल्या आहेत. या नोंदी 'eBird', 'iNaturalist`या सारख्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत हे विशेष. ईशान्य भारत आणि दक्षिण पूर्व आशियाई देशांमध्ये वावरणारा 'रेषाळ गवती वटवट्या' या दुर्मिळ पक्षाची भुसावळला नोंद झाली आहे. या पक्षाला बघायला संपूर्ण महाराष्ट्रातून पक्षी अभ्यासक भुसावळला येत असतात. नोंदीमुळे संशोधकांना-अभ्यासकांना फार फायदा होतो. कोणता पक्षी प्रजाती कुठे, किती संख्येने आणि कधी बघितली ? या दृष्टीने अभ्यासकांना फार सोयीचे होते. दीपनगरच्या परिसरात २४३ पेक्षा जास्त पक्षी प्रजाती असून त्यात स्थलांतर करून येणाऱ्या ८३ पक्षी प्रजाती आहेत. त्यातील दोन पक्षी प्रजाती धोकाग्रस्त असून ३४ पक्षी प्रजातींकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांना अभ्यासाअंती लक्षात आले. या सोबतच भुसावळ वीज केंद्र परिसरात जैवविविधतेवर त्यांचे नियमित काम सुरु आहे. पक्षी, पक्षांबद्दल जागृती, सेमिनार, वेबिनार, कार्यशाळा, चित्र प्रदर्शनी, फिल्ड व्हिजीट, पक्षी आणि फुलपाखरू ट्रेल वॉक सारखे उपयुक्त उपक्रम श्री. नेवे घेत असतात. भुसावळला दोन-तीन दिवस राहायला गेल्यास ते तुम्हाला पक्षी मित्र बनवू शकतात.

तसेच दीपनगर परिसरातच मारूती मैदान नावाची पाणथळ जागा तयार झाली असून याठिकाणी सर्पगरूड, मधुबाज यासारखे शिकारी पक्षी दिसायला लागले आहेत. फक्त याच पाणथळीवर १४६ पक्ष्यांची नोंद झालेली असून ४८ पक्ष्यांची वीण येथे होत असते. अडई, जांभळा बगळा, पाणलावा, पांढऱ्या छातीची कोंबडी, जांभळी पाणकोंबडी, तापस या पाणपक्ष्यांची येथे वीण झालेली आहे. याशिवाय पंचभुतांपैकी एक म्हणजे पाण्याची व्यवस्था मुबलक पावसाने झाल्याने येथे प्रथम पक्षी आले आणि त्यांनी आपल्यासोबत अनेक प्रजातीही आणल्यात ४५+ फुलपाखरे, १७ सर्प प्रजाती, दोन प्रकारची कासवे, जंगली ससा, असंख्य किटक प्रजाती, औषधी वनस्पती यासर्व संसारासह पक्षी या पाणथळ जागेत गुण्यागोविंदाने नांदत आहेत. औष्णिक केंद्र परिसरातच असलेली ही पाणथळ जागा जैवविविधतेचे उत्तम ऊदाहरण ठरत आहे आणि जैवविविधतेची उत्तम साखळी येथे तयार झालेली आहे. त्यामुळे यांचे संगोपन होणे तितकेच गरजेचे आहे. औष्णिक विद्युत केंद्र परिसरातील ही जैवविविधता पर्यावरण प्रेमींसाठी आनंददायी बाब आहे.

हा छंद कुठेही, कमी खर्चात जोपासता येतो. पक्ष्यांचे आवाज, खाण्याच्या सवयी, नातेसंबंध, प्रेमसंबंध असतात हे त्यांच्या लक्षात आले. पक्षी निरीक्षण, अभ्यास, नोंदी, पक्ष्यांच्या सवयी, पक्षी छायाचित्रण, चलचित्रण, आवाजांचा अभ्यास, गळलेल्या पिसांचा अभ्यास, पक्षांचे शरीरशास्त्र, स्थलांतर, विणीचा हंगाम, पक्ष्यांची अन्नसाखळी, पक्षी आणि निसर्ग घटके, पक्षांचा अधिवास, आरोग्य, संगोपन आणि प्रथमोपचार इत्यादी विषयक त्यांना तपशीलवार अनुभव आला आहे. आपला हा छंद इतरांसाठी प्रेरणादायी ठरावा म्हणून श्री. लक्ष्मीकांत नेवे यांनी पक्षीजगत नावाने वृत्तपत्रीय सदर सुरु केले होते. आयुष्यात आपण पक्ष्यांचा अभ्यास करू याची त्यांनी कधीही कल्पना केली नव्हती. मात्र, थोड्या जंगलभ्रमंतीनंतर विविधरंगी पक्षी खुणावू लागले आणि पक्षीनिरीक्षणाची ओढ लागली. नियमित पक्षीनिरीक्षणातून सामान्य माणूसही पक्ष्यांचा अभ्यास करू शकतो. वर्तमान पिढीने 'काऊ-चिऊ' घरात अंगणात पाहिली, अनुभवली त्याचप्रमाणे भावी पिढीला देखील 'काऊ-चिऊ' पहायला अनुभवायला मिळावी यासाठी त्यांचा हा प्रयत्न आहे. निसर्ग संवर्धनात मोलाची भूमिका बजावणाऱ्या महानिर्मितीच्या या ध्येयवेड्या अभियंत्यास तसेच पक्षी अभ्यासकाच्या उत्तुंग कार्यास त्रिवार सलाम.

अधिक माहिती तथा संपर्कासाठी,

**श्री. लक्ष्मीकांत नेवे - सहाय्यक अभियंता**
**(मोबाईल - ८१४९६५९३५३)**
**भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र**







## भुसावळ वीज केंद्राच्या संच क्र. ५ मधून १०० दिवसांपासून अखंडित वीज उत्पादन

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रातील ५०० मेगावॅट स्थापित क्षमतेच्या संच क्रमांक ५ मधून मागील १०० दिवसांपासून अखंडित वीज उत्पादन सुरु आहे. हा संच दि. १२ जानेवारी २०२३ रोजी कार्यान्वित करण्यात आला, तेव्हापासून आजतागायत ह्या संचातून वीज उत्पादन सुरू आहे. सन २०१८-१९ मध्ये १०० दिवसांच्या विक्रमी कालावधीत एकूण ९२८.६८ दशलक्ष युनिट्स एवढी वीज निर्मिती केली गेली होती, परंतु आताच्या १०० दिवसांच्या कालावधीत ७४.७४ दशलक्ष युनिट्सने जास्त वीज निर्मिती करून एकूण १००३.४१ दशलक्ष युनिट्स एवढ्या वीज निर्मितीचा नवा विक्रम नोंदविला आहे.

भुसावळ वीज केंद्राचे मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड, उप मुख्य अभियंता श्री. राजेश दुथडे (५०० मे.वॅ.), श्री. प्रशांत लोटके (२१० मे.वॅ.), अधीक्षक अभियंते सर्वश्री. सुमेध मेश्राम, सुनील पांढरपट्टे तसेच सर्व विभाग प्रमुख यांच्या मार्गदर्शनानुसार येथील अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ व कर्मचारी यांनी हे यश साध्य केले आहे.

महानिर्मिती व्यवस्थापनाचे वेळोवेळी सहकार्य आणि भुसावळ वीज केंद्रातील मनुष्यबळाच्या सांघिक प्रयत्नांतून हे यश साध्य झाले असल्याचे मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड यांनी सांगितले.

## ५,२२० मेगावॅट क्षमतेच्या सौर, पवन आणि नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी महानिर्मितीचे तीन सामंजस्य करार संपन्न

औष्णिक वीजनिर्मितीत देशातील अग्रेसर कंपनी असलेल्या महानिर्मितीने राज्याच्या ऊर्जा क्षेत्राला अधिक सक्षम करण्यासाठी अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रात दमदार पाऊल टाकले असून वैविध्यपूर्ण असे तीन सामंजस्य करार केले आहेत.

दि. १४ जून २०२३ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे मा.ना. उप मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचे उपस्थितीत संपन्न झालेल्या कार्यक्रमात महानिर्मितीने मे. एस.जे.व्ही.एन. मर्यादित (पूर्वाश्रमीची सतलज जल विद्युत निगम मर्यादित) यांचेशी सुमारे ५,००० मेगावॅट क्षमतेचे नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प, महाऊर्जा यांचेशी १२० मेगावॅटचे सौर व पवन ऊर्जा प्रकल्प तर महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांचेसमवेत १०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी महत्वपूर्ण सामंजस्य करार केले.

एकूण ५,२२० मेगावॅट क्षमतेच्या या प्रकल्प नियोजनाद्वारे राज्यातील विविध ठिकाणी सौर-उदंचन जलविद्युत (पंप स्टोरेज पद्धतीचे) आणि पवन ऊर्जा प्रकल्पांची उभारणी करण्यात येणार आहे.

नवीकरणीय ऊर्जेच्या प्रकल्पांना प्रोत्साहन देण्याचे केंद्र आणि राज्य शासनाचे धोरण असून त्यास अनुसरून महानिर्मितीने हे करार केले आहेत.

राज्याच्या ऊर्जा क्षेत्रासाठी अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या या कार्यक्रमास ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव मा. श्रीमती. आभा शुक्ला, उप मुख्यमंत्री यांचे सचिव मा. डॉ. श्रीकर परदेशी, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. लोकेश चंद्रा, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. पी. अन्बलगन, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. संजीव कुमार, मराविमं सुत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक मा. श्री. विश्वास पाठक, प्रामुख्याने उपस्थित होते.

तिन्ही सामंजस्य करारांवर महानिर्मितीचे वतीने अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. पी. अन्बलगन यांनी स्वाक्षरी केली.

मे. एस जे व्ही एन मर्यादित यांच्या वतीने श्रीमती. गीता कपूर, प्रभारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी स्वाक्षरी केली. तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी यांचे वतीने कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील यांनी तर महाऊर्जाचे वतीने महासंचालक डॉ. कादंबरी बलकवडे यांनी स्वाक्षरी करून महाराष्ट्राच्या ऊर्जा क्षेत्रातील एका अभिनव घटनेची नोंद केली.

याप्रसंगी महानिर्मितीचे संचालकवृंद मा. श्री. बाळासाहेब थिटे, मा. श्री. संजय मारुडकर, मा. श्री. अभय हरणे, मा. श्री. राजेश पाटील तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### करारांची वैशिष्ट्ये :-

- राहुरी विद्यापीठाच्या ४०० एकर जमिनीवर हा प्रकल्प साकारणार असून ह्या प्रकल्पासाठी सुमारे ४७२ कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे. महानिर्मितीद्वारे राहुरी कृषी विद्यापीठास वीज बिल कमी करण्यासाठी ५०० किलोवॅट क्षमतेचे सौर संच उभारणी करून देण्यात येणार आहे.
- महाऊर्जा, पुणे यांचेशी १२० मेगावॅट क्षमतेचे सौर-पवन सहस्थित प्रकल्प विकसित करण्यात येतील. एकूण ५१८ कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे.
- महाराष्ट्रात उदंचन पद्धतीच्या जलविद्युत प्रकल्प उभारणीसाठी मोठा वाव असून मे. एस.जे.व्ही.एन. मर्यादित यांचे संयुक्त उद्यमाद्वारे सुमारे ५,००० मेगावॅटचे नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येतील. यासाठी सुमारे रु. ४० हजार कोटी इतकी गुंतवणूक अपेक्षित आहे.
- या तिन्ही सामंजस्य कराराच्या माध्यमातून राज्यामध्ये एकूण ५,२२० मेगावॅट स्थापित विद्युत क्षमता वाढ होणार असून एकत्रित सुमारे रु. ४० हजार ९९० कोटी इतकी गुंतवणूक अपेक्षित आहे. एकूणच या तिन्ही करारांद्वारे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वरूपात टप्प्याटप्प्याने ६,००० रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत महानिर्मितीचा २ मेगावॅट क्षमतेचा बोर्गी सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

रात्री सिंचन करताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते त्यामुळे शेतीसाठी दिवसा भरवशाचा वीज पुरवठा व्हावा यासाठी राज्य शासनाने महत्वाकांक्षी "मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना" सुरु केली.

या योजने अंतर्गत २ मेगावॅटचा बोर्गी, तालुका जत, जिल्हा सांगली येथील सौर ऊर्जा प्रकल्प दिनांक २ सप्टेंबर २०२३ रोजी कार्यान्वित करण्यात महानिर्मितीला यश आले आहे.

**बोर्गी स्थापित क्षमता २ मेगावॅट :** या सौर ऊर्जा प्रकल्पामुळे बोर्गी खुर्द या गावातील सुमारे ५०० कृषी वीज ग्राहकांना सौर ऊर्जेचा लाभ होऊन, विशेषत: ५ एच.पी. चे सुमारे ५२० कृषी पंप उर्जित होणार आहेत.

सदर प्रकल्प महावितरणच्या ३३/११ के.व्ही. बोर्गी उपकेंद्राला जोडण्यात आला आहे. ४ हेक्टर शासकीय पडीक जमिनीवर हा प्रकल्प उभारण्यात आला असून, प्रकल्प उभारणीचा खर्च सुमारे ८ कोटी इतका आहे. महानिर्मिती, मेसर्स ई.ई.एस.एल.(विकासक), मेसर्स टाटा पॉवर सोलर (सब व्हेंडर) आहेत. हा प्रकल्प कार्यान्वित झाल्याने महानिर्मितीची एकूण सौर ऊर्जा स्थापित क्षमता ३७८.०२ मेगावॅट इतकी झाली आहे. ह्या सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीत गावकऱ्यांचे, स्थानिकांचे, महाऊर्जा आणि महावितरणचे विशेष सहकार्य लाभले.

या सौर ऊर्जा प्रकल्पामुळे स्थानिक पातळीवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष २० व्यक्तींना रोजगार उपलब्ध झाला आहे. ह्या प्रकल्पातून उत्पादित होणाऱ्या विजेकरिता रु. ३.३० प्रती युनिट दराने महावितरण समवेत वीज खरेदी करार करण्यात आला आहे.

राज्याचे मा. उप मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री तसेच मा. प्रधान सचिव (ऊर्जा) यांचे निर्देशानुसार आणि महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ.पी. अन्बलगन यांच्या मार्गदर्शनाखाली महानिर्मितीच्या नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प कामांना गती देण्यात येत असून महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे आणि संपूर्ण नवीकरणीय ऊर्जा चमू यासाठी विशेष परिश्रम घेत आहेत.

# “GOVERNOR TUNING WORK AT KANHER HPS”

## (An Inspirational Case Study)

**- Aditi Shankar Kharade,**
**Assistant Engineer,**
**Kanher HPS**






Kanher Power House 1x4 MW generating capacity constructed on Kanher Dam (Venna River) in 1991. Though its generating capacity is 4 MW it operates on variable head and that's why load is also variable. So type of turbine used here is Kaplan turbine. The Kaplan turbine is a propeller type water turbine which has adjusted blades. To get proper load at highest efficiency, when dam water level goes down during end of water year. During maximum to minimum head conditions, turbine guide vanes & runner blade angle tuning is very important according to head.

At Kanher HPS having Kaplan turbine with compact ELECTRO-HYDRAULIC governor system, BHEL make. To select available input head a head selector switch provided to governor system. Governor operates the runner opening according to head selector switch position to get maximum turbine efficiency. BHEL provides this head selection command according to physical head, through resistance bank. Guide vanes and runner opening command are generated through different electronics cards and RV potentiometers in Governor panel. Disturbances of any single RV potentiometer or any amplifier card gain may cause a very big difference in load and it reduces turbine efficiency and increases vibrations at the runner openingcommand.

Due to aging effect & delicate card components life spans this governor tuning were disturbed slowly. Hence gate opening and runner opening relation does not follow the slope as per design graph for different selected heads .Which results in inability to take maximum load at corresponding head.

**The Problem :-** In recent past it was observed that guide vanes were not getting fully open, and runner blade angle not followed the guide vane opening. Some time frequently runner hunting observed, which causes vibration to unit .This means all settings of governing systems were disturbed and needs fine tuning to achieve maximum turbine efficiency and full load at different heads. For this expert services are required.

Its effect shows slowly in mid of 2020 but in the 2021 generation, especially in flood situation the machine was not able to take full load at maximum head. So we put office not & asks BHEL to give offer for Governor tuning. But BHEL didn't give any response. Also not a single private vender was ready to do Governor work. When this issue was heilighted to SE HPS Pune, Shri Sanjay Kurhade, he assured to resolve the issue.

**The Inspirational Case Study :-** With guidance of higher management from Head Office, Rahul Sohani, Dy Chief Engineer, HO visited Kanher HPS for evaluation of the problem. In his visit during analysis of parameters and governor response characteristics data it was observed that Governor is totally disturbed and we are finding expert services for tuning of governor system. After discussion with us he gave us confidence to solve this problem at department level. Kanher team studied all the electronic cards drawing and functionalities of components in circuit with online VC and on phone. Even though he was busy in meeting he replied on whatsapp. So after expert technical discussion, Kanher power house In charge Shri V. P. Mali decided to solve problem at power house level.

During technical study and dry stroking trials we observed that some RV pots are become sluggish & some are not working properly. So according to amplifier gain requirement we replace some RV pot & some RV pot disturbed resistance restore after gain calculation. As shown in the diagram the RV 12 & RV 13 resistance are adjusted to get proper voltage drop in voltage divider to get correct feedback signal from site. Like this some more gain adjustment in amplifier cards

shown in figure and some resistance checking in head selector resistance bank. Also some mechanical system changes were done as per requirement on site. It results in full load generation at required head from June 2022. Following chart shows difference in last year generation & current year generation.

| Sr. No. | Generation Period | Generation in Mus | Maximum Load taken | Runner Condition | Response to small changes in Grid |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Financial Year - 1March 2021 to 30 November 2021 | 5.48 | 3.7 MW | Vibrations | Very poor may cause to trip |
| 2 | Financial Year - 1 March 2022 to 30 November 2022 | 7.19 | 4 MW | Smooth | Good |
| 3 | Water Year - 1 June 2021 to 30 November 2021 | 3.84 | 3.7 MW | Vibrations | Very poor may cause to trip |
| 4 | Water Year - 1 June 2022 to 30 November 2022 | 5.36 | 4 MW | Smooth | Good |

After some technical studies, valuable guidance of Shri. Sohani and support of Shri. Sanjay Kurhade, Superintending Engineer, Shri. Dongare (Executive Engineer Bhatgar Division), Shri. Ambatkar (Executive Engineer, Monitoring REC, Pune) we solved long term problem at power house level successfully.

Due to valuable support of our all above mentioned senior officers and efforts of technical staff after successful completion of governor tuning work generation we take was as per rated head with full load capacity. Before tuning work we cannot take 4 MW load or rated load as per rated head easily, because of vibrations & hunting of runner. But after successful completion of without vibration & hunting. It helps us to achieve MERC target more than declared. Following chart will shows MERC target achieved in this year at Kanher HPS.

| Sr. No. | MERC Target Year | MERC Target Period Dates | Declared MERC target of Kanher HPS | Actual Generation Taken from 1st April 2022 to 31st Match 2023 | Remark |
|---|---|---|---|---|---|
| 1 | FY 2022-23 | 1st April 2022 to 31st March 2023 | 11 mus | 12.27 mus | During generation Taken from 1st April 2022 to 30th June 2022 lots of problem like runner hunting, vibrations, tripping so can't take generation successfully but after completion of work from 13 August 2022 to 31st March 2023 No such problems and smooth machine operations and maximum generation with available water discharge. |

During this period from 13 August 22 to 31 March 23 for some days we didn't get water for generation due to technical problem of WRD & some days due to no water discharge requirement. But difference in unit operation we can see after tuning which helps to get successful generation more than MERC declared generation.

This inspirational case study will always help to take up study and build problem solving attitude in young engineers and technicians, like me and my team at Kanher.

# कोराडीत साकारलं आमचं गाव - कोराडी "हॅप्पी स्ट्रीट" कार्यक्रमात ४००० व्यक्तींचा प्रत्यक्ष सहभाग

**मोठ्यांना बालपणीचा आनंद तर लहानांना बिनधास्त निसर्गमय वातावरण लाभलं**
**मराठमोळ्या संस्कृतीचं दर्शन, लुप्त झालेले खेळ आणि स्वादिष्ट खाद्यपदार्थाने उदरतृप्ती**

उन्हाळ्यात शाळेला सुट्ट्या लागल्या की, मामाच्या गावाला जाऊन धमाल मस्ती करायची, गावाकडील निसर्गरम्य मातीशी नातं जोडीत, नात्यांची वीण अधिक घट्ट करायची अशी आपली मराठी संस्कृती. मात्र धकाधकीच्या जीवनात ही जागा टी.व्ही., मोबाईल, फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप सारख्या आभासी दुनियेने व्यापल्याने जीवनाचा खरा-खुरा आनंदच दूर झाला. मानवी जीवन तांत्रिक झाले, यातून उदयास आलेली शहरी संकल्पना म्हणजे "हॅप्पी स्ट्रीट". मामाच्या गावाला न जाता सुटीच्या दिवशी सकाळच्या प्रहरी मुख्य रस्त्यावरील रहदारी काही वेळापुरता बंद करून त्या ठिकाणी मनसोक्त खेळ, धमाल मस्ती करायची हा यामागचा उद्देश.

महानिर्मितीच्या कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या ४९ व्या वर्धापन दिनानिमित्ताने कोराडी विद्युत विहार वसाहतीतील मुख्य रस्त्यावर "हॅप्पी स्ट्रीट" "आमचं गाव" साकारण्यात आले. महानिर्मितीच्या राज्यभरातील अधिकारी-कर्मचारी व कुटुंबियांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. विशेषत: कोराडी, खापरखेडा, चंद्रपूर, पारस, परळी आणि मुंबई मुख्यालयातील अधिकारी व कोराडी वसाहतीतील कुटुंबीय अश्या सुमारे ४,००० व्यक्तींनी या कार्यक्रमाचा भरपूर आनंद घेतला. हिरव्यागार वृक्षांच्या सावलीत, रंगबिरंगी फुगे, झेंडे, तोरणे, कागदी फुलांनी रस्त्याला आकर्षक सजविण्यात आले होते. सोबतीला मिकी-माऊस, चार्ली चॅप्लिन आणि मोटू-पतलू कार्टून्स उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते. वयाचे भान विसरून, आपलं-परकं विसरून, प्रत्येकाने बालपणीच्या खेळाचा निखळ आनंद लुटला. नेहमी चारचाकी चालविणारा बैलबंडी चालवित होता तर माता-भगिनी आपल्या मुलांना विसरून टिक्कर बिल्ला, लगोरी, दोरीवरच्या उड्या, पाळणे इत्यादींचा मनसोक्त आनंद घेत होत्या. साडेतीन तास कसे संपले कोणालाच कळाले नाही. घराकडे परतीची पावले वळायला तयार नव्हती एवढा जीव "हॅप्पी स्ट्रीट" आमचं गावाने लावला. एरव्ही घरात बोलायला वेळ नसणारी पालक मंडळी "हॅप्पी स्ट्रीट" वर एकमेकांशी खुलून बोलताना दिसली तर मुले-मुली देखील आपले आई-वडील, टायर, लोखंडी रिंग चालवित धावत असल्याचे पाहून आश्चर्यचकित झाले. अनेकांनी गाणे म्हणून आपले गळे साफ केले. जात, पात, धर्म, वय, पद, गर्व दूर सारून प्रत्येक व्यक्ती स्वत:ला व्यक्त करीत नि:स्वार्थपणे सहभागी झाल्याचे दिसून येत होते. "हॅप्पी स्ट्रीट" च्या माध्यमातून अख्ख "आमचं गावच" कोराडीत साकारण्यात आले होते.

अखंडित वीज उत्पादनाचे राष्ट्रीय कार्य करणाऱ्या महानिर्मितीच्या अधिकारी-कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी "हॅप्पी स्ट्रीट" हा उत्तम पर्याय असल्याचे मुख्य अभियंता श्री. विजय राठोड म्हणाले. या कौटुंबिक कार्यक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद लाभला त्याचे कारण लहान मुला-मुलींसाठी बक्षिसे, बुढ्ढी का बाल (शुगर कँन्डी), कागदी फुले (ओरेगामी) प्रशिक्षण, जादूचे प्रयोग, रिंग टोस, बंदुकीच्या गोळीने फुगे फोडणे, दोरीचे झुले, बैलगाडी, गाय-वासरू, उंट, टांगा-घोडा, बकरीचे पिल्लू, बॉल गेम्स, सापशिडी, टायर, लोखंडी रिंग चालविणे, दोरीवरच्या उड्या, रांगोळी, चित्रकला तर तरुणी व महिलांसाठी मेहंदी, टॅटू, नेल आर्ट, बॅडमिंटन, फुटबॉल, लगोरी, दरीवरच्या उड्या, कंबर रिंग, प्लेट थ्रो, रबर रिंग, रेखाचित्र, पुरुष वर्गासाठी फुटबॉल, प्लेट थ्रो, बॅडमिंटन, कार्टून्स, कंचे, भवरे इत्यादी उपलब्ध होते. फूड झोनमध्ये इंडियन कॉफी हाऊसचे खाद्यपदार्थ, शबाना बेकरीचे प्रोडक्टस्, समोसा, चहा, ढोकळा, मोमो, मोड कडधान्ये, भेळ, चना मसाला, पाणीपुरी, नारळपाणी, उसाचा रस, उकडलेले बोरं अश्या नानाविध खाद्यपदार्थांची रेलचेल होती. ज्येष्ठ नागरिकांसाठी योगासन,बुद्धिबळ, कॅरम, वृत्तपत्र,मासिके वाचन व संगीत तर मुख्य स्टेजवर डी.जे. संगीत, रेडीओ जोकीची धमाल कॉमेंट्री, झुम्बा डान्स थरार तर दुसऱ्या मंचावर प्रत्येकाला व्यक्त होण्याची संधी ज्यामध्ये गाणे, नृत्य, मिमिक्री, कविता, वाद्य वाजविणे इत्यादी कला अनेकांनी सादर केल्या. संचालक (संचलन) श्री. संजय मारुडकर यांनी सर्व उपस्थितांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या तसेच चित्रपटातील गाणे सादर केले.

कोराडी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता श्री. विजय राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली कोराडी चमूच्या सहकार्याने "हॅप्पी स्ट्रीट" (आमचं गाव) कार्यक्रम अतिशय यशस्वीरित्या संपन्न झाला. कार्यक्रमाला महानिर्मितीचे संचालक (संचलन) श्री. संजय मारुडकर, कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था - २) श्री. पंकज सपाटे, मुख्य अभियंते सर्वश्री. विलास मोटघरे, अनिल काठोये, विवेक रोकडे, सुनील रामटेके, कोराडी-खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचे उप मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते, वर्धापन दिन समितीचे सचिव राजेश गोरले, सहसचिव सचिन डांगोरे, महावितरणचे उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे, सेवानिवृत्त अधिकारी संजय अस्वले, विभागप्रमुख, अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ, कर्मचारी व कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेत "हॅप्पी स्ट्रीट" आयोजन समितीचे प्रमुख सचिन भागेवार, उपसमिती प्रमुख प्रविण मडावी, समन्वयक प्रवीण बुटे आणि मयूर मेंढेकर आणि सर्व पदाधिकारी व सदस्यांनी मोलाची भूमिका बजावली तसेच स्थापत्य, विद्युत, अग्निशमन, सुरक्षा तसेच सर्व विभागांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## सिंगोरी कोळसा पाईप कन्व्हेयरची प्राथमिक चाचणी यशस्वी

महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) श्री. अभय हरणे यांनी आज वेकोलीच्या भानेगांव आणि सिंगोरी खुल्या खदानीला भेट दिली.

भानेगांव कोळसा खाणीतून खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राला कोळसा वाहून नेणाऱ्या आणि कार्यान्वित असलेल्या कोळसा पाईप कन्व्हेयरच्या कामाची त्यांनी पाहणी केली तसेच कोळसा वहनाची क्षमता वाढवण्याचे निर्देश दिले.

याप्रसंगी सिंगोरी कोळसा खाणीतून कोळसा वाहून नेणाऱ्या कोळसा पाईप कन्व्हेयरची प्राथमिक चाचणी घेण्यात आली. सिंगोरी येथील बेल्ट कन्व्हेयरच्या कामाची पाहणी केली आणि उर्वरित कामे त्वरित पूर्ण करून बेल्ट कार्यान्वित करण्याचे त्यांनी निर्देश दिले.

गोंडेगाव ते भानेगांव पाईप कन्व्हेयरच्या भानेगांव अतिरिक्त भरण एरिया वरील पाईलिंगच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्याकरिता कसोशीने प्रयत्न करण्याचे निर्देश प्रकल्प अधिकाऱ्यांना व मेसर्स. इसजेक कंपनीस दिले.

यावेळी त्यांचे सोबत महानिर्मितीचे मुख्य अभियंते श्री. राजेश कराडे, श्री. नारायण राठोड आणि श्री. सुनील रामटेके तसेच उप मुख्य अभियंता श्री. गजरलवार, अधीक्षक अभियंता श्री. शिरीष वाठ, कार्यकारी अभियंते सर्वश्री. गजेंद्र गिरनार, रुपेश शेवारे, आत्माराम ब्राह्मण, शिरीष वितोंडे तसेच मेसर्स. इसजेक कंपनीचे श्री. थीनाकरन प्रामुख्याने उपस्थित होते.

## विजेच्या शिखर मागणी काळात मोलाची भूमिका अदा करणारा घाटघर संच– २ विक्रमी वेळेत कार्यान्वित

घाटघर जल विद्युत केंद्रातील १२५ मेगावॅट क्षमतेच्या संच क्रमांक–२ मध्ये फेब्रुवारी २०२३ ला स्टेटर अर्थ फॉल्ट उद्‌भवल्यानंतर मार्च २०२३ पासून दुरुस्तीच्या कामांना सुरुवात करण्यात आली आणि २६ मे रोजी हा संच विक्रमी ६९ दिवसांत कार्यान्वित करण्यात महानिर्मितीला यश आले. १२५ मेगावॅट क्षमतेचा संच क्रमांक २ देखभाल–दुरुस्ती करून कार्यान्वित करण्यासाठी ९० दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात आला होता. मात्र २१ दिवस आधीच हा संच कार्यान्वित करण्यात आला हे विशेष. उन्हाळ्यातील शिखर वीज मागणीच्या काळात निर्धारित वेळेआधी हा संच सुरू होणे ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे.

विजेची मागणी महत्तम असताना वीज उत्पादन करणे आणि मागणी कमी असतांना पंपाद्वारे पाण्याची उचल करून साठवणूक करणे, असे या संचाचे दुहेरी महत्व आहे. तसेच ग्रीडच्या मागणीनुसार केवळ अल्पकाळात शून्य ते १२५ मेगावॅट वीज उत्पादन ग्रीडला जोडता येते. जलसंपदा विभागाकडून भाडेतत्त्वावर संचलन व सुव्यवस्थेसाठी घाटघर संच महानिर्मितीतर्फे चालविण्यात येत आहे.

महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन, संचालक (संचलन) श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) श्री. अभय हरणे आदींनी टीम घाटघरचे अभिनंदन केले.

घाटघर टीमने उत्साहाने, ओनरशीपसह काम केल्याने कमी कालावधीत दुरुस्तीचे कार्य पूर्ण करून विक्रमी वेळेत संच कार्यान्वित करण्यात आला हे विशेष. त्यामध्ये मुख्य अभियंता श्री. अजय बामणे, उप मुख्य अभियंता श्री. अभिजित कुळकर्णी, अधीक्षक अभियंता श्री. संजय भागवत यांच्या नेतृत्वात हे काम यशस्वी करण्यात आले. यासाठी कार्यकारी अभियंता श्री. गौतम कंभोज, अतिरिक्त कार्यकारी अभियंते सर्वश्री. पंकज काशिव, तेजस पाटील तसेच चाचणी टीम नवीकरणीय ऊर्जा, नाशिक यांचे परिश्रम लाभले. तसेच या कामी विशेष सहकार्य कार्यकारी अभियंता (आर.ई.सी.) पुणे श्री. महेश अभ्यंकर, भाटघर येथील सहाय्यक अभियंता श्री. प्रकाश बोराटे यांचे लाभले.

## राज्यात उदंचन जलविद्युत प्रकल्प विकसनासाठी महाराष्ट्र शासन व नॅशनल हायड्रो पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड तसेच टोरंट पॉवर लि. यांच्या दरम्यान सामंजस्य करार संपन्न

राज्याच्या ऊर्जा क्षेत्राला अधिक सक्षम करण्यासाठी तसेच वीज साठवणुकीच्या दृष्टीने उपयुक्त ठरणाऱ्या उदंचन जलविद्युत प्रकल्पांवर अधिक भर देण्यात येत असल्याचे राज्याचे उप मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

दि. ६ जून २०२३ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे राज्यात उदंचन जलविद्युत प्रकल्प विकसनासाठी महाराष्ट्र शासन व नॅशनल हायड्रो पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड तसेच टोरंट पॉवर लिमिटेड यांच्या दरम्यान अनुक्रमे रू. ४४,००० कोटी व रु. २७,००० कोटी इतक्या रकमेचे सामंजस्य करार करण्यात आला.

यावेळी ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव मा. श्रीमती. आभा शुक्ला, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. लोकेश चंद्रा, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. पी.अन्बलगन, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ संजीव कुमार, संचालक (स्वतंत्र) मा. श्री. विश्वास पाठक आणि उप मुख्यमंत्री यांचे सचिव मा. डॉ. श्रीकर परदेशी हे उपस्थित होते.

उप मुख्यमंत्री मा.ना.श्री. फडणवीस म्हणाले की, "अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील हे वैशिष्ट्यपूर्ण तंत्रज्ञान आहे. उदंचन जलविद्युत प्रकल्पांव्दारे राज्यातील शेती, उद्योग आणि व्यावसायिक क्षेत्रातील विजेची वाढती मागणी भागवता येणे शक्य होणार आहे. या प्रकल्पांत हरित आणि स्वच्छ ऊर्जा निर्मितीमुळे पर्यावरणाचेही रक्षण होईल".

नॅशनल हायड्रो पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड (NHPC) राज्यात ७,३५० मेगावॅट क्षमतेचे उदंचन जलविद्युत प्रकल्प विकसित करणार आहे. केंद्र सरकारने नॅशनल हायड्रो पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या मूल्यांकन अहवालानुसार राज्यातील सावित्री (२२५० मेगावॅट), काळू (११५० मेगावॅट), केंगाडी (१५५० मेगावॅट) व जालोंद (२४०० मेगावॅट) या ४ ठिकाणी ऑन स्ट्रिम (On-stream) उदंचन जलविद्युत प्रकल्प विकसित करण्यासाठी ही ठिकाणे या कंपनीस वाटप केली आहेत.

मे. टोरंट पॉवर लि. कंपनी कर्जत (३००० मेगावॅट), मावळ (१२०० मेगावॅट), जुन्नर (१५०० मेगावॅट) या तीन ठिकाणी एकूण ५७०० मेगावॅट क्षमतेचे ऑफ स्ट्रिम (Off Stream) उदंचन जलविद्युत प्रकल्प विकसीत करणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यामध्ये सुमारे रु. २७,००० कोटी इतकी गुंतवणूक होणार आहे. याअंतर्गत राज्यात १३,०५० मेगावॅट क्षमतेचे उदंचन प्रकल्प उभारले जाणार असून याव्दारे एकूण ७१,००० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. ग्रीड बॅलन्सिंग, पीक डिमांड पूर्ण करणे, ब्लॅक स्टार्ट इत्यादी बाबतीत महाराष्ट्र स्वावलंबी होईल. याद्वारे रोजगार निर्मितीलाही चालना मिळणार आहे. पर्यावरणपूरक पर्यटनाच्या संधीही वाढणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

**उदंचन जलविद्युत प्रकल्प तंत्रज्ञान :** उदंचन जलविद्युत प्रकल्प (Pumped Storage Projects) नवीकरणीय ऊर्जेचा भाग असून ते बॅटरी स्टोरेजप्रमाणे कार्य करतात. यामध्ये सौर, पवन किंवा अन्य नवीकरणीय ऊर्जेद्वारे Lower Reservoir मधून Upper Reservoir मध्ये पंपिंग मोडद्वारे पाणी घेऊन या पाण्याचा वापर हायड्रोइलेक्ट्रिक विद्युत निर्मितीसाठी केला जातो. उदंचन जलविद्युत प्रकल्प हे गेल्या शतकभरामधील सिद्ध ठरलेले तंत्रज्ञान आहे. यामध्ये प्रदूषण जवळपास होत नाही, त्याचबरोबर केवळ अल्प साठवणूक क्षमतेच्या निम्न व ऊर्ध्व जलाशयामुळे मानवी वस्तीचे संपादन, पुनर्वसनचे प्रश्नही उद्‌भवत नाही. या तंत्रज्ञानालाच 'नैसर्गिक बॅटरी' असेही संबोधण्यात येते.

बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टिम दीर्घकाळ टिकाऊ ठरत नाही; तर, उदंचन संच प्रकल्प दीर्घकाळ टिकाऊ ठरतात. त्यामुळे उदंचन संच प्रकल्प जास्त व्यवहार्य ठरतो. देशात व महाराष्ट्रात ती क्षमता केवळ पश्चिम घाटाच्या परिसरामध्येच मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. याचे मुख्य कारण पश्चिम घाटांमधील अनुकूल अशी सह्याद्रीच्या पर्वत रांगांची प्राकृतिक रचना होय.

## महानिर्मिती मानव संसाधन विभागाच्या पुढाकाराने वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी "क्षमता विकास प्रशिक्षण" कार्यशाळेचे यशस्वी आयोजन

दिनांक ६ ते ७ जुलै २०२३ दरम्यान लोणावळा येथे महानिर्मितीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी मानव संसाधन विभागाच्या पुढाकाराने गतिमान प्रशासन – मानव संसाधन या संकल्पनेवर आधारित दोन दिवसीय निवासी प्रशिक्षणपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. एकूण ३० प्रशिक्षणार्थी यामध्ये सहभागी झाले होते.

स्पर्धेच्या युगात बदलती आव्हाने लक्षात घेता महानिर्मितीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये काळानुसार बदल होणे अपेक्षित असून आगामी काळात व्यावसायिक पद्धतीने ओनरशीपसह समर्पित आणि सकारात्मकरित्या आपल्याला वीज क्षेत्रात प्रभावी बदल घडवून आणायचा झाल्यास अशा पद्धतीच्या आधुनिक प्रशिक्षणाची जोड आवश्यक असल्याचे महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. पी. अन्बलगन यांनी प्रतिपादन केले. ते प्रशिक्षण सत्राच्या उद्घाटनप्रसंगी दूरदृश्य प्रणालीद्वारे बोलत होते. याप्रसंगी संचालक (वित्त) श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) श्री. अभय हरणे, संचालक (खनिकर्म) श्री. राजेश पाटील यांची समयोचित भाषणे झाली.

सदर प्रशिक्षणात प्रामुख्याने डॉ. स्मिता दाभोळकर यांनी "ताणतणाव व्यवस्थापन आणि भावनिक बुद्धिमत्ता", श्री समीर सुर्वे यांनी "परस्पर संबंध आणि वेळेचे व्यवस्थापन", श्री आर.के.चोप्रा यांनी "प्रेरणा आणि लोक व्यवस्थापन", श्रीकांत लोणीकर यांनी "निर्णय क्षमता, नेतृत्वगुण आणि टीम बिल्डिंग", कर्नल बापट यांनी "संघर्ष व्यवस्थापन" इत्यादींवर उदाहरणांसह प्रशिक्षण दिले.

प्रारंभी प्रास्ताविकातून कार्यकारी संचालक (मासं) डॉ. धनंजय सावळकर यांनी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजनामागची भूमिका आणि अपेक्षा व्यक्त केली. सूत्रसंचलन सौ. सोनाली चुंगडे यांनी तर आभार प्रदर्शन मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. आनंद कोंत यांनी मानले.

नम्र निवेदन

## अभिनव उपक्रम
## 'माझ्या जडणघडणीत महानिर्मितीचे योगदान' महानिर्मिती परिवारातील पाल्यांचे मनोगत

महानिर्मिती कंपनीत कार्यरत मनुष्यबळाच्या पाल्यांकरिता अनेक कल्याणकारी उपक्रम राबविण्यात येतात. ही पाल्य मंडळी विद्युत वसाहतीत लहानाचे मोठे झाले, त्यांनी अधिकारी मनोरंजन केंद्र, कामगार मनोरंजन केंद्र, क्रीडा मैदाने, कला, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि इतर क्रीडा स्पर्धेत/उपक्रमात सहभाग घेतला. शालेय–महाविद्यालयीन शिक्षण कालावधीत शिष्यवृत्ती, बस सुविधा मनोरंजनपर कार्यक्रम तसेच इतर सुविधांचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष पाल्यांना लाभ झाला.

आज महानिर्मिती परिवारातील काही मुलामुलींनी व्यावसायिक शिक्षण जसे संघ लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग सारख्या समकक्ष स्पर्धा परीक्षा देऊन मोठ्या पदावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. तसेच एम.बी.बी.एस., एम.डी., सी.ए., सी.एस., आय.आय.टी., आय.आय.एम., सैन्यबळ सारख्या इतर संस्थांमधून शिक्षण पूर्ण केले आहे, तर काही पाल्यांनी आपल्या बुद्धिमत्तेवर विदेशात नामांकित खाजगी कंपनीत मोठ्या पदावर स्थान प्राप्त केले आहे. काही मोठे यशस्वी उद्योजक देखील झाले. अनेकांनी विपरीत परिस्थितीत, संघर्ष करून हे श्रेय संपादित केलेले आहे. अशा गुणी पाल्यांची यशोगाथा इतरांना प्रेरणादायी ठरू शकते या निमित्ताने हा एक छोटासा प्रयत्न आहे. तसेच अनेक पाल्य विद्युत वसाहती नजीकच्या परिसरात किंवा शहरात वास्तव्यास होती, त्यांचे पालक महानिर्मितीमध्ये कार्यरत असल्याने अशा गुणी पाल्यांच्या जडणघडणीत देखील महानिर्मिती वाटा आहे, त्यांनी देखील आपल्या यशस्वी प्रवासामागील महानिर्मिती संबंधित आठवणी / प्रसंग / मनोगत पाठवावे.

महानिर्मिती परिवारासाठी ही पाल्य मंडळी खरेतर मोलाची संपत्ती आहे आणि याचा महानिर्मिती परिवारातील प्रत्येक सदस्याला सार्थ अभिमान असणे स्वाभाविक आहे. एकूणच या पाल्यांच्या जडणघडणीत महानिर्मितीचा देखील वाटा आहे असे म्हणता येईल.

नेमके हे जाणून घेण्यासाठी अश्या या गुणी पाल्यांकडून त्यांच्याच शब्दात लहानाचे मोठे होत असतानाचे, विद्युत वसाहतीतील महानिर्मिती विषयक जडणघडणीतील आठवणी, प्रसंग लेखी अथवा व्हिडीओ स्वरूपात मागवित आहोत.

'सृजन' या गृहपत्रिकेत तसेच महानिर्मिती कनेक्ट सोशल मीडियावर प्रसिद्ध करण्यासाठी हे मनोगत अतिशय उपयुक्त ठरेल. तरी, संबंधित पालकांनी त्यांच्या पाल्याला ही संकल्पना कळवावी आणि खालील माहितीसह पाल्यांच्या आठवणी / मनोगत मराठी / हिंदी / इंग्रजी कोणत्याही एका भाषेत आपल्या फोटोसह ९४२१७१७२४७ या व्हॉट्सॲप क्रमांकावर तसेच pro@mahagenco.in या ई–मेलवर पाठवावे, ही विनंती.

अल्प परिचय : ..........

संपूर्ण नाव : ..........

वडिलांचे नाव, पदनाम, कार्यक्षेत्र : ..........

कोणत्या विद्युत वसाहतीत वास्तव्य : ..........

शालेय शिक्षण : ..........

महाविद्यालयीन शिक्षण : ..........

शैक्षणिक पात्रता : ..........

सध्या कार्यरत, पदनाम : ..........

मोबाईल क्रमांक : ..........

ई–मेल आय.डी. : ..........

**जनसंपर्क अधिकारी, महानिर्मिती, प्रकाशगड दुसरा माळा, वांद्रे, मुंबई.**

**टीप – महानिर्मितीमध्ये सध्या कार्यरत किंवा सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पाल्यांकडून हे मनोगत अपेक्षित आहे.**

# ओळख

**– अंकुश घनवट,**
**कार्यकारी अभियंता (इंधन व्यवस्थापन),**
**मुख्यालय, मुंबई.**



सायन रुग्णालयाच्या डाव्या बाजूला असलेल्या मध्य रेल्वेच्या ओव्हरब्रीजवरून पलीकडे गेलं की उजवीकडे कुंभारवाडा आणि डावीकडे लेबर कॅम्प...! ओव्हरब्रीजवरून जाताना डावीकडे टाटा पॉवरच्या ट्रान्समिशन लाईनचे टॉवर दिसतात. तिथे टाटा पॉवरचं 'रिसिव्हींग स्टेशन' आहे. ओव्हरब्रीजनंतरच्या सिग्नलला उजवीकडून धारावीच्या सुप्रसिद्ध लेदर मार्केट असलेल्या ९० फूटी रोडला जाता येते. सिग्नलवरून डावीकडे वळल्यावर जवळच असलेल्या Estrella Batteries Compound मध्ये MSEB चे ऑफिस आहे. १९८९ साली मी रिक्रूटमेंटच्या वेळी सर्वप्रथम या ऑफिसमध्ये गेलो होतो. गेल्या दोन वर्षांपासून माझी पोस्टींग तिथे आहे. थोड पुढे गेल्यावर उजवीकडे लेबर कॅंटीन...! त्या काळी अण्णाभाऊ साठे यांनी त्यांच्या बऱ्याचशा कादंबऱ्यांचं लेखन त्याच कॅन्टीनमध्ये बसून केलं होतं, अस लोकं सांगतात. पुढे गेल्यावर डावीकडे टाटा पॉवरचे मेन गेट आहे, हाच रोड पुढे माटुंगा रोड स्टेशनला जातो. त्यामुळे आमचे ऑफिस धारावीमध्ये असूनही पत्ता मात्र धूर्तपणे आम्ही धारावी, माटुंगा रोड असा लिहितो. टाटा पॉवरच्या गेटसमोर असलेल्या टपरीवर दुपारी जेवनानंतर पान खायला जाणे, हा रोजचा परिपाठ. त्यानिमित्ताने थोडी शतपावली पण होते. टाटा पॉवरचे बरेचसे कर्मचारी, अभियंते याच टपरीवर येतात. पूर्वी माझा कराड कॉलेजचा एक मित्र यतनाळकर याच टाटा पॉवरच्या ऑफिसमध्ये होता. एकदा पान खायला गेल्यावर एक गृहस्थ सिगारेट पीत उभे होते. पाहता क्षणी कोकणस्थच वाटणारा, रूपेरी केस असलेला तो गृहस्थ इंजिनिअरच असणार हे मी ताडलं. त्याचे ते रूपेरी केस पाहून आपण उगीचच डाय लावून केस काळे का करतो असाही एक विचार मनात येऊन गेला. पण हेही लक्षात आलं की, आपल्या राकट सावळ्या चेहऱ्याला रूपेरी केस फार भयंकर दिसतील. का कुणास ठाऊक, पण त्या गृहस्थाशी संवाद करावा असं वाटले. त्याच्या गळ्यात टाटाचं ओळखपत्र (I Card) स्पष्ट दिसत असूनही मी उगीचच संवाद सुरू करायचा म्हणून त्यांना विचारलं, "आपण टाटा पॉवरमध्ये आहात काय?" त्यांचा अपेक्षित होकार येताच मी पुढे सरकलो. माझे कॉलेजचे एक मित्र यतनाळकर पूर्वी टाटाच्या या ऑफिसमध्ये होते, त्यांना आपण ओळखता का, असे विचारले. त्यापूर्वी यतनाळकर टाटाच्या भिरा जलविद्युत केंद्रात होते वगैरे सांगून आमची बऱ्यापैकी जवळीक असल्याचे सुचवले. त्यांच आडनांव मोडक निघालं. ते यतनाळकरांना ओळखत होते. मी सुद्धा पूर्वी भिरा येथेच होतो आणि यतनाळकरांनीच तेथून मला रिलीव्ह केले होते, असं त्यांनी सांगितलं. माझा नेम बरोबर लागला होता. खरंतर टाटाच्या भिरा येथील जलविद्युत प्रकल्पातील पाण्यावर आमचा 'भिरा टेलरेस' हा प्रकल्प आहे. सहा महिन्यांपूर्वी आमच्या विभागाचे मुख्य अभियंता श्री. सवाईतुल व सहाय्यक अभियंता श्री. पेरागी यांच्यासह या प्रकल्पाला भेट द्यायला गेलो होतो. आमचा महानिर्मितीचा प्रकल्प पाहिल्यानंतर संध्याकाळी मी टाटाचा प्रकल्प पाहण्याची इच्छा व्यक्त केली. परंतु, त्यासाठी पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असल्याचे व तेथील कडक सुरक्षा व्यवस्थेमुळे आता ती मिळणे शक्य नसल्याचे आमच्या स्थानिक अधिकाऱ्यानी सांगितले, पण मी प्रयत्न सोडला नाही. म्हटलं चला आपण जाऊ, माझे एक मित्र पूर्वी येथे होते. त्यांची ओळख सांगू, असं म्हणून आमचा ताफा टाटा पॉवरकडे निघाला. चांगलीच संध्याकाळ झाल्याने साशंकता होती, तरीपण यतनाळकरांना फोन लावला व प्रकल्प पाहण्याची इच्छा व्यक्त केली. "पण अगोदर का सांगितले नाही? मी परवानगी मिळवून दिली असती. आता परवानगी मिळणार नाही. तरीपण मी प्रयत्न करतो", असे यतनाळकरांनी सांगितले. टाटाच्या कर्मचाऱ्यांची सुंदर आखीव-रेखीव वसाहत पाहत १०-१५ मिनिटांत आम्ही टाटा प्रकल्पाच्या मुख्य प्रवेशद्वारावर पोहोचलो आणि यतनाळकरांच्या फोनची वाट पाहत थांबलो.

थोड्या वेळाने सुरक्षा विभागातील एक कर्मचारी आमच्याकडे आला. आणि माझी चौकशी केली. १०-१५ मिनिटांत यतनाळकरांनी त्यांच्या खोपोली येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आम्हाला प्रकल्प पाहण्याची परवानगी मिळवून दिली होती व आम्हाला आश्चर्याचा सुखद धक्का दिला होता.

मुळशी धरणाच्या पाण्यावर चालणारा टाटाचा भिरा जलविद्युत प्रकल्प हा अतिशय भव्य असून त्या काळातील एक चमत्कारच आहे. इतक्या वर्षांनंतरही तो तांत्रिकदृष्ट्या सक्षम आहे. त्याची भव्यता तर जीव दडपून टाकणारी... आणि हाऊसकिपींग मनाला भुरळ घालणारं! प्रकल्प पाहून आपण थक्क झालो होतो, त्या काळीसुद्धा इतक्या उच्च प्रतीचं तंत्रज्ञान टाटाने इतक्या दूरदृष्टीने या डोंगररांगात पोहोचवल्याने..।

श्री. मोडक आणि मी आता पान खायला गेल्यावर भेटलो की, अशाच काही चर्चा रोज करत असतो.

******

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत महानिर्मितीचा ४.४ मेगावॅट कुंभोज सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

रात्री सिंचन करताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते, त्यामुळे शेतीसाठी दिवसा भरवशाचा वीज पुरवठा व्हावा यासाठी राज्य शासनाने महत्वाकांक्षी "मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना" सुरु केली.

या योजने अंतर्गत ४.४ मेगावॅटचा कुंभोज, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील सौर ऊर्जा प्रकल्प दि. ५ ऑगस्ट २०२३ रोजी कार्यान्वित करण्यात महानिर्मितीला यश आले आहे.

**कुंभोज स्थापित क्षमता ४.४ मेगावॅट :** या सौर ऊर्जा प्रकल्पामुळे कुंभोज आणि हिंगणगाव या दोन गावातील सुमारे १,५०० कृषी वीज ग्राहकांना सौर ऊर्जेचा लाभ होऊन, विशेषत: ५ एच.पी. चे सुमारे १,०४० कृषी पंप उर्जित होणार आहेत.

सदर प्रकल्प महावितरणच्या ३३/११ के.व्ही. कुंभोज उपकेंद्राला जोडण्यात आला आहे. सुमारे ९ हेक्टर शासकीय पडीक जमिनीवर हा प्रकल्प उभारण्यात आला असून, प्रकल्प उभारणीचा खर्च १८ कोटी आहे. महानिर्मिती, मेसर्स ई.ई.एस.एल. (विकासक), मेसर्स टाटा (सब व्हेंडर) आहेत. हा प्रकल्प कार्यान्वित झाल्याने महानिर्मितीची एकूण सौर ऊर्जा स्थापित क्षमता ३७६.०२ मेगावॅट इतकी झाली आहे. ह्या सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीत गावकऱ्यांचे/स्थानिकांचे आणि महावितरणचे विशेष सहकार्य लाभले.

या सौर ऊर्जा प्रकल्पामुळे स्थानिक पातळीवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष ४० व्यक्तींना रोजगार उपलब्ध झाला आहे. सौर ऊर्जेद्वारे वीज सुमारे रु. ३.३० प्रती युनिट दराने महावितरण समवेत वीज खरेदी करार करण्यात आला आहे.

राज्याचे मा.उप मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री तसेच मा. प्रधान सचिव (ऊर्जा) यांचे निर्देशानुसार आणि महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांच्या मार्गदर्शनाखाली महानिर्मितीच्या नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प कामांना गती देण्यात येत असून महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) मा. श्री. अभय हरणे आणि संपूर्ण नवीकरणीय ऊर्जा चमू यासाठी विशेष परिश्रम घेत आहेत.

## 500 MW Flexible Simulator Training held at Koradi Training Centre, Koradi

5 Days 500 MW Flexible Simulator Training was conducted at Koradi Training Centre, Koradi from 3rd to 7th October 2023 for MAHAGENCO Engineers especially for Operation Wing.

This training program was inauguarated at the hands of Hon. Chairman & Managing Director of MAHAGENCO Dr. P. Anbalagan (I.A.S.) in due presence of Director (Operations) Shri. Sanjay Marudkar, Director (Projects) Shri. Abhay Harne, Director (Mining) Dr. Dhananjay Sawalkar through video conference. Executive Director (O&M-II) Shri. Pankaj Sapate, Chief Engineer (Koradi Training Centre) Shri. Rajesh Morale, Chief Engineer (Koradi TPS) Shri. Vijay Rathod, Chief Engineer (Works) Shri. Sunil Sonpethkar were present at Koradi Traning Centre for inaugural program.

Training was conducted by Indo German Energy forum in coordination with STEAG India. In this flexible load training program mainly 40% stable load without oil support is achieved. This type of flexible simulator program conducted first time in India. Certificates were distributed to participants.

## पारस वीज केंद्राच्या ६२ व्या वर्धापन दिनाला ६७ रक्तदात्यांचे रक्तदान

मुख्य अभियंता श्री. शरद भगत यांच्या नेतृत्वात पारस वीज केंद्राच्या ६२ व्या वर्धापन दिनानिमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक जाणिवेतून सुमारे ६७ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक जाणिवांचा परिचय करून दिला. विशेष म्हणजे स्वत: मुख्य अभियंता श्री. शरद भगत यांनी 'आधी केलं मग सांगितले' या उक्तीप्रमाणे रक्तदान करून उपस्थितांसमोर आदर्श ठेवला. तसेच स्वत: रक्तदान करून शिबिराचे उद्घाटन केले. डॉ. पाटणकर यांच्या संजीवन ब्लड बँकने रक्त संकलनाचे काम केले.

रक्तदान शिबिरास मुख्य अभियंता श्री. शरद भगत, उप मुख्य अभियंता श्री. राजेश चव्हाण, अधीक्षक अभियंते सर्वश्री डी एम पंधाडे, भुपेश नेतनराव, राजेश गट्टूवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. बी.एम.ताले, डॉ. फैझल खान तसेच पारस वीज केंद्राचे अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

दि. २५ ऑक्टोबर २०२३ रोजी पारस औष्णिक विद्युत केंद्राच्या मानाच्या शिरपेचात एका मानकाची वृद्धी झाली. संच क्र. ४ ने सलग १०० दिवस वीजनिर्मिती करून याच संचाचा पूर्वीचा सर्वाधिक दिवस वीजनिर्मिती करण्याचा (सलग ९२ दिवस, सन २०१७) चा उचांक मोडीत काढला.

संच क्र. ४ च्या या दैदिप्यमान कामगिरीने हा दिवस पारस औष्णिक विद्युत केंद्र आणि येथील कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी अतिशय आनंदाचा आणि अभिमानाचा दिवस आहे.

## महानिर्मितीने गाठले १० हजार अधिक मेगावॅट वीज उत्पादनाचे लक्ष्य

महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांनी राज्यातील विजेच्या मागणीत उन्हाळ्यात अपेक्षित वाढ लक्षात घेऊन 'मिशन औष्णिक ८००० मेगावॅट' चे उद्दिष्ट निश्चित करून दिले.

राज्यात यावर्षी सर्वोच्च विजेची मागणी एप्रिल महिन्यात २९ हजार मेगावॅटच्या घरात पोहचली तर सध्या २८,००० मेगावॅटच्या जवळ आहे आणि येत्या काही दिवसांत ती आणखीन वाढेल असा अंदाज आहे.

कडक उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर महानिर्मितीने आपल्या सर्व संसाधनांचे पुरेसे नियोजन केले आहे.

महानिर्मितीने दि. १७ मे २०२३ रोजी रात्री ७.४५ वाजता एकूण १०,०७० मेगावॅटचा पल्ला गाठला असून यापूर्वी दि. १७ मार्च रोजी रात्री ८ वाजता १०,१०२ मेगावॅटचा उच्चांक गाठला होता. सध्या महानिर्मितीच्या सर्व संचांतून वीजनिर्मिती सुरू आहे.

महानिर्मितीच्या या सर्व सुनियोजित उपाययोजनांमुळे महावितरणला त्यांच्या मागणीनुसार विजेची गरज भागवण्यास मोलाची मदत होत आहे आणि पर्यायाने महावितरणला बाजारातून महागडी वीज खरेदी करावी लागत नाही, हा वीज ग्राहकांचा फायदा आहे.

१० हजार अधिक मेगावॅट उत्पादनाचे लक्ष्य गाठल्याने अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांनी महानिर्मितीच्या सर्व अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ, कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

## कोराडीत सुपर क्रिटिकल तंत्रज्ञानावरील वीज प्रकल्पास मान्यता

नागपूर जिल्ह्यातील कामठी तालुक्यातील कोराडी येथे २×६६० मेगावॅट क्षमतेच्या कोळशावर आधारित सुपर क्रिटिकल तंत्रज्ञानावरील वीज प्रकल्पास मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. सदर बैठकीच्या अध्यक्षस्थानी राज्याचे मा. मुख्यमंत्री मा.ना. श्री. एकनाथ शिंदे होते.

महानिर्मिती कंपनीच्या जुन्या बंद होणाऱ्या १,२५० मेगावॅट क्षमतेच्या संचाच्या बदल्यात हा १,३२० मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प उभारण्यात येईल. यासाठी येणाऱ्या १० हजार ६२५ कोटीच्या खर्चास देखील मान्यता देण्यात आली. यापैकी ८० टक्के रक्कम म्हणजेच ८,५०० कोटी रुपये महानिर्मितीस विविध बँका आणि संस्थांकडून उपलब्ध करता येतील. तसेच २० टक्के म्हणजेच २,१२५ कोटी रुपये पुढील ५ वर्षात टप्प्याटप्प्याने भागभांडवल म्हणून उपलब्ध करून देण्यात येतील. राज्यात वेगाने होणारे औद्योगिकरण तसेच पायाभूत सुविधांमुळे विजेच्या मागणीत होणारी वाढ लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला आहे.

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या उप प्रशिक्षण केंद्रातर्फे 'सुपर क्रिटिकल बॉयलर लाईटअप ॲक्टिव्हिटीज' या विषयावर प्रशिक्षण संपन्न

वीज उत्पादनाच्या या महत्वपूर्ण विषयावर दिनांक ९.१०.२०२३ रोजी संचलन व सुव्यवस्था या दोन्ही विभागात कार्यरत अभियंत्यांसाठी हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. कुमारी. रितू विश्वकर्मा सहाय्यक अभियंता संच ८ बॉयलर डेस्क इंजिनियर यांनी या विषयावर अभ्यासपूर्ण अशी माहिती उपस्थित अभियंत्यांना दिली. प्रश्नोत्तर सत्राद्वारे पूर्ण झालेल्या ह्या प्रशिक्षणाचा सुमारे ४० अभियंत्यांनी लाभ घेतला. तांत्रिक स्वरुपाचे ज्ञान–अनुभव इतरांना उपलब्ध व्हावे ही गरज ओळखून या प्रशिक्षणाचे आयोजन प्रत्यक्ष नियंत्रण कक्षात करण्यात आले तसेच 'ट्रेनिंग नीड एनालिसिस' द्वारे अभियंतांच्या प्रशिक्षणाच्या प्रत्यक्ष गरजा जाणून घेऊन असे स्तुत्य उपक्रम यापुढेही राबविण्याचा मानस प्रभारी मुख्य अभियंता श्री. राहुल सोहनी यांनी व्यक्त केला. अशा प्रशिक्षणाद्वारे सर्व संबंधित ऑपरेशन आणि मेंटेनन्स अभियंत्यांच्या संकल्पना स्पष्ट होऊन 'बॉयलर ट्रीपिंग्स' कमी होण्यात निश्चित मदत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्रशिक्षण केंद्राचे कार्यकारी अभियंता श्री. पद्माकर कामतकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता सौ. विद्या बाकडे व सहाय्यक अभियंता सौ. रेवती बडगे यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## भावस्पर्शी कृतज्ञतापूर्वक प्रसंग

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रात मा. मुख्य अभियंता यांचे वाहनचालक श्री. शरद दिगंबर बराटे दि. ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी सेवानिवृत्त झाले. भुसावळ वीज केंद्राचे मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड साहेब यांनी स्वत: वाहन चालवित श्री. बराटे दाम्पत्याला आपल्या शासकीय वाहनात मागे बसवून त्यांच्या घरी वाहनाने अतिशय सन्मानपूर्वक नेऊन आपल्या कर्मचाऱ्याप्रति कृतज्ञता दाखवली.

या प्रसंगातून दोन गोष्टी प्रकर्षाने दिसून येतात. एकतर वाहन चालक श्री. बराटे यांनी आपल्या सेवाकाळात केलेल्या उत्तम कामाची तसेच जोपासलेल्या संबंधांची ही पावती आहे, तर दुसरीकडे मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड यांच्या मनाचा मोठेपणा आणि आपल्या कर्मचाऱ्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याची नामी संधीचे त्यांनी सोने केले.

पद, पैसा आणि प्रतिष्ठेच्या पलीकडील अशा प्रकारची सहृदयता वर्तमान परिस्थितीत फार विरळ झाली असली तरी मुख्य अभियंता, भुसावळ यांच्या या अभिनव कृतीचे दीपनगर वसाहतीत सर्वत्र अभिनंदन होत आहे.

श्री. बराटे यांना पुढील वाटचालीसाठी खुप खुप शुभेच्छा आणि मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड यांचे मनापासून कौतुक करावे तेवढे कमीच.

# दिवाळी अंक आणि आपण

**संतोष एम. केंडे.**




नुकत्याच सरलेल्या दिवाळीमुळे लहानपणची दिवाळी आणि त्या वेळच्या दिवाळी अंकाची आठवण झाली. दिवाळी आणि दिवाळी अंक यांचे फार जुने नाते आहे. सध्याच्या सोशल मिडीयाच्या जमान्यात त्याची तेवढी चर्चा होत नाही, हे मात्र खरं. लहानपणची दिवाळी म्हणजे दिवाळीच्या सुट्टीतील दिलेला अभ्यास, थंडी, नवीन कपडे घरी केलेले फराळाचे पदार्थ, फटाके आणि मोठ्यासाठी आणलेले दिवाळी अंक याची हमखास आठवण येते सध्या वरीलपैकी किती गोष्टी दिवाळी आली की, आठवतात आणि त्यातल्या किती गोष्टीचे अप्रूप वाटते, हा संशोधनाचा विषय ठरावा. दिवाळी अंक म्हटले की, डोळ्यांसमोर जत्रा, आवाज, दक्षता, मार्मिक, मेनका, माहेर, किशोर आणि जास्त वैचारिक) म्हणजे मटा, तरुण भारत, मनशक्ती, अबकडइ इ. नावे आठवतात. तेव्हा दिवाळी अंकही मोजकेच असत.

आम्ही तेव्हा मोठ्यांनी वाचून झाल्यावर अथवा कुणाचे खास लक्ष नाही असे पाहुन, जत्रा, आवाज चाळत असू (वाचनाची गोडी अजून लागायची होती) गुळगुळीत पानांवरील तुरळक मॉडेलपेक्षाही जास्त आकर्षण दोन गुळगुळीत जोडपाने आणि त्यातील खिडकीवजा चौकट अथवा एक पूर्ण पान आणि त्याचे अर्धवट जोडपान याचेच असायचे एकतर अपूर्ण ज्ञान, काहीतरी वेगळे नक्कीच आहे याची जाणीव, अडनिड वय, कुणाला विचारायची सोय नसणं, कोणीतरी बोललेले आणि अर्धवट कळलेले सर्वात कहर, असे दिवाळी अंक उघडपणे वाचायला हिंमत नसणे बरं. त्या वेळच्या प्रथेप्रमाणे पुस्तके चार घरे फिरुन आलेली कोणीतरी आगाऊपणाने पेननं उपद्व्याप केलेले आणि त्याची विचारणा चुकून आपल्याला व्हायची याची कायम भिती. (पेनने काय केलंय, याचाही सुरुवातीला गंध नसायचा, भीक नको... अशी अवस्था व्हायची) पण त्या जोडपानांविषयीचं आकर्षण तसूभरही कमी व्हायचं नाही साध्या रेषांच्या फटकाऱ्यांनी स्त्री-पुरुष संबंधावर इतके वैविध्यपूर्ण चित्रण त्यातील अवखळपणा अनुरूप शरीरयष्टी, स्त्री शरीरास किंचित उठाव, मिश्कीलपणा, हलकासा शृंगार आणि चावटपणा, शेजारीण तिच्याविषयी सुप्त आकर्षण... एकुणात एक लाजवाब कधीकधी पाहण्याच्या गडबडीने अर्थ न लागणे, पान दुमडणे, चौकट फाटणे याने तर घालमेल अजूनच वाढायची. आज ते आठवले की हसू येते. आम्ही मित्र-मित्र मिळून त्यावर दबक्या आवाजात चर्चाही केल्याचे आठवते.

तसेच इतर व्यंगचित्रेही तत्कालीन परिस्थितीवर मार्मिकपणे केलेली भाष्ये असत. प्रशांत कुलकर्णी / विकास सबनीस / वैजनाथ दुलंगे / शि. द. फडणीस ही तर नावे आजही लख्खपणे आठवतात कालौघात वाचनाची गोडी लागल्यामुळे आणि मिसरुड फुटल्यामुळे बिनधास्तपणे दिवाळी अंक आणि त्यातील व्यंगचित्रांवर उर फाटेस्तोवर चर्चा केल्याचेही आठवते. लेखक ही वर्षभर राबून दिवाळी अंकासाठी लिहीत असत. एका अर्थाने दिवाळी झाली की, लगेच पुढच्या दिवाळीचे वेध लागत.

दिवाळी अंकाविषयी आता सहसा चर्चा होताना दिसत नाही. नाही म्हणायला काही जण दरवर्षी दिवाळी अंक नियमित घेतात, वाचतात. काहीजण, "आम्ही दिवाळी अंकाचा सेटच विकत घेतला" हे ठेचात सांगतात, चर्चा होत नाहीत.

आता एकूणच बदललेले स्वरूप पाहता, दिवाळी अंकही त्याला अपवाद कसे ठरतील ?

सध्या भरमसाठ दिवाळी अंकाची संख्या सगळीच पृष्ठे गुळगुळीत, जाहिराती जास्त अन् मजकुर कमी, डबल धमाका, इतक्या रुपयात इतके दिवाळी अंक, मोती साबण, उटणं फ्री. सुमार वर्तमानपत्रांनी सुरु केलेले दिवाळी अंक आणि त्यांची देणगीरूपाने (विक्री नव्हे) केलेली वसुली, अंकाचे विमोचन सोहळे इतपत दिवाळी अंकांचे अवमूल्यन झालेले आढळते. काही सन्माननीय अपवाद वगळता व्यंगचित्र अवमूल्यन आढळते. अर्थात दैनिकागणिक व्यंगचित्रांचा रतीब रोजच्या रोज दारी येत असल्यामुळे त्याची अप्रुप राहिले नाही हे नक्की.

सध्याच्या मार्केटिंग आणि टीआरपीच्या जमान्यात अजून तरी दिवाळी अंकाच्या आवृत्या निघाल्याच्या बातम्या येणे बाकी आहे हेही नसे थोडके.

******

## 'होम मिनिस्टर' मालिकेत महानिर्मिती महिला भगिनी

दिनांक ४ ऑक्टोबर २०२३ रोजी सायंकाळी ६ वाजता झी मराठीवर 'होम मिनिस्टर' या लोकप्रिय मालिकेत महानिर्मितीच्या महिला प्रतिनिधी सहभागी झाल्या होत्या. यामध्ये गीतांजली झिरमुटे, पियुषा तांबेकर, रुपाली उफाडे, दिपाली पाटील, दिपीका मुंदडा, स्वाती कैतके यांचा प्रामुख्याने सहभाग होता. महानिर्मिती परिवारासाठी हा अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण होता.

## महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांची भुसावळ प्रकल्पास भेट

महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांनी भुसावळ ६६० मेगावॅट क्षमतेच्या वीज प्रकल्पाच्या प्रगतीपर कामांचा आढावा घेतला. महानिर्मिती, मेसर्स. भेल आणि त्यांच्या अंतर्गत कार्यरत विविध एजन्सीजच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली आणि वीज प्रकल्पाच्या कामांना अधिक गती देण्याचे निर्देश दिले. तसेच भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र संच क्रमांक ४ व ५ पी.सी.आर. ला भेट देऊन अभियंत्यांशी संवाद साधला.

याप्रसंगी संचालक (प्रकल्प) श्री. अभय हरणे, कार्यकारी संचालक (पर्यावरण व सुरक्षितता) मा.डॉ. नितीन वाघ, मुख्यालय प्रकल्प व्यवस्थापन ग्रुपचे मुख्य अभियंता श्री. पंकज नागदेवते, भुसावळ प्रकल्पाचे मुख्य अभियंता श्री. विवेक रोकडे, भुसावळ वीज केंद्राचे मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड, स्थापत्य विभागाचे मुख्य अभियंता श्री. दत्तात्रय साळुंखे, स्थापत्य सल्लागार श्री. ज्ञानोबा मुंडे, वीज प्रकल्प–वीज केंद्राचे उप मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते तसेच विभाग प्रमुख प्रामुख्याने उपस्थित होते.

## महानिर्मितीच्या मानव संसाधन विभागाच्या पुढाकाराने गतिमान प्रशासन–मानव संसाधन या संकल्पनेवर आधारित "कंपनीचे यश आणि व्यक्तिमत्व विकास" या विषयावर प्रख्यात वक्ते सोनू शर्मा यांच्या कार्यशाळेचे आयोजन

"शालेय आणि महाविद्यालयीन काळात घेतलेले शिक्षण आणि व्यावहारिक जीवनातील प्रत्यक्ष अनुभवातून मिळणारे ज्ञान यामध्ये भरपूर फरक आहे. जीवनात प्रत्येक गोष्ट शक्य आहे, त्यासाठी निरीक्षण, प्रक्रिया आणि विचार या गोष्टी महत्वाच्या असून प्रक्रियेचा त्रास होतो तर निकाल आपल्याला आनंद देत असतो", असे मत सुप्रसिद्ध मोटिव्हेशनल वक्ता सोनू शर्मा यांनी सांगितले.

"तुमच्या जवळील ज्ञान तुमच्या बँक बॅलन्सवर प्रतिबिंबित झाले पाहिजे. शिखरावर जाणे जितके कठीण आहेत, तितकेच शिखरावर कायम राहणे जिकिरीचे काम आहे. कोणत्याही गोष्टीची खूप चिंता करू नका किंवा एकदम ताण घेऊन नका. जग अतिशय झपाट्याने बदलत आहे, बदलत्या परिस्थितीचा वेध घेऊन नवे कौशल्य आणि नवीन विचार आत्मसात करा, समोरच्याला काय पाहिजे आहे ते उपलब्ध करून द्या. विश्वास प्रणाली निश्चित करा, मोठा विचार करा, नकारात्मक विचार सोडून सकारात्मक विचार करा, वृत्ती बदलवा. मी राजा आहे हा मनात विचार रुजवा आणि राजासारखे रहा", असेही त्यांनी सांगितले.

वीज उत्पादन क्षेत्रात कार्यरत मनुष्यबळामध्ये काळानुसार नवीन कौशल्य आणि बदलण्याची सकारात्मक मानसिकता तयार व्हावी यासाठी "कंपनीचे यश आणि व्यक्तिमत्व विकास" या विषयावर प्रख्यात वक्ते सोनू शर्मा यांच्या कार्यशाळेचे आयोजन प्रकाशगड मुख्यालय मुंबई येथे करण्यात आले. महानिर्मिती मानव संसाधन विभागाच्या पुढाकाराने गतिमान प्रशासन–मानव संसाधन या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम महानिर्मिती अधिकारी–कर्मचाऱ्यांसाठी प्रामुख्याने आयोजित करण्यात आला.

कार्यशाळेला मंचावर आंतरराष्ट्रीय ख्यातीचे प्रेरणादायी वक्ते सोनू शर्मा, महानिर्मितीचे संचालक (वित्त) श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (प्रकल्प) श्री. अभय हरणे तर अध्यक्षस्थान संचालक (खनिकर्म) डॉ. धनंजय सावळकर यांनी भूषविले.

प्रास्ताविकात डॉ. धनंजय सावळकर म्हणाले की, "दैनंदिन काम करताना त्यामध्ये नवनवीन प्रेरणेची गरज असते त्यासाठी अशा प्रकारचे प्रशिक्षण आवश्यक आहे. या कार्यशाळेतून चांगल्या गोष्टी आपल्या प्रत्यक्ष जीवनात, कार्यपद्धतीत, दैनंदिन आचरणात कश्या पद्धतीने स्विकारता येतील त्यावर लक्ष केंद्रित करावे", असे त्यांनी उपस्थितींना आवाहन केले.

कार्यशाळेला महानिर्मितीचे कार्यकारी संचालक श्री. राजेश पाटील, श्री. नितीन चांदूरकर, डॉ. नितीन वाघ, श्री. पंकज नागदेवते, मुख्य अभियंते श्री. शशांक चव्हाण, श्रीमती विजया बोरकर, श्री. राहुल नाळे, श्री. राजीव मालेवार, श्री. भूषण कुळकर्णी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यशाळेला महानिर्मितीच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांची लक्षणीय उपस्थिती होती. कार्यक्रम आयोजन समन्वयकाची भूमिका मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. आनंद कोंत यांनी अदा केली.

कार्यशाळेचे सूत्रसंचलन सौ. सोनाली चुंगडे यांनी तर आभार प्रदर्शन स्वप्नीता राठोड यांनी केले.

## निधन वार्ता – महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी ते आंतरराष्ट्रीय क्रिकेट पंच पिलू रिपोर्टर यांचे निधन

तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे कर्मचारी आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट पंच (अंपायर) पिलू रिपोर्टर यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी दु:खद निधन.

पिलू रिपोर्टर यांना 'पीडी' या नावाने ओळखले जायचे. १४ कसोटी सामने (टेस्ट मॅच) आणि २२ एकदिवसीय सामन्यांमध्ये 'पंच' म्हणून त्यांची कारकीर्द राहिली आहे. वीज क्षेत्रातील एका कर्मचाऱ्याने एवढी मोठी दैदिप्यमान कामगिरी बजावल्याचा सार्थ अभिमान तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ आणि वर्तमान महानिर्मितीच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांना कायम प्रेरणादायी असा आहे.

पिलू रिपोर्टर यांच्या कुटुंबियांच्या दु:खात संपूर्ण महानिर्मिती परिवार सहभागी आहे.

## महानिर्मितीच्या भुसावळ प्रकल्प पूर्णत्वासाठी महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांनी भेल कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. नलिन शिंघल यांची भेट घेतली

महानिर्मितीच्या भुसावळ ६६० मेगावॅट संच क्रमांक ६ चे अभियांत्रिकी, खरेदी आणि उभारणीचे काम केंद्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम (BHEL) मेसर्स भेल कंपनी करीत असून या कामांना अधिक जलद गतीने पूर्णत्वाकडे नेण्यासाठी महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांनी आज दिल्ली येथे भेल कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. नलिन शिंघल यांची भेट घेतली.

महानिर्मितीच्या भुसावळ संचाचे बाष्पक प्रदीपन दि. ३० मार्च २०२३ रोजी संपन्न झाले, त्यानंतर सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करून हा संच डिसेंबर २०२३ मध्ये कार्यान्वित करण्यासाठी मेसर्स भेल चे युद्धस्तरीय प्रयत्न सुरू असल्याचे डॉ. नलिन शिंघल यांनी सांगितले.

मेसर्स. भेल आणि महानिर्मिती अधिकाऱ्यांच्या संयुक्त बैठकीत भुसावळ वीज प्रकल्पाच्या विकास कामांचा तपशीलवार आढावा घेण्यात आला. तसेच भविष्यातील वीज प्रकल्प, विद्युत उत्पादन क्षेत्रातील नवनवीन अत्याधुनिक तंत्रज्ञान, बदलते निकष, पर्यावरणीय ऱ्हास आणि घडामोडी अशा ज्वलंत विषयांवर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. यासंदर्भात मेसर्स. भेल कंपनीने घेतलेल्या पुढाकाराबद्दल महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांनी भेल कंपनीच्या अधिकाऱ्यांचे कौतुक केले.

"महानिर्मिती आणि मेसर्स भेल कंपनी यांचे मागील चार दशकांपासून असलेले सौहार्दपूर्ण संबंध लक्षात घेता आवश्यक ते संपूर्ण सहकार्य महानिर्मितीकडून भेल कंपनीला करण्यात येईल", असे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांनी सांगितले.

महाराष्ट्राच्या वीज क्षेत्राच्या दृष्टिकोनातून भुसावळ ६६० मेगावॅट हा अतिशय महत्वाकांक्षी प्रकल्प असून यावर्षी राज्याच्या ग्रीडमध्ये ६६० मेगावॅटची भर पडणार आहे. भुसावळ मधील ६६० मेगावॅट क्षमतेचा पहिला आणि कोराडीच्या ३ संचांनंतर हा महानिर्मितीचा चौथा संच आहे.

या प्रसंगी महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) श्री. अभय हरणे, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे निवासी कार्यकारी संचालक श्री. प्रफुल्ल पाठक तसेच भेल चे वरिष्ठ अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

## नाशिक प्रशिक्षण केंद्रातर्फे दोन दिवसीय नवीकरणीय ऊर्जेसंबंधी प्रशिक्षणाचे आयोजन

महानिर्मितीने २०३० पर्यंत ८०० मेगावॅट नवीकरणीय ऊर्जेचे लक्ष्य निर्धारित केले असल्याने त्यादृष्टीने वाटचाल करण्याकरिता समर्पित मनुष्यबळाची निवड केली आहे. ज्यामध्ये काही सेवानिवृत्त अभियंत्यांना या कामी घेण्यात आले आहे. या मनुष्यबळाला आकार देण्यासाठी दोन दिवसीय नवीकरणीय ऊर्जेसंबंधी प्रशिक्षणाचे आयोजन नाशिक प्रशिक्षण केंद्राने आयोजित केली.

ज्यामध्ये जगभरात नवीकरणीय ऊर्जेची स्थिती, भारत देशात सद्यस्थिती, संधी, आर्थिक आणि सामाजिक प्रभाव / परिणाम, नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहण, निकष, तांत्रिक बाबी, कायदेशीर बाबी, बांधकाम व्यवस्थापन, डिझाईन, इंजिनिअरींग आणि तंत्रज्ञान, संचलन व सुव्यवस्था, प्रकल्प वित्तीय, वाणिज्य आणि नियामक आयोग निकष, संबंधित लाभधारक संवाद, प्रकल्प साईट व्हिजिट, नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील तज्ञ, अनुभवी व्यक्तींनी या प्रशिक्षणपर कार्यक्रमात मार्गदर्शन केले. यामध्ये प्रामुख्याने श्री. संजय कुऱ्हाडे, श्री. प्रसन्न कोटेचा, श्री. दिलीप गुट्टे, श्री. हर्षल भास्करे, श्री. सतनाम महाले, श्री. बिरकु सिंह उपस्थित होते.

उद्घाटन समारंभप्रसंगी मंचावर महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. पी. अन्बलगन, संचालक (प्रकल्प) श्री. अभय हरणे, कार्यकारी संचालक (प्रकल्प) श्री. पंकज नागदेवते, मुख्य अभियंता (प्रशिक्षण) श्री. राजेश मोराळे प्रामुख्याने उपस्थित होते. प्रास्ताविकातून श्री. संजय कुऱ्हाडे यांनी तत्कालीन म.रा.वि.मं. ते महानिर्मिती प्रवास सांगितला व सोबतच महानिर्मितीची नवीकरणीय ऊर्जेबाबतची भूमिका विषद केली.

महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणाले की, "मागील कालखंडात सौर ऊर्जा क्षेत्रात आपण पाहिजे तेवढी क्षमता वाढ करु शकलो नाही, मात्र आता जिद्दीने काम करुन आपल्याला ८०० मेगावॅट नवीकरणीय ऊर्जेचे लक्ष्य गाठायचे आहे. सन २०३० पर्यंत २५ गिगावॅटचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. यासाठी आपल्याला या क्षेत्रातील प्रत्येक गोष्टींवर नजर ठेवावी लागेल. नवनवीन संधी शोधाव्या लागतील. जगात काय बेस्ट सुरु आहे आणि अत्यंत समर्पित मानसिकततेतून हे आव्हान यशस्वी करायचे आहे, त्यानिमित्ताने हे प्रशिक्षण एक मैलाचा दगड ठरणारे आहे."

याप्रसंगी संचालक (प्रकल्प) श्री. अभय हरणे म्हणाले की, "औष्णिक वीज उत्पादनाकडून नवीकरणीय ऊर्जेकडे प्रवास करताना आपल्याला मल्टी टास्किंग स्वरुपाची कामे करावी लागतील. त्यासाठी प्रत्यक्ष प्रकल्पस्थळी भेडसावरणाऱ्या समस्या, प्रश्न तात्काळ निकाली काढण्याचे कौशल्य, हातोटी आत्मसात करावी लागेल. महानिर्मितीने नवीकरणीय ऊर्जेकरिता महाजेनको रिन्युएबल एनर्जी लि. या महानिर्मितीच्या उपकंपनीची स्थापना केली आहे."

प्रशिक्षणानंतर धुळे जिल्ह्यातील साक्री येथील सौर ऊर्जा प्रकल्पास प्रशिक्षणार्थींनी भेट दिली व प्रत्यक्ष कामाची पाहणी केली.

अभिनंदन

## मा.श्री. अभय हरणे महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) म्हणून रुजू



वीज उत्पादन क्षेत्रात कुशल अभियंता म्हणून नावलौकिक असणारे श्री. अभय हरणे यांची नुकतेच महानिर्मितीच्या संचालक (प्रकल्प) पदी निवड झाली असून त्यांनी या पदाचा पदभार स्वीकारला आहे.

श्री. अभय हरणे यांनी विद्युत अभियांत्रिकी पदविका, इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्समध्ये अभियांत्रिकी पदवी तर एम.बी.ए. (फायनान्स) चे शिक्षण पूर्ण केले आहे.

सन १९९३ मध्ये तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रात कनिष्ठ अभियंता या पदी रुजू झाल्यानंतर मागील सुमारे तीन दशके त्यांनी परळी, चंद्रपूर (उप मुख्य अभियंता) भुसावळ–कोराडी–मुंबई येथे मुख्य अभियंता त्यानंतर नागपूर विभाग आणि मुख्यालय मुंबई येथे कार्यकारी संचालक तर नुकतेच त्यांच्याकडे संचालक (प्रकल्प) पदाचा अतिरिक्त प्रभार होता. वीज उत्पादन क्षेत्रातील विविध महत्वपूर्ण पदांवर काम करतांना आपल्या गुणवत्तापूर्ण कामांचा ठसा त्यांनी उमटवला आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने संचलन, नवीन संच स्थिरीकरण, देखभाल–दुरुस्ती, चाचणी उपकरण नियंत्रण, कार्यक्षमता वाढ, खनिकर्म, इंधन व्यवस्थापन, कोळसा हाताळणी विभाग, वीज नियामक आयोग विषयक निकष, बाबी आणि जागरूकता इत्यादींचा समावेश आहे. त्यांच्या कार्यकाळात कोराडी वीज केंद्राने १०० टक्के भारांक आणि वीज उत्पादनात सातत्यपूर्ण उच्चांक गाठला. गरे पालमा–२ कोळसा खाण पर्यावरण लोकसूनावणी यशस्वी करण्यात त्यांची मोलाची भूमिका होती. तांत्रिक निपुणता, व्यवस्थापन– प्रशासनिक कौशल्य, दांडगा जनसंपर्क आणि सांघिक कार्यसंस्कृती त्यांची गुणवैशिष्ट्ये आहेत.

नवनवीन कल्पना, सर्वोत्तम कार्य पद्धतींची देवाणघेवाण करण्यासाठी राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय स्तरावर पेपर प्रेझेंटेशन आणि मार्गदर्शनातून महानिर्मितीची प्रतिमा सुधारण्यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील असतात.

औष्णिक संचाच्या नूतनीकरण आणि आधुनिकीकरणाच्या सर्वोत्तम पद्धतीसाठी जर्मनी येथे त्यांनी महानिर्मितीचे प्रतिनिधीत्व केले. सन २०१३ मध्ये तत्कालीन महामहिम राज्यपाल महाराष्ट्र यांच्या हस्ते उत्कृष्ट अभियंता पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. श्री. अभय हरणे यांनी रोटरी क्लब ऑफ भुसावळ रेल सिटीचे अध्यक्षपद भूषविले आहे. स्थानिक माध्यमाने "खानदेश रत्न" म्हणून त्यांचा बहुमान केला आहे.

महानिर्मिती कोल पाईप कन्व्हेयर प्रणाली प्रकल्प, सौर–पवन–उदंचन प्रकल्प, भुसावळ आणि प्रस्तावित कोराडी बदली संच प्रकल्प, उरण क्षमता वाढ, एफ.जी.डी.सारख्या महत्वपूर्ण कामांची जबाबदारी त्यांचेकडे राहणार आहे.

स्पर्धेच्या युगात आणि वीज उत्पादनाच्या खडतर परिस्थितीत नवनवीन स्रोत, विकासाचे–उत्पन्नाचे मार्ग शोधणे, हॅप्पी स्ट्रीट सारखे लोक सहभागात्मक उपक्रम राबविणे, मनुष्यबळामध्ये समाधानाचा–आनंदाचा स्तर उंचावत त्यांच्याकडून सहजरित्या काम करून घेण्याची अचूक हातोटी त्यांच्या अंगी आहे. गायन, वाचन, संगीत आणि पर्यटनाचा विलक्षण छंद असून नेतृत्वगुण, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडाक्षेत्राची उत्तम जाण असलेले दिलखुलास व्यक्तिमत्व म्हणजे श्री. अभय हरणे.

अभिनंदन

## मा. डॉ. धनंजय सावळकर महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) म्हणून रुजू



महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागात अतिरिक्त जिल्हाधिकारी या मूळ पदावर कार्यरत असलेले डॉ. धनंजय सावळकर यांनी नुकतेच महानिर्मिती कंपनीत कार्यकारी संचालक (मानव संसाधन) या पदाचा कार्यभार स्वीकारला. यापूर्वी ते 'सह संचालक' या पदावर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ येथे कार्यरत होते.

डॉ. सावळकर हे उच्च विद्याविभूषित असून त्यांनी पशुवैद्यकीय विज्ञान आणि पशु संगोपन पदव्युत्तर शिक्षणासोबत कायद्याची पदवी संपादित केली आहे तसेच रियल इस्टेट व्यवस्थापन पदविका शिक्षण देखील पूर्ण केले आहे.

त्यांची कारकीर्द विक्रीकर निरीक्षक, उपजिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी, राज्यमंत्री (सामान्य प्रशासन व ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, इत्यादी महत्वाच्या पदांचा कार्यभार त्यांनी यशस्वीपणे सांभाळला आहे.

जूलै २००५ मध्ये महापूर नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनात उल्लेखनीय योगदान. केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षांचा केंद्रप्रमुख/समन्वय अधिकारी म्हणून कामकाज पाहिले आहे. महसूल विभागा संबंधित न्यायप्रविष्ठ प्रकरणे पाठपुरावा, हाताळणे, कोठडीतील मृत्यू, अपघात, चकमकी, न्यायालयीन चौकशीचे कामकाज केले आहे. संजय गांधी योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ योजना यांसारख्या सामाजिक योजनांची त्यांनी यशस्वी अंमलबजावणी केली आहे. सेतू सुविधा केंद्र (नागरी सुविधा केंद्र) व महा ई–सेवा केंद्र यांचेवर पर्यवेक्षणाचे कामकाज केले आहे. विक्रीकर, जमीन महसूल, करमणूक कर बाबत तसेच लोकसभा, विधानसभा, महानगर पालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, जिल्हा मध्यवती बँक निवडणूकांचे कामकाज केले आहे. जात प्रमाणपत्राविषयी सह्याद्री वाहिनीवर जय महाराष्ट्र टि.व्ही. शो मध्ये एक तास मुलाखत आणि जात प्रमाणपत्राविषयी मुंबई आकाशवाणीवर एक तासाचे जनजागृतीपर संभाषण केले आहे. शासकीय दाखले (अधिवास/उत्पन्न/जाती/नॉन क्रिमीलेयर) करिता आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांविषयी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सुमारे ६०० महाविद्यालयांना मार्गदर्शन केले. यशदा पुणे येथे प्रशासकीय सुधारणा, ई–गव्हर्नन्स, जमीन विषयक अभिलेख संगणकीकरण प्रशिक्षण पूर्ण केले. मा. राष्ट्रपती व मा. पंतप्रधान यांचे दौरा कार्यक्रमाच्या वेळी दोन वेळा संपर्क अधिकारी म्हणून देखील काम पाहिले आहे.

मुरबाड येथे शासकीय जत्रेचे आयोजन. वरिष्ठ नागरिक कायद्याअंतर्गत पालकांना न सांभाळणाऱ्या मुलांविरुद्ध महाराष्ट्रातील पहिली शिक्षा प्रकरण पारित केले. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मक्तेदारी नियंत्रण, नवीन भूसंपादन कामकाजाचा अनुभव. कातकरी बांधवांना तीन तासांत जातीचा दाखला देण्याचा अभिनव उपक्रम अलिबाग येथे राबविला. मुरबाड तालुक्यात वन हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी केली. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, झोपडपट्टी निर्मूलन कायद्याअंतर्गत कामकाजाचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे. सुवर्णजयंती राजस्व अभियान, शासन आपल्यादारी, महाराजस्व अभियान, जलयुक्त शिवार अभियान इत्यादी उपक्रम राबविण्यात त्यांचा पुढाकार होता.

विशेष म्हणजे सर्वांगीण पर्यटन विकासासाठी भारताचे मा. उप राष्ट्रपती यांच्या हस्ते राष्ट्रीय पर्यटन पुरस्कार आणि ६ नवीन पर्यटन धोरणे आणल्याबद्दल पर्यटन क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मानित. पर्यटन परिषदेसाठी इंग्लंड, इंडोनेशिया आणि फिलिपिन्स इ. देशांना भेट. एकूणच प्रशासकीय कामकाजात त्यांचा हातखंडा आहे.

स्पर्धेच्या युगात महानिर्मितीच्या मनुष्यबळाचे कौशल्य अधिकाधिक विकसित करून एकूणच वीज उत्पादनाची कार्यक्षमता वाढविणे, सांघिक भावनेसह सशक्त वातावरण निर्माण करणे तसेच मनुष्यबळाशी निगडित समस्यांचे प्राधान्याने निरसन करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांची उरण वायु विद्युत केंद्रास भेट













महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ.पी. अन्बलगन यांनी उरण वायु विद्युत केंद्राला भेट दिली. त्यांनी वायु विद्युत केंद्राच्या बॉयलर, गॅस टर्बाईन व इतर संयंत्रांची पाहणी करून वीजनिर्मितीचा व बंद असलेले संच त्वरित चालु करणेबाबत आढावा घेतला. नवीन वायु विद्युत प्रकल्पाच्या जागेची तसेच वसाहतीची पाहणी केली. मे. गेल ईंडिया लिमिटेड कंपनीच्या प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा केली, तसेच वीज केंद्रातील अधिकाऱ्यांची बैठक घेऊन मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी संचालक (संचलन) मा. श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) मा. श्री. अभय हरणे, मुख्य अभियंता (सांघिक नियोजन व सुसंवाद) श्री. संजय कुऱ्हाडे तसेच वायु विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता श्री. सुनील इंगळे, अधीक्षक अभियंते श्री. सुनील वाघ व श्री. मुनेश्वर तसेच विविध विभागाचे कार्यकारी अभियंते आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.









## महानिर्मितीचे मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांची कोराडी औष्णिक विद्युत केंद्रास भेट




महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. पी. अन्बलगन यांनी कोराडी औष्णिक विद्युत केंद्रास भेट देऊन प्रगतीपर कामांचा आढावा घेतला. त्यावेळी सोबत कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था -२) मा.श्री. पंकज सपाटे, कोराडी औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता श्री. विजय राठोड आणि खापरखेडा औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता श्री. विवेक मोटघरे आणि अन्य वरिष्ठ अभियंते-अधिकारी उपस्थित होते, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.







## महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांची कोयना जल विद्युत केंद्रास भेट




मा. डॉ.पी. अन्बलगन यांनी उरण वायु विद्युत केंद्राला भेट देऊन वायु विद्युत केंद्राच्या बॉयलर, गॅस टर्बाईन व इतर संयंत्रांची पाहणी करून आढावा घेतला. याप्रसंगी संचालक (संचलन) मा. श्री. संजय मारुडकर, मुख्य अभियंता (नवीकरणीय ऊर्जा - प्रकल्प व नियोजन) श्री. संजय कुऱ्हाडे, वायु विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता श्री. संजय चोपडे आणि अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.




## महानिर्मिती कंपनीचा १८वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न




**संपादक : यशवंत मोहिते (जनसंपर्क अधिकारी)**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादक, सृजन (महानिर्मिती), प्रकाशगड, दुसरा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१. **(खाजगी वितरणासाठी)**

**E-mail :** pro@mahagenco.in
**Web. :** www.mahagenco.in
**Printed & Published by :** Shri. Yashwant Mohite for
**MAHARASHTRA STATE POWER GENERATION CO. LTD.**

**Printed At : Hema Arts**
121, Sagar, Prabhat Ind. Estate, Near Dahisar Checknaka,
Western Express Highway, Dahisar (E), Mumbai - 400068.
PH. : 28968221 & Published at Hongkong Bank Bldg., M.G. Road,
Fort, Mumbai - 400 001.



**The Company accepts no responsibility for the matter published in the journal.**